पुणे, सोमवार, १४ जुलै २०२५ · RASHTRA SANCHAR-Vol-4-issue 226 · वर्ष ४ थे, अंक २२६ · किंमत ₹ ६ · पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com Beyond The News




प्रशासकीय हलगर्जीपणाचा 'खळखळाट'...! P३



१२ भारताची दमदार गोलंदाजी

# भारत हा अनुकरण करणारा नव्हे तर ट्रेंड सेट करणारा देश!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** "भारत आता जागतिक ट्रेंडचे अनुसरण करत नाही, तर स्वतः नवीन ट्रेंड निर्माण करत आहे," हा स्पष्ट संदेश शिपरॉकेट आणि केपीएमजी इंडियाने नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या एका अहवालातून समोर आला आहे. 'मेड फॉर भारत, पॉवर्ड बाय एआय' नावाचा अहवालात भारताच्या डिजिटल कॉमर्स क्षेत्रातील बदलत्या समीकरणांवर प्रकाश टाकण्यात आला आहे. यामध्ये ग्रामीण भारताची भूमिका आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) तंत्रज्ञानाचा वाढता प्रभाव देखील अधोरेखित करण्यात आला आहे.

ऑनलाइन शॉपिंग आणि मोबाईलने पेमेंट करणे हे आता फक्त शहरी भागांपुरते मर्यादित राहिलेले नाही. भारतातील खेड्यापाड्यांमध्येही डिजिटल क्रांती पोहोचली असून, तब्बल ८४ टक्के व्यवहार यूपीआय द्वारे होत असल्याचे एका नव्या अहवालातून समोर आले आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्स या बदलाला आणखी गती देत असून, भारताच्या व्यापाराचे चित्र पूर्णपणे बदलत आहे.

'शिपरॉकेट' आणि 'केपीएमजी' यांनी संयुक्तपणे "मेड फॉर भारत, पावर्ड बाय एआय: द न्यू एज ऑफ कॉमर्स" नावाचा अहवाल नुकताच प्रसिद्ध केला. या अहवालानुसार, आज भारतात ८८.६ कोटी लोक इंटरनेट वापरत असून, यापैकी ५५% युजर्स ग्रामीण भागातील आहेत. याचाच अर्थ, आता प्रत्येक दुसरा भारतीय ऑनलाइन शॉपिंगचा अनुभव घेत आहे आणि रोख रकमेऐवजी मोबाईलने पेमेंट करण्याला पसंती देत आहे.

या अहवालाने भारताच्या डिजिटल प्रगतीचे एक प्रभावी चित्र मांडले आहे. त्यातील काही महत्त्वाचे मुद्दे खालीलप्रमाणे:



इंटरनेटचा वाढता विस्तार : भारतात तब्बल ८८.६ कोटी सक्रिय इंटरनेट युजर्स असून, यापैकी सर्वाधिक ५५% वापरकर्ते ग्रामीण भागातील आहेत. हे चित्र 'डिजिटल इंडिया'च्या यशाचे द्योतक आहे.

एआयमुळे विक्रीत वाढ : एआय तंत्रज्ञानाचा वापर करून ग्राहकांसाठी पर्सनलाइज्ड मार्केटिंग केल्यामुळे ९६% विक्रेत्यांच्या विक्रीत मोठी वाढ झाल्याचे दिसून आले आहे.

स्टार्टअप्सची गुंतवणूक : भारतातील ७७% स्टार्टअप्स हे एआय, मशीन लर्निंग आणि ब्लॉकचेन यांसारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानामध्ये सक्रियपणे गुंतवणूक करत आहेत, जे भविष्यातील प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे.

या डिजिटल बदलामुळे थेट ग्राहकांपर्यंत पोहोचणाऱ्या ब्रँड्सना मोठी संधी मिळाली आहे. २०२५ पर्यंत भारतातील या ब्रँड्सची बाजारपेठ १०० अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. सध्या या कंपन्यांना मिळणाऱ्या गुंतवणुकीच्या बाबतीत भारत जगात दुसऱ्या क्रमांकावर आहे. विशेष म्हणजे, काही मिनिटांत घरपोच डिलिव्हरी देणारी 'क्विक कॉमर्स' सेवा आता फक्त मोठ्या शहरांपुरती मर्यादित राहिली नसून, लहान शहरे आणि गावांमध्येही वेगाने पसरत आहे. अहवालानुसार, ५०% लोक दर महिन्याला पाच किंवा त्याहून अधिक वस्तू ऑनलाइन ऑर्डर करत आहेत.

### एआय ठरतोय 'गेम चेंजर'

- या संपूर्ण बदलामध्ये आर्टिफिशियल इंटेलिजन्स तंत्रज्ञानाची भूमिका सर्वात महत्त्वाची ठरत आहे. त्यामुळे कंपन्यांना अनेक फायदे होत आहेत, जसे की, अचूक पॅकिंग : गोदामांमध्ये (वेअरहाऊस) ९९.९% ऑर्डर अचूकपणे पॅक होत आहेत.
- मागणीचा अंदाज : ९०% पेक्षा जास्त अचूकतेने भविष्यातील मागणीचा अंदाज लावता येत आहे.
- स्थानिक भाषेत संवाद : ब्रँड्स आता स्थानिक भाषांमध्ये जाहिरात मोहीम राबवून ग्राहकांशी जोडले जात आहेत, कारण ९८% भारतीय इंटरनेटवर आपल्या मातृभाषेतच माहिती पाहणे पसंत करतात.

## At a Glance

### भाजप नेते सुरेंद्र केवट यांची गोळ्या घालून हत्या

**पाटणा :** बिहारची राजधानी पाटणा येथे भारतीय जनता पक्षाचे सुरेंद्र केवट यांची गोळ्या घालून हत्या करण्यात आली आहे. सुरेंद्र केवट यांच्यावर दुचाकीस्वार तरुणांनी चार गोळ्या झाडल्या. नंतर हल्लेखोर घटनास्थळावरून पळून गेले. गेल्या काही दिवसांतली पाटण्यामधली गोळीबाराची ही दुसरी घटना आहे.सुरेंद्र केवट हे भाजप किसान » पान ७ वर

### मद्यधुंद ऑडी चालकाने ५ जणांना चिरडले

**नवी दिल्ली :** दक्षिण दिल्लीतील वसंत विहार परिसरात एका मद्यधुंद चालकाने मध्यरात्री आपल्या ऑडी गाडीने फुटपाथवर झोपलेल्या पाच जणांवर गाडी घालून त्यांना गंभीर जखमी केल्याची धक्कादायक घटना घडली आहे.

या भीषण अपघातात एका आठ वर्षांच्या मुलीसह दोन जोडप्यांचा समावेश असून सर्वजण गंभीर जखमी झाले आहेत. पोलिसांनी » पान ७ वर

# तिजोरीत खडखडाट

## नव्याने मद्यविक्रीचे परवाने

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** राज्यात सुमारे ५० वर्षांपासून वाईन शॉपच्या परवान्यांसाठी असलेली स्थगिती उठविली जाणार आहे. राज्यात नवीन ३२८ वाईन शॉपकरिता मद्यविक्रीचे परवाने दिले जाणार आहेत. यातून राज्याच्या तिजोरीत मोठा निधी येईल, अशी राज्य सरकारला अपेक्षा आहे.

महायुतीनं विधानसभा निवडणुकीपूर्वी अनेक योजना जाहीर केल्या होत्या. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना तसेच अन्य काही मोफत योजनामुळं राज्याचा तिजोरीला मोठा फटका बसला आहे. लाडक्या बहिणींसाठी लागणाऱ्या निधीसाठी अन्य विभागातील निधी या योजनेत वळविला जात आहे. तसेच राज्यावर ९ लाख कोटीपेक्षा अधिक कर्ज असताना अनेक योजनामुळं राज्याच्या तिजोरीत खडखडाट आहे. अशा परिस्थितीत महसूल वाढविण्यासाठी राज्यात नव्यानं ३२८ वाईन शॉपकरिता परवाने दिले जाणार आहेत.




महसूल वाढविण्यासाठी देशी मद्य, विदेशी मद्य तसेच मद्याच्या प्रीमियम ब्रॅण्डच्या दरात साधारण ९ ते ७० टक्क्यांपर्यंत वाढ करण्याचा निर्णय गेल्या मंगळवारच्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला आहे. याव्यतिरिक्त मद्यविक्रीसाठी दिल्या जाणाऱ्या परवान्याच्या शुल्कातही वाढ करण्यात आली आहे. या विविध निर्णयामुळे राज्य सरकारच्या महसुलात प्रत्येक वर्षी १४ हजार कोटी रुपयांची भर पडण्याचा अंदाज वर्तविण्यात येत आहे.

राज्यात तिजोरीत महसूल वाढविण्यासाठी नव्यानं ३२८ वाईन शॉपना परवाने दिले जाणार असल्याची माहिती राज्य उत्पादनशुल्क मंत्री तथा अर्थमंत्री अजित पवारांनी दिली आहे. तसेच मद्य विक्रीसाठीही परवाने दिले जाणार आहेत. याचाच एक भाग म्हणून राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या प्रत्येक प्रशासकीय विभागांमध्ये विदेशी मद्यनिर्मिती कंपन्यांना परवाना देण्यात येणार आहे. यासाठी उपमुख्यमंत्री आणि राज्य उत्पादन शुल्क मंत्री अजित पवारांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आलीय. » पान ७ वर

### मद्य उद्योगाला मिळणार चालना

- नवीन मद्यपरवाने मिळवून देण्याच्या नावाखाली राज्यात अनेकदा फसवणुकीचे प्रकार घडले आहेत. मद्यपरवाने मिळत नसल्यानं अनेक व्यावसायिक धडपडत असताना त्यांना परवाने मिळण्याचे आजवर सर्व मार्ग बंद होते. सरकारनं परवाने दिल्यानंतर राज्यातील मद्य उद्योगाला आणखी चालना मिळण्याची शक्यता आहे.

# ज्येष्ठ विधीज्ञ उज्वल निकम यांची राज्यसभेवर नियुक्ती

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** राजकीय क्षेत्रामधून एक मोठी आणि महत्वाची बातमी समोर येत आहे. २०२४ साली लोकसभा निवडणुकीत पराभव झालेले सरकारी वकील उज्वल निकम यांची आता राष्ट्रपती नामनिर्देशित खासदार म्हणून राज्यसभेवर नियुक्ती करण्यात आली आहे. उज्वल निकम यांची राष्ट्रपती कोट्यातून राज्यसभेवर खासदार म्हणून नियुक्ती करण्यात आली. निकम यांच्यासह आणखी तीन जणांची राज्यसभेवर नियुक्ती करण्यात आली आहे.



भारताच्या राष्ट्रपतींनी संविधानाच्या कलम ८० (१) (अ) आणि त्याच कलम (३) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांनुसार प्रसिद्ध सरकारी वकील उज्वल देवराव निकम, केरळमधील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते आणि शिक्षणतज्ज्ञ सी. सदानंदन मस्ते, भारताचे माजी परराष्ट्र सचिव हर्षवर्धन श्रृंगला आणि प्रख्यात इतिहासकार आणि शिक्षणतज्ज्ञ मीनाक्षी जैन यांना राष्ट्रपती नामनिर्देशित खासदार म्हणून राज्यसभेवर नियुक्ती केली आहे. यापूर्वी नामांकित सदस्यांच्या निवृत्तीमुळे निर्माण झालेल्या रिक्त पदांच्या जागेवर या सदस्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

उज्वल निकम यांनी २०२४ साली भाजपाकडून लोकसभा निवडणूक लढविली होती. उत्तर-मध्य मुंबई लोकसभा मतदारसंघात काँग्रेसच्या वर्षा गायकवाड यांच्याविरोधात उज्वल निकम यांनी निवडणूक लढवली होती. परंतु यात त्यांना पराभवाला सामोरं जावं लागलं होतं. तसेच उज्वल निकम यांनी अनेक मोठ्या खटल्यात वकील म्हणून महत्वाच्या भूमिका बजावली आहे. २६/११ सारख्या दहशतवादी खटल्यात कसाबला फासावर लटकवण्यात त्यांनी अत्यंत महत्वाचा युक्तीवाद केला होता. आता उज्वल निकम यांची राज्यसभेवर खासदार म्हणून नियुक्ती झाली आहे.

# जनसुरक्षेला विरोध म्हणजे डाव्या विचारांना हातभार - फडणवीस

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नागपूर :** बिल न वाचताच काही लोक या जनसुरक्षा विधेयकाला विरोध करीत आहेत. मात्र या माध्यमातून ते कडव्या डाव्या विचारांनाच नकळत पुढे नेत आहेत. त्यांना सहकार्य करीत आहेत असा आरोप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी माध्यमांशी बोलताना केला.



जनसूरक्षा विधेयक दोन्ही सभागृहात मंजूर झाल्याचा मला आनंद आहे. या संदर्भात मोठी लोक तांत्रिक प्रक्रिया आपण पूर्ण केली. २५ लोकांची संयुक्त संसदीय चिकित्सा समिती गठित केली. या समितीचा रिपोर्ट एकमताने आला. १२ हजार सूचना आल्या. दोन्ही सभागृहात चर्चेअंती हे विधेयक मंजूर करण्यात आले. भारताचे संविधान न मानणाऱ्या, ते उलथून टाकणाऱ्या शक्तीविरोधात यामुळे कारवाई करता येणार आहे.

कुठल्याही आंदोलन करण्याचा, सरकारला विरोध करण्याचा, बोलण्याचा किंवा लिहिण्याचा अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार या माध्यमातून काढून घेण्यात आलेला नाही. मात्र प्रथमच कुठल्याही एका संघटनेवर कारवाई करण्यासाठी हा कायदा महत्त्वपूर्ण ठरणार आहे. आधी व्यक्तीविरोधात कारवाई करावी लागत होती. यानिमित्ताने न्यायालयासारखी सर्व व्यवस्था उभी केली असून आधी त्या मंडळापुढे पुराव्यांसह जावे लागणार आहे. यानंतरही संबंधित संघटनेला 30 दिवसात उच्च न्यायालयात जाता येणार आहे. यामुळेच ज्यांनी हा कायदा वाचला नाही. त्यांनी याबाबत विरोधाची भूमिका घेतली असल्याचेही त्यांनी सांगितले.

देशाच्या क्रिमिनल जस्टीस सिस्टीम संदर्भात गतिशीलता हवी याकडे लक्ष वेधत त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी शंभर वर्षानंतर अनेक कायद्यात बदल केले आहेत. या बदलाचे त्यांनी स्वागत केले. यात भारतीय न्याय संहिता, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, भारतीय साक्ष संहिता या तीन कायद्याचे आणि या माध्यमातून क्रिमिनल जस्टिस सिस्टिम बदलाचे मुख्यमंत्र्यांनी यावेळी स्वागत केले.

# म्हाडाकडून ५२८४ घरांची लॉटरी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** आयुष्यात आपलं स्वत:चं एक स्वप्नातील घर असावं, असं प्रत्येकाचं स्वप्न असते. पण हे स्वप्न सर्वांचंच पूर्ण होतं असं नाही. जागेच्या आणि घरांच्या किंमती गगनाला भिडल्या असल्यानं इच्छा असूनही अनेकांना घर खरेदी करता येत नाही. पण तुम्ही जर घर खरेदी करणार असाल तर म्हाडानं तुमच्यासाठी आनंदाची बातमी आणली आहे. म्हाडा लवकरच ५,२८५ घरांची लॉटरी काढणार आहे.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या (म्हाडा) कोकण मंडळातर्फे ठाणे शहर व जिल्हा, तसेच पालघर जिल्ह्यातील वसई इथं विविध गृहनिर्माण योजनांच्या माध्यमातून एकूण ५,२८५ सदनिका आणि ७७ भूखंडांच्या विक्रीसाठी सोडत जाहीर करण्यात आली आहे. ही सोडत ओरोस (जिल्हा सिंधुदुर्ग) व कुळगाव-बदलापूर येथील भूखंडांकरिता देखील लागू आहे. १५ टक्के एकात्मिक शहर गृहनिर्माण » पान ७ वर

# राष्ट्रीय जागृती आणि सामाजिक सुधारणांचा मेळ : अमृता फडणवीस

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** अध्यात्मिक परंपरा, राष्ट्रीय जागृती आणि सामाजिक सुधारणा यांचा मेळ पुण्यात आहे. त्यामुळे पुण्यात येऊन फार आनंद होतो. पुण्यातील प्रकृती आणि लोकं याबद्दल आपुलकी वाटते. इथे काय आणखी सुधारणा करता येतील, हे मी देवेंद्रजींना सांगत असते. ते देखील पुण्याकडे लक्ष देतात, असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्त्या अमृता फडणवीस यांनी केले.

श्रीमती लक्ष्मीबाई दगडूशेठ हलवाई दत्तमंदिर ट्रस्टतर्फे मंदिराच्या संस्थापिका लक्ष्मीबाई यांचे स्मृतिप्रित्यर्थ २०२५ सालाचे लक्ष्मीबाई स्मृती पुरस्कार प्रदान करण्यात आले. यावेळी राज्याच्या युवा धोरण समितीच्या सदस्या डॉ. निवेदिता एकबोटे, श्रीमंत दगडूशेठ गणपती ट्रस्टचेअध्यक्ष सुनील रासने, दत्तमंदिर ट्रस्टचे अध्यक्ष अ‍ॅड. शिवराज कदम जहागिरदार, कार्यकारी विश्वस्त अ‍ॅड. रजनी उकरंडे, कोषाध्यक्ष युवराज गाडवे, उत्सव प्रमुख महेंद्र पिसाळ, उप उत्सवप्रमुख अक्षय हलवाई, विश्वस्त अ‍ॅड. प्रताप परदेशी, डॉ. पराग काळकर, सुनील रुकारी, राजेंद्र बलकवडे आदी उपस्थित होते.



**पुणे** श्रीमती लक्ष्मीबाई दगडूशेठ हलवाई दत्तमंदिर ट्रस्टतर्फे यंदाचे लक्ष्मीबाई स्मृती पुरस्कार छत्रपती शिवाजीनगर येथील लता मंगेशकर सभागृहात आयोजित कार्यक्रमात प्रदान करण्यात आले. यावेळी उपस्थित पुरस्कारार्थी व मान्यवर.

दत्त महाराजांची प्रतिकृती असलेले » पान ७ वर

# अंतराळवीर शुभांशु शुक्ला उद्या पृथ्वीवर परतणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भारतीय अंतराळ संशोधन संस्थेचे (इस्रो) अंतराळवीर ग्रुप कॅप्टन शुभांशु शुक्ला आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर १८ दिवस वास्तव्य केल्यानंतर १५ जुलै रोजी पृथ्वीवर परतत आहेत. एक्सिओम-४ मोहिमेअंतर्गत शुक्ला यांच्यासोबत कमांडर पेगी व्हिटसन, पोलंडचे स्लावोज उझ्नान्स्की-विस्निव्स्की आणि हंगेरीचे टिबोर कापू हे तीन अन्य अंतराळवीर या प्रवासात सहभागी आहेत. हे सर्वजण २६ जून रोजी अंतराळ स्थानकावर पोहोचले होते.

नासाने दिलेल्या माहितीनुसार, चारही अंतराळवीर १४ जुलै रोजी भारतीय वेळेनुसार दुपारी ४ वाजून ३५ मिनिटांनी क्रू ड्रॅगन अंतराळयानातून पृथ्वीच्या दिशेने प्रस्थान करतील. हे यान १५ जुलै रोजी दुपारी ३ वाजता कॅलिफोर्नियाच्या किनाऱ्याजवळ समुद्रात उतरेल. परतल्यानंतर, शुक्ला यांना पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणाशी जुळवून घेण्यासाठी आणि त्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी फ्लाइट सर्जनच्या देखरेखीखाली सात दिवस राहावे लागेल.



अमेरिकेची अंतराळ संस्था नासाने शनिवारी » पान ७ वर

# आषाढी वारीत 'लालपरी'ला विठूरायाचा 'महाप्रसाद'...!

**परिवहन**

## ३५ कोटींहूनही अधिक उत्पन्न: उत्पन्नात गतवर्षीपेक्षा सात कोटींची वाढ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूर येथे झालेल्या वारकरी संमेलनात राज्यभरातून सुमारे ९ लाख ७१ हजार भाविकांनी एसटीच्या माध्यमातून प्रवास करत विठुरायाचे दर्शन घेतले. या कालावधीत एसटी महामंडळाने ५,२०० जादा बसफेऱ्यांचे नियोजन केले होते. यामुळे महामंडळाला तब्बल ३५ कोटी ८७ लाख ६१ हजार रुपयांचे उत्पन्न मिळाले असल्याची माहिती परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

वारकऱ्यांची वाढती संख्या आणि त्यांची गरज ओळखून महामंडळाने ३ ते १० जुलै या काळात २१,४९९ बसफेऱ्या राबवल्या. गेल्यावर्षीच्या तुलनेत यंदा उत्पन्नात सात कोटी रुपयांची वाढ झाली आहे, हे विशेष.

पंढरपूर वारीसाठी पुणे विभागातून मोठ्या प्रमाणात जादा बसफेऱ्या सोडण्यात आल्या. स्वारगेट, शिवाजीनगर यासह जिल्ह्यातील विविध आगारांमधून वारीसाठी विशेष सेवा दिली गेली. या सेवेतून पुणे विभागाला २ कोटी १६ लाख रुपयांचे उत्पन्न मिळाले असून, ते गेल्यावर्षीच्या तुलनेत २६ लाखांनी अधिक आहे.



### वारकऱ्यांसाठी एसटीचा विश्वासार्ह पर्याय

- पालखी सोहळ्यात सहभागी न होणारे आणि चालत प्रवास न करता थेट पंढरपूर गाठणारे भाविक एसटीवर मोठ्या प्रमाणात अवलंबून असतात. त्यामुळे राज्यभरातून येणाऱ्या भाविकांना सुरक्षित, वेळेत आणि सोयीस्कर सेवा पुरविण्याचा महामंडळाचा प्रयत्न यशस्वी ठरला.महामंडळाच्या या नियोजनामुळे ना फक्त लाखो भाविकांनी सुखरूप दर्शन घेतलं, तर एसटीलाही मोठा आर्थिक लाभ झाला.



"खासगी बसेसच्या माध्यमातून प्रवास करणे अत्यंत धोकादायक असल्याचे महामंडळाच्या वतीने भाविकांच्या निदर्शनास आणून देण्यात आले होते; विशेष म्हणजे भाविकांनीही महामंडळाच्या आवाहनाला उस्फूर्त प्रतिसाद दिला. त्यासाठी महामंडळाच्या वतीने करण्यात आलेले चोख नियोजन आणि अधिकारी तसेच कामगारांचा त्याला मिळालेला प्रतिसाद यामुळेच उत्पन्नाचे उद्दिष्ठ गाठण्यात अपेक्षेपेक्षाही अधिक प्रमाणात यश आले आहे." — **प्रताप सरनाईक,** परिवहन मंत्री व अध्यक्ष एसटी महामंडळ

#रा



## वाघोली परिसरातील विविध समस्या सोडवा : कटके

**वाघोली :** पुणे महानगरपालिकेचे आयुक्त नवल किशोर राम यांची माजी उपसरपंच तथा वाघोलीचे शासन नियुक्त स्वीकृत नगरसेवक शांताराम कटके यांनी भेट घेऊन वाघोली परिसरातील विविध समस्या व प्रलंबित विकासकामांबाबत सविस्तर चर्चा करून वाघोली परिसरातील विविध समस्या सोडविण्याची मागणी यावेळी कटके यांनी केली.

वाघोली गावासाठीचा डीपीआर तात्काळ मंजूर करून त्यानुसार कामे सुरू करणे,पाणीपुरवठा सुधारणा,नवीन लाइन व गरजेनुसार टँकर सेवा,जन्म-मृत्यू दाखले व इतर प्रमाणपत्रे वाघोलीतच उपलब्ध होणे,रिंग रोड करणे,अंतर्गत रस्त्यांची दुरुस्ती व वाहतूक सुलभता करणे,सुनियोजित कचरा व ड्रेनेज व्यवस्थापन,स्ट्रीट लाईट दुरुस्ती व नव्या लाईट्स लावणे,भैरवनाथ मंदिर परिसर, कुंभार तळे व स्मशानभूमी ठिकाणी सुशोभीकरण,शाळा,अंगणवाडी आणि आठवडी बाजार परिसर सुधारणा, कचरा व विद्युत विभागांतील कामगार वाढवणे व साधनसामग्री उपलब्ध करणे,वाघोलीतील नागरिकांच्या करसंकलनमध्ये सवलत मिळणे,क्रिडांगण होणे,ज्येष्ठ नागरिक भवन होणे,सार्वजनिक वाचनालय या सर्व मागण्यांसह आयुक्त व पुणे महानगरपालिकेचे सर्व विभागप्रमुख,वाघोली ग्रामस्थ यांच्यात संयुक्त बैठक घेण्याचे निवेदन देखील सादर करण्यात आले.



## भरकटलेला राष्ट्रवाद घातक : डॉ. कुमार सप्तर्षी

**पुणे :** महाराष्ट्र गांधी स्मारक निधी आणि युवक क्रांती दल यांच्या संयुक्त विद्यमाने आज, १३ जुलै रोजी कोथरूडमधील गांधी भवन येथे झालेल्या 'गांधी दर्शन' शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. सकाळी ९.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत हा कार्यक्रम पार पडला. या २२ व्या शिबिरात विविध वयोगटांतील कार्यकर्त,नागरिक सहभागी झाले.

शिबिराचे उद्घाटन महाराष्ट्र गांधी स्मारक निधीचे अध्यक्ष डॉ. कुमार सप्तर्षी यांच्या अध्यक्षतेखाली झाले. त्यांनी आपल्या भाषणात गांधी विचारांचे सामाजिक व राजकीय महत्त्व आजही कायम असल्याचे सांगून, युवकांनी गांधी तत्त्वज्ञानाशी नवा संवाद साधावा, असे आवाहन केले.सगळे एकसारखे असावे, असे वाटणारा राष्ट्रवाद हा भरकटतो. राष्ट्रवाद हा प्रगल्भ नसेल तर भरकटतो. गांधीवाद हा भरकटलेल्या राष्ट्रवादाला उत्तर आहे'. असेही ते म्हणाले.

लेखक आणि तंत्रज्ञानतज्ज्ञ डॉ. अच्युत गोडबोले यांनी "कृत्रिम बुद्धिमत्ता आणि समाजावरील परिणाम" या विषयावर अत्यंत समर्पक आणि विचारप्रवर्तक मांडणी केली. त्यांनी तंत्रज्ञानाच्या वेगाने बदलणाऱ्या जगात गांधीजींच्या मूल्यांची गरज अधिक तीव्र असल्याचे अधोरेखित केले.

ज्येष्ठ पत्रकार उत्तम कांबळे यांनी "जागतिकीकरण आणि स्थानिक समाजरचना" यावर भाष्य करताना जागतिकीकरणाच्या विळख्यात हरवणाऱ्या मूल्यांची आठवण करून दिली.

## उत्पादन शुल्क विभागाकडून एक कोटींचा मुद्देमाल जप्त

**पुणे :** राज्य उत्पादन शुल्क विभागाने केलेल्या कारवाईत सासवड गावाच्या हद्दीतील वीरफाट्याजवळ एक कोटी ३३ लाख ७८ हजार ४०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला, अशी माहिती राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक अतुल कानडे यांनी दिली.

सासवड विभागाच्या भरारी पथकाने ही कारवाई केली. पथकाने सापळा रचून संशयित मोटारीची (एमएच ४९-एटी ३४७१) तपासणी केली असता, त्यामधील गोवा राज्यातील बनावट मद्याच्या ५७ हजार ७९२ बाटल्या जप्त करण्यात आल्या. वाहनचालकाविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायदा १९४९ तील कलमानुसार गुन्हा नोंदविण्यात आला असून, आरोपीस अटक करण्यात आली आहे. या कारवाईत उपअधीक्षक संतोष जगदाळे, निरीक्षक संभाजी बरगे यांनी सहभाग घेतला.

## लिपिक; टंकलेखनाचा अंतिम निकाल जाहीर

**पुणे :** राज्यातील हजारो विद्यार्थी पुणे शहरात स्पर्धा परीक्षांची तयारी करत आहेत. मात्र आयोगाच्या विलंबामुळे त्यांच्या स्वप्नांवर पाणी फेरले जात आहे. दोन वर्षांपूर्वी सात हजार पदांसाठी झालेल्या गट 'क' लिपिक आणि टंकलेखनाची परीक्षा घेण्यात आली. परंतु परीक्षेचा अंतिम निकाल अद्यापही जाहीर झाला नसल्याचा प्रश्न आमदार हेमंत रासने यांनी लक्षवेधीद्वारे विधानसभेत उपस्थित केला. त्यानंतर अवघ्या काही तासांत परीक्षेचा अंतिम निकाल जाहीर करण्यात आला.

रासने यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कारभारावर बोट ठेवत परीक्षांचे निकाल वेळेत लागत नाहीत, पात्रता यादी वेळेत जाहीर होत नाही, परिणामी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक, मानसिक आणि आर्थिक नुकसान होते. एमपीएससीला निकालासाठी कालमर्यादा बंधनकारक असावी, उत्तरदायित्व निश्चित करणारी स्वतंत्र समिती किंवा लोकपाल नेमावा, विद्यार्थ्यांसाठी मानसशास्त्र आणि कायदेविषयक सल्ला देणारे केंद्र स्थापन करावे, तसेच केंद्रीय लोकसेवा आयोगाप्रमाणे 'एमपीएससी प्रतिभा सेतू' उपक्रम सुरू करावा, अशी मागणी त्यांनी सभागृहात केली होती.

## बहरला 'ऋतूगंध'...!



**पुणे** 'ऋतूगंध' हा सांगीतिक कार्यक्रम भारतीय विद्या भवनच्या सरदार महादेव बळवंत नातू सभागृह, सेनापती बापट रस्ता येथे रसिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात पार पडला.सहा ऋतूंच्या सान्निध्यात निर्माण होणाऱ्या संगीतसौंदर्याची सुरेल मांडणी या कार्यक्रमातून करण्यात आली.

## 'ऋतूगंध' संगीताविष्काराने रसिक मंत्रमुग्ध

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** भारतीय विद्या भवन, इन्फोसिस फाउंडेशन आणि 'आरंभ, पुणे' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'ऋतूगंध' हा सांगीतिक कार्यक्रम सहा ऋतूंच्या सान्निध्यात निर्माण होणाऱ्या संगीतसौंदर्याची सुरेल मांडणी या कार्यक्रमातून करण्यात आली. ऋतूंशी संबंधित निवडक कविता, संवाद आणि मराठी-हिंदीतील सुरेल गीतांचा मनोहारी संगम यावेळी रसिकांना अनुभवता आला. कार्यक्रमाच्या संकल्पना, संहिता आणि निर्मिती शीतल दामले यांची होती. गायक कलाकारांमध्ये शेखर केंदळे, मीनल केळकर,समीर चिटणीस आणि प्रतिभा देशपांडे यांनी विविध ऋतूंना साजेशी गीते सादर करून श्रोत्यांना मोहिनी घातली. साथसंगत वाद्यवृंदात समीर बंकापुरे (तबला), प्रसन्न बाम (हार्मोनियम), किमया काणे व चिन्मय कुलकर्णी (सिंथेसायझर) आणि आदित्य आपटे (साईड रिदम) यांनी कलाकारांना उत्तम साथ दिली.भारतीय विद्या भवन पुणे केंद्राचे मानद सचिव प्रा. नंदकुमार काकिर्डे,डॉ.सतीश देसाई यांच्या हस्ते कलाकारांचा सत्कार करण्यात आला. सुरेश(काका) धर्मावत,रवी चौधरी असे अनेक मान्यवर उपस्थित होते.

# प्रयोगशाळांच टाकल्या 'वाळीत'...!

### निधीची वाणवा: २५ कुलुपबंद; शासनाचा उपद्व्याप

कोरोनाच्या काळात केवळ दिखावा करण्यासाठी राज्य शासनाने लाखो रुपयांचा निधी खर्चून राज्यभरात तब्बल ३४ अत्याधुनिक प्रयोगशाळा उभारल्या होत्या; त्यामुळे हजारो गरजू नागरिकांना त्याचा लाभ झाला होता. त्यातून अनेक जणांच्या खर्चात बहुतांशी प्रमाणात बचत झाली होती; त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना दिलासा मिळाला होता. मात्र; शासनाची ही केवळ 'नवलाई' ठरली आहे. कोरोनाची साथ संपुष्टात येताच राज्य शासनाने त्यांना अक्षरश: 'वाळीत' टाकले आहे; त्यांना गेल्या कित्येक वर्षांपासून निधीच दिलेला नाही. त्यामुळे त्यांना कुलुप ठोकण्याची नामुष्की स्थानिक प्रशासनावर आली आहे; त्याचा जबरदस्त फटका सर्वसामान्य नागरिकांना बसत आहे.

> "राज्यात सध्या सुरू असलेल्या ९ प्रयोगशाळांमध्ये आधुनिक यंत्रणा असून, त्या डेंग्यूसारख्या आजारांच्या निदानासाठी अत्यंत उपयुक्त ठरत आहेत. मात्र, यंत्रणा कार्यान्वित ठेवण्यासाठी आणि त्यांचा प्रभावी वापर सुनिश्चित करण्यासाठी निधीची तातडीने आवश्यकता आहे.
> **-डॉ. बबिता कमलापूरकर;** उपसंचालक, आरोग्य विभाग



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** कोरोना महामारीच्या काळात चोख तपासणीसाठी उभारण्यात आलेल्या ३४ प्रयोगशाळांपैकी सध्या केवळ ९ प्रयोगशाळा कार्यरत आहेत. कोरोना रुग्णसंख्या घटल्याने तपासण्यांचे प्रमाणही कमी झाले असून अनेक प्रयोगशाळा निधीअभावी बंद पडल्या आहेत. कार्यरत असलेल्या प्रयोगशाळांमध्ये मात्र इतर संसर्गजन्य आजारांचे निदान व संशोधनासाठी प्रयत्न सुरू आहेत.

कोरोनाच्या काळात अत्यावश्यक समजल्या गेलेल्या या प्रयोगशाळांची आता इतर आजारांसाठी उपयुक्तता लक्षात घेता, त्यांचे "बहुउद्देशीय निदान केंद्रां"मध्ये रूपांतर करण्याचा प्रस्ताव आरोग्य विभागाने केंद्र सरकारकडे पाठवला आहे. केंद्र सरकारकडून निधी मंजूर झाल्यास, या प्रयोगशाळांचा यंत्रसामग्रीसह पूर्ण क्षमतेने उपयोग होऊ शकतो, अशी माहिती आरोग्य विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली.

सध्या सुरू असलेल्या प्रयोगशाळांमध्ये डेंग्यू, चिकनगुनिया, झिका, स्वाईन फ्लूसारख्या संसर्गजन्य आजारांचे निदान केले जात आहे. तसेच, काही प्रयोगशाळांमध्ये कर्करोग निदानासाठीही यंत्रणा वापरण्याची प्रक्रिया सुरू आहे. काही प्रयोगशाळांना खासगी कंपन्यांकडून सीएसआर (कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी) अंतर्गत निधी मिळाला आहे, तर उर्वरित प्रयोगशाळा शासनाच्या निधीची प्रतीक्षा करत आहेत.

कोरोनाच्या काळात आरटीपीसीआर चाचण्यांसाठी वापरली जाणारी आधुनिक यंत्रणा - आरटीपीसीआर मशिन्स, आरएनए एक्स्ट्रॅक्शन युनिट्स, डीप फ्रीझर, बायोसेफ्टी कॅबिनेट्स यांची नियमित देखभाल केली जात आहे. यंत्रसामग्रीच्या निर्जंतुकीकरणासाठी विशिष्ट केमिकल्स वापरले जातात, तसेच तीन ते सहा महिन्यांच्या अंतराने कॅलिब्रेशन करण्यात येते.

बहुतेक प्रयोगशाळांनी उपकरण पुरवठादार कंपन्यांशी वार्षिक देखभाल करार (AMC) किंवा सर्वसमावेशक देखभाल करार (CMC) केलेले आहेत. या अंतर्गत कंपन्यांकडून वेळोवेळी तांत्रिक सेवा पुरवली जाते.

प्रयोगशाळांतील यंत्रणा अत्यंत नाजूक असल्याने त्याचे संचालन करणारे कर्मचारी विशेष प्रशिक्षित असतात. यंत्रणा बिघडू नयेत यासाठी योग्य तापमान आणि आद्रतेमध्ये ठेवण्यावर भर दिला जातो. प्रयोगशाळांमध्ये वातानुकूलन आणि ह्यूमिडिटी नियंत्रण यंत्रणांचा भाग म्हणून कायमस्वरूपी देखरेख ठेवली जाते.

## जुलैतच पुणेकरांचा पाण्याचा प्रश्न सुटला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** यंदा मान्सूनने वेळेआधी हजेरी लावल्याने पुणे शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणसाखळीतील साठा लक्षणीय वाढला आहे. जुलैच्या पहिल्या पंधरवड्यातच खडकवासला धरणसाखळीत ७० टक्के म्हणजेच सुमारे २१ टीएमसी इतका पाणीसाठा जमा झाला आहे. त्यामुळे पुणेकरांचा वर्षभराचा पाण्याचा प्रश्न सुटला आहे.



पानशेत, वरसगाव, टेमघर आणि खडकवासला या चार धरणांमधून पुण्याला पाणीपुरवठा केला जातो. या चारही धरणांची उपयुक्त साठवण क्षमता २९.५० टीएमसी इतकी आहे. यंदा २० मेपासूनच पाणलोट क्षेत्रात पावसाने चांगली सुरुवात केली. जून महिन्यातही दमदार पावसामुळे साठ्यात सातत्याने भर पडत गेली. परिणामी, १८ जून रोजीच खडकवासला धरण पूर्ण क्षमतेने भरले.

सध्या पानशेत धरण ७० टक्के, वरसगाव ७६ टक्के तर टेमघर ६६ टक्के भरले असून, उर्वरित साठा लवकरच पूर्ण होण्याची शक्यता आहे. यामुळे जुलै अखेरपर्यंत चारही धरणे शंभर टक्के क्षमतेने भरतील, असा अंदाज आहे.

**शहराची पाण्याची गरज आधीच पूर्ण**

पुणे शहराला वर्षभरासाठी साधारणतः १७ ते १८ टीएमसी पाण्याची गरज असते. सध्याच्या उपलब्ध साठ्यानुसार ही गरज जुलैच्या मध्यावरच पूर्ण झालेली आहे. त्यामुळे यंदा पाणीकपातीचा धोका दूर झाला असून, नागरिकांना नियमित आणि पुरेसा पाणीपुरवठा मिळण्याची खात्री बळावली आहे.

याच कालावधीत, मुठा नदीपात्रात ५ टीएमसीहून अधिक पाणी सोडण्यात आले असून, यामुळे नदीकाठच्या परिसरांतील पाण्याचा प्रवाहही कायम राहिला आहे.

**पावसाची कामगिरी विक्रमी होण्याची शक्यता**

गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा जूनपासून अधिक प्रमाणात पाऊस झाला आहे. १ जून २०२५ ते आतापर्यंतच्या कालावधीत झालेल्या पावसामुळे संपूर्ण धरण क्षेत्रात समाधानकारक साठा झाला आहे. पावसाचा जोर असाच कायम राहिल्यास सप्टेंबरअखेर विक्रमी पावसाची नोंद होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

## लालमहाल चौकात 'शिववारसा' गौरव आनंद सोहळा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** छत्रपती शिवरायांचा त्रिवार जयजयकार... चे स्वर ऐतिहासिक लाल महाल चौकात दुमदुमले आणि छत्रपती शिवरायांच्या १२ दुर्गांची नोंद युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समाविष्ट करण्यात आली यानिमित्त शिवभक्त व शाहीरांचा 'शिववारसा' आनंद सोहळा पार पडला. यावेळी हातात भगवे झेंडे घेऊन बालशाहीरांनी देखील उत्साहाने सहभाग घेतला.

श्री शिवनेरी स्मारक समिती व शाहीर हिंगे लोककला प्रबोधिनी, पुणे च्या वतीने लालमहाल चौकात 'शिववारसा' गौरव आनंद सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी पुणेकरांना साखर वाटण्यात आली. प्रबोधिनीचे अध्यक्ष आचार्य शाहीर हेमंतराजे मावळे, प्रा. संगीता मावळे, अरुणकुमार बाभुळगावकर, इतिहास प्रेमी तेजपाल शहा आदी उपस्थित होते.

आचार्य शाहीर हेमंतराजे मावळे म्हणाले, महाराष्ट्रातील प्रामुख्याने पुणे जिल्ह्यातील छत्रपती शिवरायांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या किल्ल्यांचा युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समावेश करण्यात आला आहे. याचा आम्हाला अभिमान आहे. हे सर्व किल्ले सतराव्या शतकात बांधले गेलेले आहेत. हे किल्ले मराठा सैन्याच्या असामान्य लष्करी व्यवस्थेचा आणि अभेद्य तटबंदीचा भक्कम पुरावा आहेत. शाहिरांनी आजपर्यंत शिवरायांच्या शौर्याची आणि या शौर्यस्थळांची कीर्ती सर्वदूर पोहोचविण्याचे कार्य केले. आता हा दर्जा मिळाल्याने साता समुद्रापार कीर्ती पोहोचणार आहे.



**पुणे** श्री शिवनेरी स्मारक समिती व शाहीर हिंगे लोककला प्रबोधिनी, पुणे च्या वतीने लालमहाल चौकात 'शिववारसा' गौरव आनंद सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी पुणेकरांना साखर वाटण्यात आली.

# साक्षीभावात राहिल्यास जीवनातला प्रत्येक क्षण आनंददायी




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** साक्षीभाव साध्य झाल्यास कोणतेही विचार, कल्पना, भावना किंवा पूर्वग्रह नाहीत अशी एका शांत, तरल, संवेदनाक्षम अवस्था प्राप्त होते. ही साक्षीभाव अवस्था संपूर्णत: ज्ञान-विज्ञान, कर्म आणि चैतन्याने परिपूर्ण असते. त्यामुळे साक्षीभावाच्या आधारे जीवनातल्या कोणत्याही बिकट समस्येवर यथार्थ उत्तर मिळते त्याचप्रमाणे अपेक्षित कार्यही हातून घडते आणि जीवनातला प्रत्येक क्षण आनंददायी ठरतो, असे प्रतिपादन गुरुतत्त्वयोग तत्त्वप्रणालीचे प्रणेते अभयकुमार सरदार यांनी केले.

गुरुपौर्णिमेनिमित्त गुरुतत्त्वयोग संस्थेच्या शिवाजीनगर येथील ध्यानमंदिरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. गुरुतत्त्वयोग प्रणालीचे प्रणेते अभयकुमार सरदार यांची प्रमुख उपस्थिती होती. त्या वेळी ते बोलत होते. या वेळी गुरुतत्त्ववेध स्मरणिकेचे प्रकाशन अभयकुमार सरदार, तेजा दिवाण, राजश्री करे, तेजस दशरथ, सुचित्रा पेंडसे यांच्या हस्ते करण्यात आले.

गुरुपौर्णिमेनिमित्त 'निसर्गातील कार्यक्षमता' या विषयावर अनोखे प्रदर्शन भरविण्यात आले आहे. निसर्गातील कोणतीही रचना, कार्यप्रणाली अतिशय कार्यक्षम असते. गुरुतत्त्वाने प्रत्येक जीवाला जगण्यासाठी, प्रतिकूल परिस्थितीत तग धरून राहण्यासाठी काही शारीरिक रचना दिल्या आहेत. या गुणधर्मांचा वापर करून प्राणिमात्र अंत:प्रेरणेने, सहजप्रवृत्तीने जगतात आणि त्यामुळेच ते कार्यक्षम असतात. गुरुतत्त्व हे फक्त मानावापुरते मर्यादित नसून ते सर्व निसर्गाचे मार्गदर्शक तत्त्व आहे, याचा उलगडा या प्रदर्शनातून पहायला मिळाला.

**विद्यार्थीनींचे अभ्यासपूर्ण विवेचन**
**गुरुतत्त्वयोगाच्या अभ्यासासाठी आणि त्याच्या साधनेसाठी योग्य वातावरण निर्माण करून देणे आणि हे तत्त्वज्ञान जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवणे हे गुरुतत्त्वयोग सार्वजनिक धर्मार्थ विश्वस्त संस्थेचे ध्येय आहे. 'गुरुतत्त्वाची शिकवण-साक्षीभावाद्वारे वैयक्तिक कार्यक्षमता' या विषयावर तेजा दिवाण व सुचित्रा पेंडसे यांनी अभ्यासपूर्ण विवेचन सादर केले तर राजश्री करे, तेजस दशरथ आणि प्रचिती पाध्ये यांनी गुरुतत्त्वाच्या साधनेतून आलेल्या अनुभवांचे कथन केले.**



## उर्मिला बनकर यांची निवड

**पुणे :** शिवसेना प्रणित ओबीसी महिला आघाडीच्या शहराध्यक्षपदी उर्मिला जगमोहन बनकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. उपमुख्यमंत्री आणि शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्या आदेशाने समन्वयक डॉ. पी. बी. कुंभार यांनी त्यांना नियुक्तीचे पत्र दिले. त्यांचा कार्यकाळ एक वर्षांचा असून त्यांच्यावर शहरातील आठही मतदारसघाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. ओबीसी समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन त्यांना सहकार्य करण्यात येणार असून या माध्यमातून पक्षाच्या संघटन बांधणीवर सर्वाधिक भर देण्यात येइल, अशी ग्वाही बनकर यांनी निवडीनंतर बोलताना दिली.



## संकर्षण कऱ्हाडे यांना गुणवत्ता पुरस्कार

**पुणे :** कलाकार,लेखक,कवी अशा विविध क्षेत्रांत उत्तम कामगिरी बजावणारे संकर्षण कऱ्हाडे यांना रोटरीचा व्होकेशनल एक्सलंस अवॉर्ड – व्यावसायिक गुणवत्ता पुरस्कार प्रदान करण्यात आला. रोटरी क्लब सिंहगडरोड. रोटरी क्लब विज्डम व रोटरी क्लब फार इस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने प्रदान करण्यात आला. भावे हायस्कूल सभागृह येथे नुकत्याच झालेल्या या कार्यक्रम प्रसंगी रोटरी क्लब सिंहगडचे अध्यक्ष अमेय पासलकर, विज्डमच्या अध्यक्ष स्वाती यादव, फार इस्टचे अध्यक्ष प्रियल शाह, आदी मान्यवरांच्या बरोबरच विविध ११ रोटरी क्लबचे अध्यक्ष, पदाधिकारी, सदस्य व कुटुंबीय उपस्थित होते. मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप होते.या मानपत्राचे लेखन रवी रांजेकर यांनी केले होते. या कार्यक्रमात रोटरी क्लब युनिवर्सिटीचे अनिरुद्ध रांजेकर यांनी त्यांची प्रकट मुलाखत घेतली. या वेळी संकर्षन कऱ्हाडे यांनी उत्तर देतांना आपले कलाविषयक विचार,कुटुंब व कार्यक्रमात होणारे गमतीशीर प्रसंग सांगितले, तसेच काही कविता सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

## रोटरी क्लब एलीगंटच्या अध्यक्षपदी संजय कुलकर्णी

**पुणे :** रोटरी क्लब एलीगंटच्या अध्यक्षपदी संजय कुलकर्णी यांची निवड करण्यात आली. मावळते



अध्यक्ष रजत चित्रवंशी यांच्याकडून त्यांनी सूत्रे स्विकारली. सचिवपदी शिल्पा बागडी यांची निवड करण्यात आली. हॉटेल सदानंद येथे संपन्न झालेल्या या कार्यक्रम प्रसंगी प्रांतपाल संतोष मराठे, सहाय्यक प्रांतपाल संकेत सराफ आदी मान्यवरांच्या बरोबरच रोटरी पदाधिकारी, सदस्य व कुटुंबीय उपस्थित होते. या प्रसंगी बोलतांना नवनिर्वाचित अध्यक्ष संजय कुलकर्णी यांनी आगामी काळात गोसेवा, कृषी, युवा, पर्यावरण इत्यादी क्षेत्रांसाठी विविध समाजोपयोगी प्रकल्प राबविणार असल्याचे सांगितले.

## पं. यादवराज फड यांची संगीत मैफिल संपन्न

**पुणे :** पं. पुरुषोत्तम शास्त्री फडके संस्कृत पाठशाळा आणि निपुण इन्शुरन्स कंपनीतर्फे आषाढी



एकादशीनिमित्त पं. यादवराज फड यांच्या 'वैकुंठीच्या राया' या अभंगवाणीच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. पं. फड यांनी कार्यक्रमाची सुरुवात पंचपदीने केली. त्यानंतर 'पंढरी निवासा सख्या पांडुरंगा', 'वैकुंठ पंढरी भिवरेचे तीरी', 'संत कृपा झाली', 'माझे माहेर पंढरी' आदी रचना सादर केल्या. 'जे का रंजले गांजले' आणि 'अगा वैकुंठीच्या राया' या दोन भैरवीतील रचनांच्या सादरीकरणाने कार्यक्रमाची सांगता झाली. त्यांना तबल्यावर विशाल मोरे, संवादिनीवर सुधीर टेकाळे, मृदंगावर आसाराम साबळे, टाळासाठी शिवाजी डाके आणि स्वरसाथ अमोल मोरे व रवी पंडित यांनी साथसंगत केली. पं. निळकंठ फडके यांनी आभार मानले.

# प्रशासकीय हलगर्जीपणाचा 'खळखळाट'....!

## आंबीलओढा सीमाभिंतीचा ३० कोटींचा निधी जिल्हाधिकाऱ्यांच्या खात्यात : दोन खात्यात समन्वयाचा अभाव

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**पुणे :** शहरातील नाल्यांना सीमाभिंत बांधून पूरस्थिती रोखण्यासाठी राज्य सरकारने मंजूर केलेल्या २०० कोटी रुपयांच्या निधीपैकी सुमारे ३० कोटी रुपयांचा निधी गेल्यावर्षीच जिल्हाधिकाऱ्यांच्या खात्यात जमा झाला होता. मात्र पुणे महापालिकेला त्याबाबत कोणतीही अधिकृत माहिती दिली गेली नाही. परिणामी, निधी न मिळाल्याचे कारण पुढे करत महापालिकेने संपूर्ण निविदा प्रक्रिया एप्रिल महिन्यात रद्द केल्याचे उघड झाले आहे.

या प्रकरणामुळे प्रशासकीय समन्वयाच्या अभावावर पुन्हा एकदा बोट ठेवले जात असून, आता संबंधित निधीची माहिती महापालिकेकडून लपवण्यात आली की दुर्लक्षित झाली, यावरून वाद निर्माण झाला आहे. सत्ताधारी गटात यासंदर्भात अंतर्गत मतभेद असल्याच्या चर्चांना देखील उधाण आले आहे.

सप्टेंबर २०१९ मध्ये ढगफुटीमुळे आंबिल ओढ्याला पूर आला होता. या पुरामध्ये पुण्याच्या दक्षिण भागातील अनेक वस्त्यांना मोठा फटका बसला होता. अनेक सोसायट्यांचे कंपाउंड वॉल कोसळले, घरांमध्ये पाणी शिरले, आणि २० पेक्षा अधिक नागरिकांचा बळी गेला होता. या घटनेनंतर महापालिकेने आंबिल ओढ्याच्या दोन्ही बाजूंना संरक्षण भिंती व पूल बांधण्याचे काम सुरू केले होते. काही ठिकाणी तांत्रिक अडचणींमुळे ही कामे रखडली.

**राज्य सरकारचा निधी आणि महापालिकेची कारवाई**

या पार्श्वभूमीवर, २०२५-२६ या आर्थिक वर्षात राज्य सरकारने २०० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला होता. मार्च २०२४ मध्ये या निधीस मान्यता देण्यात आली आणि जुलैमध्ये स्वतंत्र आदेश काढून कोणत्या भागांमध्ये काम होणार आहे व त्यासाठी किती खर्च अपेक्षित आहे, याचेही स्पष्ट निर्देश देण्यात आले.

महापालिकेने निधी मिळेल या अपेक्षेने निविदा प्रक्रिया सुरू केली होती. मात्र, निधी प्रत्यक्षात न मिळाल्यामुळे सहा महिन्यांनी ही निविदा एप्रिल २०२५ मध्ये रद्द करण्यात आली.

आता मात्र जिल्हाधिकारी कार्यालयाकडून महापालिकेला पाठवलेल्या पत्रात स्पष्ट करण्यात आले आहे की, २९ कोटी ८० लाख रुपयांचा निधी गेल्यावर्षीच त्यांच्या कार्यालयाकडे जमा झाला होता. ही माहिती इतक्या उशिराने महापालिकेच्या निदर्शनास येणे, आणि त्याआधी निधीच्या अभावामुळे निविदा रद्द करणे, हे गंभीर प्रशासकीय विसंगतीचे लक्षण मानले जात आहे.

या प्रकरणावरून आता राजकीय आरोप-प्रत्यारोप सुरु झाले असून, सत्ताधारी गटातील लोकप्रतिनिधींमध्ये याविषयी एकमत नसल्याने मुद्दामहून ही माहिती लपवण्यात आली असावी, अशी शक्यता वर्तवली जात आहे.

पुणेकरांच्या सुरक्षिततेसाठी महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या सीमाभिंतीच्या कामांमध्ये निधी, माहिती व नियोजन यातील विसंवादामुळे मोठा खोळंबा झाला आहे. या प्रकाराची सखोल चौकशी होऊन जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई व्हावी, अशी मागणी नागरिकांतून होऊ लागली आहे.



> या निधीच्या संदर्भात महापालिकेतील संबधित खात्याने राज्य शासनाशी समन्वय साधणे आवश्यक होते; परंतु त्यामध्ये निष्काळजीपणा केल्याचे निदर्शनास आले असून ही बाब निश्चितच गंभीर अशीच आहे. त्याचा जबरदस्त फटका बसण्याची शक्यता आहे; ही बाब लक्षात घेऊन यापुढील कालावधीत असे प्रकार घडणार नाहीत याची दक्षता घेण्यात येणार आहे.
>
> **-नवलकिशोर राम,** आयुक्त, पुणे महापालिका

# अनधिकृत होर्डिंगची 'चिरफाड'....!

### अधिकाऱ्यांचा खोटारडेपणा उघड : ४१ होर्डिंग अनधिकृत

राजकीय नेते आणि सामाजिक कार्यकर्त्यांच्या होर्डिंगमुळे शहराच्या विद्रुपीकरणात चांगलीच वाढ झाली आहे; त्यातूनच अपघाताचा मोठा धोका वाढला आहे. हे वास्तव असले तरीही त्यावर प्रशासनाचा कोणताही वचक राहिलेला नाही; विशेष म्हणजे अनेक राजकीय कार्यकर्ते प्रशासनाच्या नाकावर टिच्चून होर्डिंग लावत आहेत. धक्कादायक बाब म्हणजे त्यांचा हा उपदव्याप सुरु असतानाही प्रशासन मूग गिळून गप्प आहे; त्यामुळे या अनाधिकृत होर्डिंगवाल्यांचे आणखीनच फावत चालले आहे. त्यासाठी प्रशासनातील 'दबंग' अधिकारी अशी प्रतिमा असलेल्या नवलकिशोर राम यांनी त्यासाठी पुढाकार घेतला होता. या तपासणीत तब्बल ४१ होर्डिंग अनाधिकृत असल्याचे दाहक वास्तव उजेडात आले आहे.

> महापालिकेने ही तपासणी मोहीम सुरूच ठेवली असून, उर्वरित १२ कार्यालयांचीही लवकरच झाडाझडती घेतली जाणार आहे. तपासणीत दोषी आढळलेल्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार आहे, यापुढील कालावधीत या तपासणीत सातत्य ठेवण्यात येणार आहे. तसेच यामध्ये दोषी आढळलेल्या कोणाचीही गय केली जाणार नाही.
>
> **-नवलकिशोर राम,** आयुक्त, पुणे महापालिका

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे:** पुणे शहरात अनधिकृत जाहिरात फलकांची संख्या दिवसेंदिवस वाढत असूनही, महापालिकेच्या काही क्षेत्रीय कार्यालयांनी आपल्या हद्दीत एकही अनधिकृत होर्डिंग नसल्याचा अहवाल दिला होता. मात्र, महापालिका आयुक्तांच्या आदेशाने नेमण्यात आलेल्या विशेष तपासणी पथकांनी केलेल्या कारवाईत तीन क्षेत्रीय कार्यालयांच्या हद्दीत तब्बल ४१ अनधिकृत होर्डिंग आढळून आली आहेत. त्यामुळे खोटे अहवाल सादर करणाऱ्या अधिकाऱ्यांची अडचण वाढली आहे.



महापालिकेने यंदाच्या पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर सुरक्षेचा विचार करत अनधिकृत होर्डिंग तातडीने हटविण्याचे निर्देश सर्व १५ क्षेत्रीय कार्यालयांना दिले होते. त्यानुसार १४ कार्यालयांनी दिलेल्या अहवालात केवळ २४ अनधिकृत होर्डिंग असल्याचे नमूद करण्यात आले होते. आयुक्तांनी या फलकांच्या तत्काळ हटविण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार आकाशचिन्ह व परवाना विभागाने २२ फलक हटवले, तर उर्वरित दोन प्रकरणांत वाद सुरू आहे.

मात्र, ६ जूनपासून सुरू झालेल्या तपासणी मोहिमेत तीन क्षेत्रीय कार्यालयांच्या हद्दीत ४१ अनधिकृत होर्डिंग आढळून आले आहेत. त्यामुळे उर्वरित कार्यालयांमध्ये देखील अशीच स्थिती असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. यावरून काही अधिकारी खोटे अहवाल देऊन अनधिकृत फलकांना पाठीशी घालतात का, असा संशय निर्माण झाला आहे.

**अधिक शुल्काचा मार्ग चुकवण्यासाठी 'डील'?**

महापालिकेच्या अधिकृत होर्डिंग परवान्यासाठी शुल्क जास्त असल्यामुळे अनेक व्यावसायिक थेट अनधिकृत फलक लावण्याचा मार्ग अवलंबत असल्याचे उघड झाले आहे. विशेषतः नव्याने समाविष्ट झालेल्या गावांमध्ये मोठ्या प्रमाणात अशा फलकांची भर आहे. यात काही अधिकाऱ्यांच्या संमतीने आर्थिक देवाणघेवाण होत असल्याचा आरोपही होत आहे.

**नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न**

शहरात यंदा पावसाळ्याच्या सुरुवातीलाच तीन ठिकाणी होर्डिंग कोसळण्याच्या घटना घडल्या आहेत. तरीदेखील प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे धोकादायक पद्धतीने उभारलेली होर्डिंग पुणेकरांच्या जीवावर उठलेली आहेत. अशा परिस्थितीत महापालिका आयुक्त या प्रकरणी कशी भूमिका घेतात आणि दोषींवर कारवाई करतात का, याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.

**महत्वाचे आकडे :**

- शहरात अधिकृत होर्डिंग : २,६४०
- अहवालानुसार आधी नमूद अनधिकृत होर्डिंग : २४
- तपासणीत आढळलेली नवी अनधिकृत होर्डिंग : ४१ (फक्त ३ विभागांत)
- होर्डिंग कोसळल्याच्या घटना : ३ (यंदाच्या पावसाळ्यात)
- संपर्कात असलेले अधिकारी तपासाच्या कक्षेत; कठोर कारवाईची शक्यता

# तब्बल पाच लाख 'लाडक्या बहिणी' अपात्र

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** विधानसभा निवडणुकीपूर्वी गाजावाजा करून सुरू करण्यात आलेली 'मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना' सध्या अडचणीत सापडली आहे. पात्र महिलांना आर्थिक मदत देण्याच्या हेतूने सुरू करण्यात आलेल्या या योजनेचे पोर्टल गेले काही महिने बंद असून, नव्याने अर्ज करू इच्छिणाऱ्या महिलांना नोंदणीच करता येत नाही. परिणामी, अनेक पात्र महिलांना योजनेंतर्गत लाभ मिळू शकलेला नाही.

मतदानाचा अधिकार १८व्या वर्षी असतानाही या योजनेसाठी २१ वर्षे वयाची अट ठेवण्यात आली आहे. त्यामुळे अनेक तरुण महिलांना योजनेपासून वंचित राहावे लागत आहे. शिवाय, गेल्या वर्षभरात २१ वर्षे पूर्ण केलेल्या नव्या लाभार्थींना अर्ज करता येऊ नये, यासाठीच शासनाने पोर्टल बंद केल्याची चर्चा आहे.

दरम्यान, योजनेंतर्गत लाभ घेत असलेल्या महिलांची छाननी करण्यात येत आहे. यामध्ये वार्षिक उत्पन्नाची मर्यादा दोन लाख पन्नास हजार रुपयांपर्यंत ठेवण्यात आली आहे. मात्र, अनेक लाभार्थींनी ही अट पूर्ण न केल्याचे आढळून आल्याने मोठ्या प्रमाणावर अर्ज फेटाळले जात आहेत.

महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी सोशल मीडियावर माहिती देताना सांगितले की, आतापर्यंत सुमारे पाच लाख महिलांना अपात्र ठरवण्यात आले आहे. २८ जून व ३ जुलै २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार ही कारवाई करण्यात आली. शासनाच्या म्हणण्यानुसार, लाभ फक्त पात्र महिलांनाच मिळावा, यासाठी निकष अधिक काटेकोर करण्यात आले आहेत.

ही योजना खरोखरच महिलांच्या सक्षमीकरणासाठी होती की फक्त निवडणूकपूर्व लोकप्रियतेसाठी, असा सवाल सध्या अनेक ठिकाणी विचारला जात आहे. सुरुवातीला मोठ्या प्रमाणावर प्रचार झाल्यानंतर आता निधीअभावी अडथळे निर्माण होणे, पोर्टल बंद ठेवणे आणि अपात्र ठरवण्याच्या प्रक्रियेला वेग देणे — हे सर्व प्रश्न निर्माण करत आहे.

सुरुवातीच्या टप्प्यात या योजनेत २ कोटी ६५ लाख महिलांनी नोंदणी केली होती. त्यानंतर सुमारे ११ लाख महिलांना विविध कारणांनी अपात्र ठरवले गेले. सध्या शासन उत्पन्नाचे दस्तऐवज, आयटीआर तपासणी आदी माध्यमातून पात्रतेची शहानिशा करत आहे. त्यानंतर आणखी महिलांना योजनेतून बाहेर काढले जाण्याची शक्यता आहे.

योजनेचा लाभ सुरू राहील की बंद होईल, यावर सरकारकडून अद्याप ठोस भूमिका मांडली गेलेली नाही.

# राज्यस्तरीय सौंदर्य स्पर्धेतील विजेत्यांचा सन्मान

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** जनकल्याण बहुउद्देशीय फाउंडेशन, पुणे आणि आशुतोष डान्स स्टुडिओज यांच्या संयुक्त विद्यमाने नृत्यकला संगम आणि अँजेलिक फेस ऑफ पुणे - सौंदर्य स्पर्धा या स्पर्धेतील विजेत्यांच्या सन्मान सोहळ्याचे नवी पेठेतील पत्रकार भवन येथे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्याला विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

वायब्रंट ग्रुप ऑफ कंपनीच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अश्विनी जाधव, पी.के. ट्रेडर्सचे शिवाजी इंडे, पुणे बिझनेस क्लबच्या संस्थापक सपना काकडे, अभिनेता निखिल निगडे, सेलिब्रिटी मेकअप आर्टिस्ट प्रीत पाटील, फर्स्ट लेडी बाऊन्सर सिक्युरिटी ग्रुपच्या संस्थापक दीपा परब, तसेच आयोजक आशुतोष अभिजीत संकाये पाटील उपस्थित होते.

या स्पर्धेत विविध वयोगटांतील स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. किड्स कॅटेगरीत साक्षी रामदासी हिने प्रथम क्रमांक पटकावला. टीन्स कॅटेगरीत स्वरा पाथरूडकरहिने बाजी मारली. मिस कॅटेगरीत धनश्री गायकवाड विजेती ठरली, तर मिसेस कॅटेगरीत प्रतीक्षा वालगुडे हिने प्रथम क्रमांक मिळवला. 'मोस्ट पॉप्युलर फेस ऑफ द इव्हेंट' हा किताब तितीक्षा राजेमाने हिला मिळाला.



**पुणे** जनकल्याण बहुउद्देशीय फाउंडेशन, पुणे आणि आशुतोष डान्स स्टुडिओज यांच्या संयुक्त विद्यमाने नृत्यकला संगम आणि अँजेलिक फेस ऑफ पुणे - सौंदर्य स्पर्धा या स्पर्धेतील विजेत्यांच्या सन्मान सोहळ्याचे आयोजन नवी पेठेतील पत्रकार भवन येथे करण्यात आले होते. या सोहळ्याला विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

# शाश्वत विकास आणि आपत्तीरोधक बांधकामे काळाची गरज - अजित पवार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** भारत देश आज जगातील तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था होण्याच्या मार्गावर आहे, कारण आपल्या देशाचा विकासाचा वेग वाढला आहे, यामध्ये मोठ्या प्रकल्पांचा महत्त्वपूर्ण वाटा आहे. आपल्याकडे इंग्रजांनी बांधलेल्या वास्तू, पूल आजही अनेक ठिकाणी सुस्थितीत असल्याचे दिसते मात्र आपण चाळीस वर्षांपूर्वी केलेल्या कामाचे पुनर्निर्माण करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे हे का होत आहे याचा विचार करण्याची गरज आहे. आज पर्यावरणपूरक



शाश्वत विकास आणि आपत्ती रोधक बांधकामे काळाची गरज असल्याचे मत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केले.

भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेच्या सभागृहात रविवारी प्रोफेशनल स्ट्रक्चरल इंजिनिअर्स असोसिएशन या संस्थेचे उद्घाटन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी ते बोलत होते. या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष शेषराव कदम, सचिव अजय कदम, कोषाध्यक्ष अजय ताम्हणकर, नारायण कोचक, अशोक मोरे, विरेंद्र चव्हाण, नितीन लाळे, अंशुमन भिडे आदी मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले स्ट्रक्चरल इंजिनिअर्स चे काम अतिशय महत्त्वपूर्ण आहे, संस्थेची स्थापना फार पूर्वी होणे गरजेचे होते. एखादा पूल किंवा इमारत कोसळली की आपल्याला स्ट्रक्चरल ऑडिट आठवते मात्र बांधकाम सुरू करण्यासाठी त्यांचे योगदान महत्वाचे असते त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. पूर्वीची बांधकामे मजबूत होती आजही आपण त्याच धर्तीवर काम करत आहोत मात्र त्यात बदलत्या तंत्रज्ञानाचा वापर करणे आवश्यक आहे, या सोबतच ते काम दीर्घकाळ टिकणारे असावे याची खात्री करणे गरजेचे आहे.

एकूण स्ट्रक्चरल इंजिनिअर फार कमी आहेत त्यातही नवीन पिढी या क्षेत्रात येत नसेल तर नियमांत काय बदल करणे आवश्यक आहे. कार्यक्रमात शहर अभियंता प्रशांत वाघमारे यांच्यासह मान्यवरांचा सन्मान करण्यात आला तसेच उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते कार्यकारिणी सदस्यांना प्रमाणपत्रे देण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वर्षा कानेटकर यांनी केले तर आभार अजय ताम्हणकर यांनी मानले.

> स्ट्रक्चरल इंजिनिअर्सना भारतीय संविधानात स्थान मिळावे, त्यांचा कायदेशीर दर्जा ठरावा आणि त्यांच्या कार्याचे महत्त्व मान्य व्हावे यासाठी "इंजिनिअर्स बिल" च्या माध्यमातून प्रयत्न केले जाणार आहेत. हा कायदा कार्यान्वित झाल्यास, स्ट्रक्चरल इंजिनिअर्सना स्वतंत्र ओळख, अधिक अधिकार व जबाबदाऱ्या प्राप्त होतील आणि त्यांचे योगदान अधिक प्रभावी ठरेल.
>
> **-शेषराव कदम;** अध्यक्ष प्रोफेशनल स्ट्रक्चरल इंजिनिअर्स असोसिएशन

## मणिपाल रुग्णालयाकडे ‘सह्याद्री’चा ताबा

**पुणे :** देशातील खासगी रुग्णालयांच्या साखळीपैकी एक असलेल्या मणिपाल रुग्णालयाने पुण्यासह राज्यातील ११ सह्याद्री रुग्णालये विकत घेण्यासाठी अंतिम करारावर स्वाक्षरी केली आहे. कॅनडाच्या ‘आँटॅरिओ टीचर्स पेन्शन प्लॅन’ या गुंतवणूकदार संस्थेने सहा हजार ४०० कोटी रुपयांना हा करार केला आहे. त्यामुळे पश्चिम भारतात व विशेषतः पुण्यातील खासगी आरोग्य क्षेत्रात मणिपाल रुग्णालय ग्रुपचा प्रभाव वाढला आहे.

अनेक महिन्यांपासून सह्याद्री रुग्णालयाच्या खरेदीबाबत चर्चा सुरू होती. त्यासाठी देशातील मणिपालसह अनेक साखळी रुग्णालये इच्छुक होती. अखेर मणिपाल रुग्णालयाने ‘सह्याद्री’चा अधिकृत ताबा घेतल्याची घोषणा केली आहे. सह्याद्री रुग्णालयाची राज्यात १४०० खाटांची ११ रुग्णालये असून, त्यापैकी आठ पुण्यात तर उर्वरित तीन रुग्णालये नाशिक, कराड व अहिल्यानगरमध्ये आहेत. त्या सर्वांची मालकी आता मणिपाल ग्रुपकडे गेली आहे. या खरेदीमुळे मणिपाल ग्रुपची देशातील रुग्णालयांची संख्या ४९ वर, तर एकूण खाटांची संख्या १२ हजारांवर पोहोचणार आहे.



## महापालिकेमध्ये १५६५ सुरक्षा रक्षकांची नेमणूक

**पुणे :** महापालिकेच्या विविध इमारतींमध्ये सुरक्षेची कडक व्यवस्था राखण्यासाठी १५६५ सुरक्षा रक्षकांची नेमणूक करण्यात येणार असून, त्यासाठी १३९ कोटी ९२ लाख रुपयांच्या निविदांना प्रशासनाने मंजुरी दिली आहे. पुढील तीन वर्षांसाठी ही व्यवस्था असणार असून, तीन ठेकेदारांमार्फत सुरक्षा कर्मचारी नियुक्त केले जाणार आहेत. या निविदा प्रक्रियेत सुरुवातीपासूनच अनेक वाद निर्माण झाले होते. अटी व शर्तींमधील बदल, पात्रतेविषयीचा गोंधळ आणि ठेकेदारांनी १६ ते १८ टक्क्यांनी वाढीव दर सुचवले असल्यामुळे या निविदांवर विविध स्तरांवर आक्षेप नोंदवले गेले होते. त्यानंतर प्रशासनाने दर कमी करण्यासाठी संबंधित ठेकेदारांशी चर्चा केली. अखेरीस २ टक्के वाढीव दरावर अंतिम मंजुरी देण्यात आली. महत्त्वाचे म्हणजे, महापालिकेच्या सुरक्षा विभागाकडे सध्या कार्यरत असलेल्या रक्षकांची अचूक संख्या, त्यांची कामाची ठिकाणे, शिफ्टनिहाय नेमणुका आणि वेतन याबाबत संघटित व ठोस नोंदी उपलब्ध नसल्याचेही उघड झाले होते. त्यामुळे या प्रक्रियेत पारदर्शकता आणि काटेकोर नियोजनाची आवश्यकता अधोरेखित झाली होती.

त्यानंतर प्रशासनाने या सर्व बाबींचा आढावा घेऊन निर्णय प्रक्रियेत बदल केला आणि शेवटी सुधारित निविदांना मंजुरी दिली. आता या निर्णयानुसार महापालिकेच्या मुख्यालय, झोनल कार्यालये, रुग्णालये, उद्याने आदी ठिकाणी सुरक्षा रक्षकांची नियुक्ती करण्यात येणार आहे.

## महावितरणचे ‘सीएमडी’ लोकेश चंद्र यांना पुरस्कार

**पुणे :** जागतिक मानव संसाधन विकास परिषदेमध्ये ‘उत्कृष्टतेसाठी राष्ट्रीय पुरस्कार २०२५’ अंतर्गत उत्कृष्ट कामगिरीसाठी महावितरण सहा पुरस्कारांचे मानकरी ठरले. यामध्ये महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांचा वैयक्तिक गटात दोन पुरस्कारांनी गौरव करण्यात आला.

मानव संसाधन विकासाला चालना, कर्मचारी क्षमता, कौशल्य व ज्ञानाचा विकास, नवीन संकल्पना, एआय तंत्रज्ञान तसेच हरित ऊर्जेचा वापर व योजना आदींवर एक दिवसीय जागतिक मानव संसाधन विकास परिषद झाली. देशभरातील खासगी व सरकारी कंपन्यांचे वरिष्ठ अधिकारी या परिषदेला उपस्थित होते.

महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांना वैयक्तिक गटात ‘सीएमडी ऑफ द इयर’ व ‘लिडरशिप एक्सलेन्स इन टेक्नोलॉजी इनोव्हेशन’ हे दोन पुरस्कार तर संचालक (मानव संसाधन) श्री. राजेंद्र पवार यांना ‘प्राईड ऑफ द प्रोफेशन’ पुरस्कार जाहीर झाला. या परिषदेत मानव संसाधन विकासाचे विशेषज्ञ डॉ. आर. एल. भाटिया, ‘आयआयएमए’च्या माजी अधिष्ठाता डॉ. इंदिरा पारेख यांच्याहस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले. महावितरणचे संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार, विशेष कार्य अधिकारी मंगेश कोहाट, कार्यकारी अभियंता (प्रशिक्षण) नरेंद्र सोनवणे, उपकार्यकारी अभियंता डॉ. संतोष पाटणी, सहायक अभियंता रूपेश खरपकर यांनी हे पुरस्कार स्वीकारले.

## सायबर पोलिस ठाण्यांच्या प्रस्तावास मंजुरी द्यावी

**पुणे :** सायबर गुन्ह्यांच्या तपास प्रक्रियेला वेग देण्यासाठी पुण्यातील पाच विभागांमध्ये नवीन सायबर पोलिस ठाण्यांच्या प्रस्तावास मंजुरी द्यावी, अशी मागणी आमदार सिद्धार्थ शिरोळे यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनेद्वारे केली.

सायबर चोरट्यांकडून नागरिकांची सातत्याने फसवणूक केली जात आहे. अशा गुन्ह्यांचा तपास अधिक कार्यक्षमपणे करण्यासाठी सायबर यंत्रणा बळकट करणे आवश्यक आहे. प्रत्येक पोलिस ठाण्यात सायबर गुन्ह्यांसंदर्भातील माहिती असलेले प्रशिक्षित कर्मचारी असावेत. शालेय विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेबाबत प्रशिक्षित करणे गरजेचे आहे.

डिजिटल फॉरेन्सिक विभागासाठी भरीव निधी मंजूर करून त्यास अधिक सक्षम करण्याची गरज आहे. सायबर चोरट्यांचे अकाउंट विदेशात असतात, 'व्हीपीएन'च्या आडून कारवाया केल्या जातात. अशावेळी संबंधित देशांशी आंतरराष्ट्रीय सायबर करार होणे अत्यावश्यक आहे.

# हॉटेलांचा रस्त्यालगतचा ‘पसारा’ पालिका ‘उखडणार’...!

### अतीक्रमण विरोधी पथक करणार थेट कारवाई: तीन पट कर वसूली करणार; अतिरिक्त आयुक्तांचे आदेश

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शहरातील अनेक इमारतींचे फ्रंट व साईड मार्जिन मध्ये हॉटेल थाटले असल्यामुळे अतिक्रमण तर होतच आहे पण पार्किंगचा प्रश्न देखील गंभीर होत आहे त्यामुळे अशाच मिळकतींवर कारवाई करा त्यांच्याकडून तीन पटकर वसूल करा असे आदेश अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बीपी यांनी दिले आहेत.

तसेच दर महिन्याला किमान १०० मिळकती शोधून त्यांना कर लावून त्यांची वसुली सुरू करणे, वापरातील बदलांची नोंद, व्यावसायिक वापरास आलेल्या जागांची तपासणी व थकबाकीदारांकडून कर वसुली करण्याचे आदेश दिले आहेत.

महापालिकेचे अतिरीक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. आणि उपायुक्त अविनाश सकपाळ यांनी बाणेर परिसरात केलेल्या संयुक्त पाहणीत काही हॉटेल्स आणि निवासी इमारतींकडून मोकळ्या जागांचा अनधिकृत व्यावसायिक वापर होत असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे अशा प्रकरणांवर वाढीव कर आकारणीसाठी निरीक्षकांना निर्देश देण्यात आले आहेत.

प्रत्येक निरीक्षकाला दरमहा विशिष्ट कामगिरीचे उद्दिष्ट दिले जाईल आणि त्याची अंमलबजावणी तपासण्यासाठी अचानक पाहण्या घेतल्या जातील, असेही अतिरीक्त आयुक्तांनी स्पष्ट केले.

याशिवाय, कर वसुली सुधारण्यासाठी विभागाला ७० नवीन कर्मचारी मिळाले असून त्यांना लवकरच प्रशिक्षण दिले जाणार आहे.

भविष्यात मिळकत कर व्यवस्थापनात 'एआय'चा वापर होणार असून, नोंदणीसाठीच्या ॲपमध्येही सुधारणा केली जाणार आहे.






बहुतांशी हॉटेल मालकांनी रस्त्याच्या लगतच त्यांचे संसार थाटले आहेत; त्याचा त्रास वर्दळीच्या भागात सर्वाधिक प्रमाणात होत असून नागरिक आणि वाहनचालक त्रस्त झाले आहेत. त्यातूनच वाहतूक कोंडीचे प्रमाण वाढत आहे; यासंदर्भात तक्रारी आल्यानंतर कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या कारवाईत सातत्य ठेवण्याच्या सूचनाही करण्यात आल्या आहेत.

**-पृथ्वीराज बी. पी.** अतिरिक्त आयुक्त, पुणे महापालिका



२ जुलैपासून समाविष्ट गावांमध्ये ८७५ चौरस मीटर रस्त्यांची दुरुस्ती करण्यात आली आहे. याशिवाय शहरातील विविध भागांमध्ये ३४ हजार ६८ चौरस मीटर रस्त्यांचे डांबरीकरण करण्यात आले असून, त्यासाठी १५ हजार ८८२ मेट्रिक टन डांबराचा वापर करण्यात आला आहे.

**-अनिरुद्ध पावसकर,** प्रमुख पथ विभाग, पुणे महापालिका

### मोठ्या हॉटेल्सनेही जागा व्यापल्या

**अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी.पी. यांनी बाणेर भागातील हाय स्ट्रीट येथे पाहणी केली. तेथे अनेक मोठ्या हॉटेल्सनी त्यांच्या इमारतीची बाजूच्या व समोरच्या जागा व्यवसायासाठी व्यापलेला दिसून आले. याच पद्धतीने शहराच्या अन्य भागात देखील हॉटेल सुरू आहेत.**

**इमारतीच्या आवारात पार्किंगला जागा नसल्याने तेथील गाड्या रस्त्यावर लावल्या जात आहेत. त्यामुळे वाहतूक कोंडीत भर पडत असल्याने या हॉटेलवर कारवाई केली जाणार आहे.**

# पावसामुळे पालिकेची ‘अब्रू चव्हाट्यावर’...!

### नव्या रस्त्यांची अक्षरश: चाळण: वाहनचालकांची कसरत

राज्य शासनाच्या उदासीन कारभारामुळे पुण्याच्या महापालिकेत तब्बल साडेतीन वर्षांहूनही अधिक काळ प्रशासकराज कार्यरत आहे; त्यावर कोणाचाही वचक नसल्याने प्रशासनातील सर्वच विभागांचा मनमानी कारभार सुरु आहे. त्याचा जबरदस्त फटका सर्वसामान्य नागरिकांना सहन करावा लागत आहे; विशेष म्हणजे कोणत्याही नागरिकांची कामे संथ गतीने सुरु असून ‘सरकारी काम अन सहा महिने थांब’ या म्हणीचा त्यांना पावलोपावली प्रत्यय येत आहे. त्याबाबत विविध राजकीय पक्षांनी आंदोलनाच्या माध्यमातून प्रशासन आणि शासनाचे लक्ष वेधण्याचा केविलवाणा प्रयत्न केला, परंतु त्याचा फारसा फायदा झाला नाही. त्यातच पावसाने पालिकेच्या अब्रूची लक्तरे अक्षरश: वेशीवर टांगली आहे.





■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शहरात मागील काही दिवसांपासून पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे पुणे महापालिकेच्या रस्त्यांच्या कामांचा दर्जा पुन्हा एकदा तपासणीस सामोरा गेला आहे. शहरातील अनेक भागांत रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले असून, वाहतूक विस्कळीत झाली आहे. नागरिकांना खड्ड्यांमधून मार्ग काढताना अपघाताचा धोका आणि रोजच्या प्रवासात मनस्ताप सहन करावा लागत आहे.

पावसाने काही प्रमाणात उघडीप दिली असतानाही खड्डे दुरुस्त करण्याचे काम संथ गतीने सुरू असून, महापालिकेच्या दाव्यांवर नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे. पथविभागाने केलेल्या माहितीनुसार, १ एप्रिलपासून आतापर्यंत ७ हजार २२२ खड्डे बुजवण्यात आले असून, ८५४ चेंबर्सची दुरुस्ती, तसेच २५७ ठिकाणी पाणी साचू नये यासाठी उपाययोजना केल्या आहेत.

दरवर्षी कोट्यवधी रुपयांचा निधी खर्चून महापालिकेच्या वतीने रस्त्यांची कामे केली जातात. मात्र, कामांचा दर्जा आणि टिकाऊपणा याबाबत नागरिकांकडून सातत्याने तक्रारी येत असतात. शास्त्रीय पद्धतीने रस्त्यांचे बांधकाम केले जात असल्याचा दावा प्रशासनाकडून केला जातो, मात्र प्रत्यक्षात पावसाळा सुरू होताच रस्त्यांची दुरवस्था दिसून येते.

खड्ड्यांमुळे वाहनचालक आणि पादचाऱ्यांची मोठी कसरत सुरू असून, अनेक भागांत वाहतूक कोंडी आणि अपघाताचे प्रमाण वाढले आहे. खड्डे बुजवण्यासाठी तयार केलेल्या पथकांकडून कामे सुरू असली तरी त्याचा वेग अपुरा असून, नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने ही स्थिती अत्यंत चिंताजनक आहे.

महापालिकेने रस्ते दुरुस्तीच्या कामांकडे अधिक गांभीर्याने लक्ष देत खड्डे जलदगतीने बुजवावेत, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. अन्यथा, पावसाळ्यातील ही डागडुजी महापालिकेसाठी आणि नागरिकांसाठी डोकेदुखी ठरू शकते.

# आयुक्तांच्या हाती ‘वॉर रुम’ चे ‘स्टेअरिंग’

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** शहरातील रखडलेली महत्त्वाची विकासकामे वेळेत आणि दर्जेदाररित्या पूर्ण करण्यासाठी पुणे महापालिकेने ‘वॉर रूम’ची स्थापना केली असून, आयुक्त नवलकिशोर राम यांच्या थेट नियंत्रणाखाली ही प्रणाली कार्यान्वित होणार आहे. ‘वॉर रूम’च्या माध्यमातून सुमारे ३० ते ३२ महत्त्वाच्या प्रकल्पांच्या नियमितपणे प्रगतीचा आढावा घेण्यात येणार आहे.

शहरात सध्या जायका अंतर्गत सुरू असलेले ड्रेनेज व मलनिस्सारण प्रकल्प, नदीकाठ पुनर्विकास योजना, समान पाणीपुरवठा योजना, कात्रज-कोंढवा व शिवणे-खराडी रस्ते विस्तार, विविध उड्डाणपूल आणि रस्ते सुधारणा अशा अनेक विकासकामांची कामगिरी संथ आहे. काही प्रकल्पांची अंतिम मुदत संपली असूनही ती अद्याप अपूर्ण आहेत, तर काहींना मुदतवाढ मिळूनही फारशी प्रगती झालेली नाही.

या रखडलेल्या प्रकल्पांमुळे वाहतूक व्यवस्थेवर ताण आला आहे, तसेच नागरिकांच्या दैनंदिन जीवनावरही परिणाम होत आहे. परिणामी महापालिकेच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर नव्याने कार्यभार स्वीकारल्यानंतर आयुक्त राम यांनी सर्व विभागप्रमुखांची संयुक्त बैठक घेऊन प्रत्येक प्रकल्पाचा सविस्तर आढावा घेतला होता.

प्रत्येक पंधरवड्याला प्रकल्पांच्या प्रगतीचा आढावा 'वॉर रूम'च्या माध्यमातून घेतला जाणार आहे. यासाठी विशेष उपायुक्तांची नियुक्ती करण्यात आली असून, त्यांनी संबंधित विभागांच्या नियमित बैठकांचे आयोजन करून त्याचा अहवाल सादर करण्याची जबाबदारी पार पाडायची आहे.

आयुक्त राम यांनी स्पष्ट निर्देश दिले आहेत की, प्रकल्प वेळेत पूर्ण होणे गरजेचे आहेच, मात्र त्याचा दर्जाही कायम ठेवण्यात यावा. अडथळे व तांत्रिक समस्या दूर करून कामांना गती देण्यासाठी सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी समन्वयाने काम करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

महापालिकेच्या या नव्या पवित्र्यामुळे रखडलेले प्रकल्प मार्गी लागतील, अशी नागरिकांची अपेक्षा आहे.

# संजीवन वनउद्यान येथे ५०० देशी झाडांची वृक्षलागवड

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :**कोथरूड येथील संजीवन वनउद्यानात नुकताच भव्य वृक्षलागवड उपक्रम पार पडला. महा एनजीओ फेडरेशन, सस्टेनेबिलिटी इनिशिएटिव्हज, व्ही. के. ग्रुप आणि केअर फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या उपक्रमात वेगवेगळ्या स्वयंसेवी संस्थांचे तब्बल २०० प्रतिनिधी सहभागी झाले होते. त्यांनी मिळून ५०० देशी वृक्षांचे रोपण केले.

या संपूर्ण उपक्रमाचे नियोजन अमोल उंबरजे, मेघना पिंगळे आणि मयूर वारेगावकर यांनी केले. यानंतर झाडांची निगा केअर संस्था तर्फे घेतली जाणार आहे. संस्थापक शेखर मुंदडा व ट्रस्टी अपूर्वा कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाने महा एनजीओ फेडरेशन व सस्टेनेबिलिटी इनिशिएटिव्हज दरवर्षी अनेक संस्था यांना एकत्रित आणून अशा प्रकारचे वृक्षारोपण उपक्रम राबवित असतात.

उपस्थित मान्यवरांमध्ये अमोल उंबरजे, मुकुंद शिंदे, वीरेंद्र बोराडे, मयुर वारेगांवकर, सविता कोठाले, मेघना पिंगळे, रक्षा कपले, कांचन सिधये, वैभव मोगरेकर, अपूर्वा कारवा, कोमल गांधी व इतर मान्यवर यांचा समावेश होता. या वृक्षलागवडीत स्थानिक प्रजातींचा व देशी झाडांचा समावेश होता.



पुणे | कोथरूड येथील संजीवन वनउद्यानात नुकताच भव्य वृक्षलागवड उपक्रम पार पडला. महा एनजीओ फेडरेशन, सस्टेनेबिलिटी इनिशिएटिव्हज, व्ही. के. ग्रुप आणि केअर फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या उपक्रमात वेगवेगळ्या स्वयंसेवी संस्थांचे तब्बल २०० प्रतिनिधी सहभागी झाले होते. त्यांनी मिळून ५०० देशी वृक्षांचे रोपण केले.

# प्रशासकीय सेवेत पॅशन अत्यंत महत्वाचे : विवेक फणसाळकर




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :**" प्रशासकीय सेवेत कार्य करतांना सहानुभूती, करूणा आणि पॅशन या तीन गोष्टी अत्यंत महत्वाचे आहे. पॅशन नसेल तर यशस्वी होता येत नाही. अशावेळेस पॅशनला कठोर परिश्रमाची जोड दयावी. सतत शिकण्याची सवय आणि उत्तम कार्य करण्यावर अधिक भर दयावा. आपला व्यवहारच आपल्या प्रगतीचे द्वार उघडतो.” असे विचार मुंबई येथील माजी पोलीस आयुक्त विवेक फणसाळकर यांनी व्यक्त केले.

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीच्या एमआयटी स्कूल ऑफ गव्हर्नमेंट (मिटसॉग) आणि डिपार्टमेंट ऑफ इकॉनॉमिक्स अँड पब्लिक पॉलिसी यांच्या संयुक्त विद्यमाने कोथरूड येथील एमआयटी डब्ल्यूपीयूच्या स्वामी विवेकानंद सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या केंद्रीय लोकसेवा आयोग (यूपीएससी) स्पर्धा परीक्षा-२०२४ मधील यशस्वितांच्या १५ व्या राष्ट्रीय सत्कार सोहळ्याच्या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

यावेळी लोकसभेच्या पहिल्या महिला माजी महासचिव स्नेहलता श्रीवास्तव व सरदार वल्लभभाई पटेल राष्ट्रीय पोलिस अकादमीचे माजी संचालक ए.एस.राजन हे सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच एमआयटी डब्ल्यूपीयूचे कुलगुरू डॉ. आर.एम.चिटणीस, सीएओ डॉ. प्रसाद खांडेकर, स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अँड कॉमर्सच्या डीन डॉ. अंजली साने, देशातून प्रथम आलेली शक्ती दुबे, तिसरा आलेला अर्चित डोंगरे व गोपाळ वामणे उपस्थित होते. एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांच्या आशीर्वादाने आणि एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे कार्याध्यक्ष डॉ. राहुल विश्वनाथ कराड यांच्या मार्गदर्शनात या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

" प्रशासकीय सेवा हा अत्यंत महत्वाचा टास्क आहे. कठोर परिश्रमाबरोबरच सतत शिकण्याची प्रवृत्ती ठेवावी. या सेवेमध्ये स्वतःवर प्रचंड नियंत्रण ठेऊन नम्रतेचा गुण अंगिकारावा. प्रगती करण्यासाठी नवनवीन शिकण्याच्या वृत्तीबरोबरच स्वतःजवळ एक डायरी ठेऊन दिवसभराचा चार्ट लिहावा. सर्वांशी सर्वोत्तम व्यवहार कसा करता येईल या वर लक्ष केंद्रीत करावे.

**स्नेहलता श्रीवास्तव;**
लोकसभेच्या पहिल्या महिला महासचिव



## बुद्ध विहारांत वर्षावासानिमित्त विविध कार्यक्रम

**भोसरी :** भोसरी, दिघी आणि इंद्रायणीनगर परिसरातील बुद्ध विहारांत वर्षावासानिमित्त विविध कार्यक्रम घेण्यात आले. तथागत भगवान गौतम बुद्ध आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन, 'बुद्ध आणि त्यांचा धम्म' ग्रंथाचे वाचन, खीर वाटप आदी कार्यक्रम झाले. भोसरीतील बुद्ध विहार ट्रस्टद्वारे आषाढ पौर्णिमेनिमित्त सतराव्या वर्षावासाला सुरूवात ट्रस्टचे अध्यक्ष दीपक मारुती डोळस, महिला समिती अध्यक्षा संजीवनी कांबळे, विकास डोळस, अश्विनी खोदे यांचे हस्ते तथागत गौतम बुद्ध, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांच्या पूजनाने करण्यात आली. यावेळी राजेश डोळस, हनुमंत डोळस, चित्रसेन डोळस, संजय कांबळे, परशुराम कांबळे, बुध्द विहाराचे कार्यकारी सर्व सभासद, उपासक व उपासिका उपस्थित होते.



## पर्यावरण रक्षणाची जबाबदारी स्वीकारावी- श्रावण हर्डीकर

**पुणे :** रोटरी इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३१३१ आणि पुणे मेट्रो (महा मेट्रो) यांच्या संयुक्त विद्यमाने राबवण्यात येणाऱ्या 'रोटरी ग्रीन वीक' या वर्षभर चालणाऱ्या पर्यावरणीय उपक्रमाचा शानदार शुभारंभ जिल्हा न्यायालय मेट्रो स्थानकात पार पडला. कार्यक्रमाचे आयोजन आणि प्रायोजकत्व रोटरी क्लब ऑफ निगडी यांनी केले होते. या उपक्रमाचे प्रमुख पाहुणे महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर होते. यावेळी रोटरी इंटरनॅशनल डिस्ट्रिक्टचे प्रांतपाल संतोष मराठे, प्रांतीय पर्यावरण विभागाचे प्रमुख ध्रुव फडके, रोटरी क्लब ऑफ निगडीचे अध्यक्ष केशव माणगे, महा मेट्रोचे कार्यकारी अधिकारी डॉ हेमंत सोनवणे, रोटरी क्लब निगडीचे नियोजित अध्यक्ष शशांक फडके, अमोल जाधव आदी उपस्थित होते. हर्डीकर म्हणाले कि, "परिवर्तनाची सुरुवात स्वतःपासून झाली पाहिजे. प्रत्येकाने पर्यावरणासाठी काहीतरी करण्याची जबाबदारी स्वीकारली, तरच समाजात खरे परिवर्तन घडणे शक्य होईल." ध्रुव फडके म्हणाले कि, हा उपक्रम ५२ आठवड्यांचा असून दर आठवड्याला एक सोपी, पण प्रभावी पर्यावरणपूरक कृती राबवण्याचे उद्दिष्ट आहे.

प्रांतपाल मराठे यांनी यावर्षीच्या रोटरीच्या कामकाजात पर्यावरण हा केंद्रस्थानी असलेला विषय असल्याचे नमूद केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अभिनेत्री शोभा कुलकर्णी यांनी केले.

## सांगवी फाटा येथे साईबाबांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना

**पिंपळे गुरव :** सांगवी फाटा येथे गुरुपौर्णिमेनिमित्त साईबाबांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली. मोठ्या भक्तिभावाने भाविकांनी साईबाबांचे दर्शन घेतले.

संजय गांधी निराधार योजनेचे सचिव संजय मराठे यांच्या हस्ते विधिवत पूजा करून साईंच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली. विद्युत रोषणाई, आकर्षक रांगोळी, फुलांच्या माळांनी मंदिर परिसर उजळून निघाला होता. होमहवन, सत्यनारायण महापूजा, तीर्थ प्रसाद, महाप्रसाद वाटप करण्यात आले. रमेश चौधरी, तौफिक सय्यद, रमेश गाढवे, राजू मोरे, प्रवीण भोसले, गिरीश देवकाते, वैभव चांदगुडे, सचिन खराडे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## खडक गेवंडे येथे ज्येष्ठ नागरिकाला बेदम मारहाण

**पवनानगर :** खडक गेवंडे येथील कॅम्पिंग चालक अविनाश घणिक याने शेतकरी हरिश्चंद्र बाजीराव पासलकर (७०) यांस लोखंडी पाईपने मारहाण केली. यामध्ये पासलकर यांचा डाव्या हातांच्या ठिकाणी जोराचा मार लागल्याने हाडाचे दोन तुकडे झाले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अविनाश घणिक यांनी लावलेले खांब आमच्या हद्दीत का लावले म्हणून पासलकर यांनी विचारले. यावरून दोघांमध्ये झालेल्या भांडणातून अविनाश घणिक याने लोखंडी पाईपने पासलकर यांना मारले तसेच पाठीवर लाथ मारून, जिवे मारण्याची धमकी दिली. पाइपचा जोराचा फटका हातावर लागल्याने पासलकर यांचा हात मोडला असून, तळेगाव येथे उपचार सुरु आहेत.

## पुरंदरे विद्यालय छात्रसमिती अध्यक्षपदी पौर्णिमा शेलार

**लोणावळा :** डॉ. बी. एन. पुरंदरे विद्यालय छात्रसमिती अध्यक्षपदी पौर्णिमा शेलार तर उपाध्यक्ष म्हणून इयत्ता सातवीमधून चैतन्य मोहोळ हे विद्यार्थी विजयी झाले.

विद्यार्थ्यांना भारतीय लोकशाही, निवडणूक प्रक्रियांची माहिती व्हावी, नेतृत्वगुणांना वाव मिळावा यासाठी डॉ. बी. एन. पुरंदरे विद्यालयात या उपक्रमाचे आयोजन करण्यात येते. २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाकरिता छात्रसमिती अध्यक्ष व उपाध्यक्ष पदाची निवडणूक शासकीय निवडणुकांप्रमाणे पार पडली. या निवडणुकीस विद्यालयातील छात्रसमिती अध्यक्ष पदासाठी नववीमधून सहा उमेदवार तर उपाध्यक्ष पदासाठी सातवीमधून तीन उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात होते. मतदार म्हणून विद्यालयातील ५०० विद्यार्थ्यांनी मतदानाचा हक्क बजावला.

# व्यवसायिकांचा खासगी बसेसना 'आसरा'...!

## बसचालकांची मुजोरी: अपघाताला निमत्रंण; व्यवसायिकांची नागरिकांवरच दंडेलशाही

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पिंपरी :** काळेवाडी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते रहाटणी फाटा व काळेवाडी फाट्याच्या अंतर्गत असणारा बीआरटीएस रस्त्याला असंख्य ट्रॅव्हल्स व्यावसायिकांनी स्वतःची दुकाने थाटली असून रस्त्याच्या कडेला हे व्यावसायिक त्याच ठिकाणी आपल्या ट्रॅव्हल बसला थांबा देत आहेत. प्रवासी घेण्यासाठी बसचालकांची चढाओढ हे अपघाताला निमंत्रण देणारे ठरत आहे. त्यामुळे ट्रॅव्हल्स व्यावसायिकांच्या मुजोरीला चाप लावावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

काळेवाडी बीआरटीएस मुख्य रस्त्याला लागून असलेल्या रहाटणी फाटा येथे मोठ्या प्रमाणावर गर्दी असल्याचे दिसून येते. येथे मजूर अड्डा व खासगी ट्रॅव्हल व्यावसायिकांची दुकाने एकाच ठिकाणी असल्याने गरीब काम करणारे मजूर तसेच ट्रॅव्हल्स दुकानात तिकीट खरेदी करून प्रवासाला जाणारे प्रवासी यांची गर्दी एकाच ठिकाणी मोठ्या प्रमाणावर होत असते. सायंकाळी सहा ते रात्री नऊ यावेळेत देखील गर्दी जास्त असते. या गर्दीतच बाहेरगावी जाणाऱ्या ट्रॅव्हल्स कंपनीच्या विविध बस कोणत्याही नियमांना न जुमानता व पोलिस प्रशासनाचे आदेश न पाळता उभ्या असल्याच्या दिसून येतात. पदपथ हे अत्यंत अडचणीचे व अरुंद असून तेथेच ट्रॅव्हल्स कंपनीच्या व्यावसायिकांनी दुकाने थाटली आहेत.

ट्रॅव्हल्स एजंट कंपन्यांची दुकाने व बससाठी वेगळी वाहनतळाची व्यवस्था असणे गरजेचे आहे. या ठिकाणी मात्र मुख्य रस्त्यावर एका मागे एक व कोणत्याही प्रकारचे नियम न पाळता या बसला थांबा देऊन प्रवाशांना बसवले जात आहे. त्यासाठी इतर वाहन चालकांचा जीव धोक्यात टाकला जात आहे. त्याला विरोध दर्शविणाऱ्या सामान्य नागरिकांना धमकावणे तसेच काही वेळा हाणामारी झाल्याचेही येथील नागरिकांचे म्हणणे असून त्यामुळे येथे कायमस्वरूपी पोलिसांची नेमणूक करण्याची गरज दिसून येत आहे.

### अशी होतेय नियमांची पायमल्ली...!

- मोठ्या रहदारीच्या रस्त्यावर बस थांबवणे
- कोणत्याही सिग्नल किंवा इंडिकेटर न देता बस धोकादायक पद्धतीने वळवणे
- ट्रॅव्हल्स तिकीट बुकिंग व्यावसायिकांचा बस दुकानासमोरच थांबविण्यासाठी आग्रह
- बस थांबल्याने प्रवासी भाड्याची विचारणा करणाऱ्या रिक्षांची गर्दी
- तास न तास बस थांबल्याने रस्त्यावर होणारी गर्दी
- विविध ऑनलाइन ॲप वरुन गर्दीच्या ठिकाणी प्रवाशांना थांबा

सांगवी वाहक पोलिस ठाण्याकडून यापूर्वी ठिकठिकाणी सूचना फलक लावण्यात आले होते. सायंकाळी सहा ते नऊ पर्यंत वाहनांना मज्जाव करण्यासाठी नियमावली व सूचना करण्यात आल्या होत्या. परंतु याकडे कोणत्याही प्रकारचे लक्ष न देता ट्रॅव्हल्स चालकांची मनमानी चालूच असलेली दिसून येते. हे फलक फक्त नावाला असल्याचे दिसून येते.

मोठी आकाराची बस रस्त्यावरच उभी केल्याने इतर वाहन चालकांना रस्त्याने जाणे येणे कठीण होत असून कोणत्याही प्रकारचे पांढरे पट्टे किंवा वाहनतळासाठी जागा नसल्याने व बसच्या मोठ्या आकारामुळे छोटे वाहन चालक मात्र त्रस्त झाल्याचे दिसून येत आहे.

> या संदर्भात ट्रॅव्हल्स बसवर वेळोवेळी कारवाई करण्यात येत असून त्याबाबत ट्रॅव्हल्स व्यावसायिकांना सूचना देण्यात आल्या आहेत. तरीही ते ऑनलाइन ॲप वरून बस थांबे देत असल्यामुळे बस चालक सूचना पाळत नाहीत. मात्र त्यावर देखील कारवाई केली जाईल
> **- प्रदीप पाटील,** पोलिस निरीक्षक, सांगवी वाहतूक विभाग

> हा रस्ता रहदारीचा असून या रस्त्याने आयटीआय व हिंजवडीकडे जाणाऱ्या नागरिकांची जास्त वर्दळ असते. या रस्त्यावर सायंकाळी मोठ्या प्रमाणात बस चालक व ट्रॅव्हल्स व्यावसायिक गर्दी करून उभे असतात. अशा वेळी अपघात होऊ शकतो. त्याला जबाबदार कोण ?
> **- दिनेश वाणी,** काळेवाडी

> भाजी मंडई व व्यावसायिकांची दुकाने असून महिला आणि लहान मुलांना येण्या जाण्यासाठी हा रस्ता धोकादायक बनला आहे. तेथे प्रवासी घेण्यासाठी बसचालकांची चढाओढ लागलेली असते. यामुळे अपघात होऊन मोठी घटना होऊ शकते.
> **- हर्षदा दुसाने,** रहिवासी, रहाटणी

# उद्योगनगरी नव्हे 'खड्डेनगरी'...!

### रस्त्यांची चाळण : डांबरही निघाले; वाहनचालक हतबल

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) क्षेत्रातील रस्त्यांची दयनीय अवस्था झाली आहे. रस्त्यांवरील डांबराचा वरचा थर निघून गेल्यामुळे रस्त्यांची अक्षरशः चाळण झाली आहे. परिणामी, दुचाकीस्वारांना वाहन चालवणे अवघड जिकिरीचे झाले आहे. पिंपरी-चिंचवड शहराची औद्योगिकनगरी म्हणून ओळख आहे. शहरालगत भोसरी आणि चाकण येथे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) क्षेत्र विकसित झाले आहे. या परिसरामध्ये आठ हजारांहून अधिक प्लॉटधारक असून, बहुउद्देशीय कंपन्यांना सुटे भाग पुरविणारे पाच हजारांहून अधिक लघुउद्योग आहेत. तसेच एमआयडीसीत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना ने-आण करणाऱ्या बसची संख्या देखील मोठ्या प्रमाणावर आहे.

> पाऊस सुरू असल्याने आम्ही खडी आणि मुरूम टाकून खड्डे बुजविण्याचे काम सुरू आहे. पाऊस उघडल्यानंतर डांबर टाकणार आहे. **- प्रकाश भडंगे,** कार्यकारी अभियंता, चाकण एमआयडीसी

> रस्त्यावर एवढे खड्डे आहेत की खड्ड्यामध्ये रस्ते गेलेले आहेत. लवकरात लवकर युद्ध पातळीवर रस्त्याचे रुंदीकरण, नवीन पूल व आहे त्या रस्त्यांची कायमची पक्की डागडुजी ही व्हायला पाहिजे.
> **- संजय सातव,** उद्योजक, भोसरी



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** एमआयडीसीतील डांबरी रस्त्यांवरील वरचा थर निघून गेल्यामुळे रस्ते खाली-वर झाले आहेत. काही ठिकाणी रस्त्यांवर मोठे मोठे खड्डे पडले आहेत. त्यामुळे या रस्त्यावरून दुचाकी चालविणे कठीण झाले आहे. दररोज या मार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहनचालकांना आरोग्याच्या समस्या निर्माण झाल्या आहेत. प्रशासनाने लवकरात लवकर रस्ते दुरुस्ती करावेत, अशी मागणी वाहनचालकांकडून होत आहे.

एमआयडीसीत पावसामुळे खड्डे पडून रस्त्यांची चाळण झाली आहे. भोसरी आणि चिंचवड एमआयडीसी परिसरात विविध सुविधा देण्याची जबाबदारी पिंपरी-चिंचवड महापालिकेची असल्याचे एमआयडीसी प्रशासनाचे म्हणणे आहे. पण, महापालिका प्रशासनाकडूनही रस्त्यांची देखभाल दुरुस्ती होत नाही. दोन्ही प्रशासनांनी रस्ते दुरुस्तीवरून एकमेकांकडे बोट दाखवत जबाबदारी ढकलण्याचा प्रयत्न होत आहे. मचाकण एमआयडीसीतील काही रस्त्यांचे डांबरीकरण करण्याचा प्रस्ताव मुंबई कार्यालयाला पाठविला आहे. चाकण एमआयडीसी प्रशासनाने प्रस्ताव नोव्हेंबर २०२४ मध्ये पाठविला आहे. पण गेल्या आठ महिन्यांपासून हा प्रस्ताव धूळ खात पडून आहे.

### अशी होतेय नागरिकांची हेळसांड

- एमआयडीसीतील रस्त्यांची दुरवस्था झाल्यामुळे वाहनचालक, कर्मचारी आणि उद्योजक त्रस्त
- पावसामुळे खड्ड्यांमुळे रस्त्यांची अक्षरक्षः चाळण
- वाहतूक संथगतीने सुरू
- सकाळी आठ ते दहा आणि सायंकाळी पाच ते आठ या काळात मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी
- एमआयडीसीत काम करणाऱ्या हजारो कर्मचाऱ्यांना आणि वाहनचालकांना करावा लागतोय सामना
- वाहतूक कोंडी झाल्यास एक ते दोन किलोमीटरसाठी तासनतास अडकून पडावे लागते
- हे रस्ते खराब
- लांडेवस्ती ते इंद्रायणी नगर
- इंद्रायणी नगर ते स्पाइन रोड
- केएसबी चौक ते एमआयडीसी कार्यालय
- आयुक्त बंगला ते सायन्स पार्क
- महाळुंगे पोलिस ठाणे चौक ते इंडोरन्स चौक
- एचपी चौक ते इंडोरन्स चौक

# खडकी रेल्वे स्थानकावर आज मेगाब्लॉक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**पुणे :** खडकी रेल्वे स्थानकावर नवीन फ्लॅटफॉर्मसह आवश्यक तांत्रिक कामे (प्री-नॉन इंटरलॉकिंग आणि नॉन इंटरलॉकिंग) हाती घेण्यात येणार आहेत. यासाठी रविवार, १४ जुलै रोजी मध्यरात्री १२ वाजल्यापासून ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत (एकूण १७ तास) विशेष ब्लॉक घेण्यात येणार आहे. या ब्लॉकमुळे पुणे-लोणावळा मार्गावरील २६ उपनगरीय लोकल सेवा रद्द करण्यात आल्या असून काही गाड्यांचे मार्ग, वेळा आणि थांबे बदलण्यात आले आहेत.

**प्रभावित गाड्या आणि सेवा :**

उपनगरीय सेवा रद्द : पुणे-लोणावळा आणि लोणावळा-शिवाजीनगर दरम्यान धावणाऱ्या २६ लोकल रद्द.

थांबा रद्द : खालील गाड्या खडकी स्थानकावर थांबणार नाहीत –

चेन्नई एग्मोर - सीएसएमटी एक्सप्रेस
सीएसएमटी - चेन्नई एग्मोर एक्सप्रेस
पुणे - सीएसएमटी एक्सप्रेस
सीएसएमटी - पुणे एक्सप्रेस
चेन्नई सेंट्रल - सीएसएमटी एक्सप्रेस
सीएसएमटी - पुणे डेक्कन एक्सप्रेस

**गाड्यांचे मार्ग/समाप्ती स्थान बदल :**

गाडी क्र. ११९४० होसपेटे - सीएसएमटी, मुंबई ही गाडी फक्त पुणेपर्यंत धावेल.

गाडी क्र. ११०२९ मुंबई - कोल्हापूर एक्सप्रेस ही मुंबई-पुणे दरम्यान रद्द असून ती पुण्याहून १२.४० वाजता पुढे कोल्हापूरकडे रवाना होईल.

**वेळापत्रकात बदल :**

मुंबई-चेन्नई एक्सप्रेस
पुणे-मुंबई डेक्कन एक्सप्रेस
मुंबई - काकीनाडा
सीएसएमटी - तिरुवनंतपुरम एक्सप्रेस
दौंड - पुणे - इंदूर एक्सप्रेस

**वाहतूक आणि इतर परिणाम:**

एलसी गेट ६२ ए आणि ६२ एए (किमी १८३/४-५) या दोन्ही गेट्स मॅन्युअली ऑपरेट करण्यात येतील. दोन्ही गेट्स वाहन वाहतुकीसाठी बंद राहतील.

# द्वंद्वाची उत्तरे मिळतात तेच खरे प्रभावी साहित्य : डॉ. गोऱ्हे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** माणसाच्या मनातील द्वंद्वाची उत्तरे जेव्हा साहित्यातून सापडतील तेव्हाच ते साहित्य अधिक प्रभावी ठरेल, असे प्रतिपादन विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी केले. संगीतकार, गीतकार, कवी, लेखक, डॉक्टर असे बहुआयामी व्यक्तिमत्त्व असलेल्या डॉ. आशुतोष जावडेकर यांनी राजकीय पार्श्वभूमी असूनही स्वत:ची सर्जनशीलता जपली आहे; त्यांचे लिखाणही प्रभावी आहे. ते खऱ्या अर्थाने पु. ल. देशपांडे यांचा वारसा जपणारे आहेत, असे गौरवोद्गार विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी काढले.

रंगत-संगत प्रतिष्ठानतर्फे काव्य प्रतिभा पुरस्काराने प्रसिद्ध व्याख्याते, लेखक, कवी डॉ. आशुतोष जावडेकर यांचा डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. त्या वेळी डॉ. गोऱ्हे अध्यक्षपदावरून बोलत होत्या. ज्येष्ठ विचारवंत लेखक, कवी डॉ. राजा दीक्षित यांची प्रमुख उपस्थिती होती. रंगत-संगत प्रतिष्ठानचे अध्यक्ष ॲड. प्रमोद आडकर, मैथिली आडकर मंचावर होते. सन्मानपत्र, शाल, श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप होते.

डॉ. गोऱ्हे म्हणाल्या, पुस्तक हेच प्रभावी माध्यम आहे इतर माध्यमे नाहीत, अशी सध्याची परिस्थिती नाही. समाजमाध्यमेही प्रभावी आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिल्पा देशपांडे यांनी केले तर मानपत्राचे वाचन प्राजक्ता वेदपाठक यांनी केले.




**पुणे** रंगत-संगत प्रतिष्ठानतर्फे काव्य प्रतिभा पुरस्काराने प्रसिद्ध व्याख्याते, लेखक, कवी डॉ. आशुतोष जावडेकर यांचा डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. रंगत-संगत प्रतिष्ठानचे अध्यक्ष ॲड. प्रमोद आडकर, मैथिली आडकर मंचावर होते. सन्मानपत्र, शाल, श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप होते.

# मदत व पुनर्वसन विभागाची वारी पोहचली लाखो वारकऱ्यांपर्यंत




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे / पंढरपूर :** आषाढी वारीनिमित्त दरवर्षी लाखो वारकरी भाविक भक्त संत ज्ञानेश्वर महाराज व संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यात पायी वारीमध्ये सहभागी होत असतात. याच पायी वारीत मदत व पुनर्वसन विभागाच्या वतीने पहिल्यांदाच प्रचार व प्रसिद्धी अभियान वारी उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात आला. पालखी मुक्कामी मनोरंजन व प्रबोधनात्मक पद्धतीने जनजागृती करण्यात आली. वारकरी व भाविक भक्तांनी या मदत व पुनर्वसन विभागाच्या वारीला भरभरुन प्रतिसाद दिला.

राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद आबा पाटील यांच्या संकल्पनेतून विभागाच्या विविध योजनांच्या प्रचार व प्रसिद्धीकरीता हे अभियान राबविण्यात आले. दोन्ही पालखी मार्गावर, तसेच पंढरपूर यात्रेदरम्यान हे अभियान झाले. या अभियान वारीत विविध लोककलांचा समावेश करण्यात आला होता. त्यामध्ये किर्तन, पारंपारिक वासुदेव, भारुड, पथनाट्य, चित्ररथ व एलईडी व्हॅन्स याव्दारे विभागाने राबविलेले निर्णय आणि योजनांची प्रसिद्धी करण्यात आली. मंत्री मकरंद आबा पाटील व सहसचिव संजय इंगळे यांच्या हस्ते लोणंद येथे या अभियानाची सुरुवात झाली.

दोन्ही पालखी मार्गावर १०० हून अधिक कलाकारांनी या अभियानात सहभाग घेत जनजागृती केली. या कलाकारांनी मदत व पुनर्वसन विभागाचे निर्णय व काम वारीमध्ये प्रभावी मांडले. तसेच पालखी विसावा व पालखी तळ आणि पंढरपुर शहराच्या विविध प्रवेशद्वारांवर योजनांची माहिती देणारे फ्लेक्स लावण्यात आले होते. सेल्फी पॉईंट व माहितीपत्रकांच्या माध्यमातून वारीत सहभागी झालेल्या शेतकरी बांधव व नागरिकांपर्यंत विभागाची माहिती पोहचविण्यात आली.

### सोशल मिडियाचा वापर

- यामध्ये सोशल मिडियाचाही प्रभावी वापर करण्यात आला. सोशल मिडियावर लाखो लोकांनी व्हिडिओज पाहिले. लोणंद येथे उभारण्यात आलेले स्वागतपर भव्य व आकर्षक कटआऊट सर्वांचे लक्ष वेधून घेणारे ठरले. ईसबावी येथे विभागाने वारकऱ्यांच्या स्वागतासाठी व्यासपीठ उभारले होते. विभागाच्या वतीने वारकरी बांधवांना दोन दिवस हजारो पाणी बॉटल्सचे मोफत वाटप करण्यात आले. लोणंद येथे मोफत जेवण व पाणी देण्यात आले. पंढरपुरमध्ये एसटी स्टँन्ड, रेल्वे स्टेशन, चंद्रभागा वाळवंट, गोपाळपूर व ६५ एकर आदी परिसरात सुरु ठेवण्यात आले होते.

संपादकीय विशेष

# राजकीय धुसफूस

देशातल्या विविध राज्यांमध्ये अधूनमधून मुख्यमंत्रीबदलाचा खेळ रंगत असतो. त्यातून अनेक छोटी-मोठी वादळे उभी रहात असतात. सध्या असेच वादळ कर्नाटकमध्ये अनुभवायला मिळत आहे. कर्नाटकमध्ये उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार आणि मुख्यमंत्र्यांच्या गटांनी नेतृत्वबदलाचे दावे करण्यास अलिकडेच सुरुवात केली. याशिवाय काही नेते आपल्याच सरकारला घेरण्याचा प्रयत्न करत आहेत. काहींनी भ्रष्टाचाराचे आरोप केले आहेत, तर काहींनी विकासावरून आरोप करत माध्यमांसमोर विधाने केली आहेत. त्यामुळे पक्षांतर्गत राजकीय संघर्ष जनतेसमोर आला आहे. काँग्रेसचे सरचिटणीस रणदीप सुरजेवाला यांनी निरिक्षक म्हणून बंगळुरूला येऊन आमदार आणि नेत्यांशी या विषयावर व्यक्तिशः चर्चा केली. त्यांनी ही बैठक नेतृत्वबदलासाठी नसल्याचे सांगितले असले, तरी प्रत्यक्षात ते त्यासाठीच आले होते, हे सर्वज्ञात आहे. आपले निरीक्षण आणि नेतृत्वबदलाबाबत काय केले पाहिजे, याचा अहवाल ते पक्षश्रेष्ठींना देतीलच; परंतु सरकारमधील राजकीय गोंधळ त्यांना कितपत समजला असेल, याबद्दल शंकाच आहे. त्याचे कारण त्यांनीही नेतृत्वबदल होणार नसल्याचे सांगितले आहे. श्रेष्ठी राज्यात आले की नेते 'तुझ्या गळा, माझ्या गळा' करतात आणि त्यांची पाठ वळली, की 'धरू एकमेकांचा गळा' असे वागणे असते. सुरजेवाला यांना कर्नाटकमध्ये का यावे लागले, याचे चिंतन केले, तर खरे कारण लक्षात येते. गेल्या एका आठवड्यात पक्षांतर्गत अशी अनेक विधाने समोर आली, ज्यामुळे काँग्रेस सरकारच्याच अस्तित्त्वाचा प्रश्न निर्माण झाला. एकीकडे आमदार बी. आर. पाटील यांनी गृहनिर्माण विभागातील भ्रष्टाचाराचा मुद्दा उपस्थित केला, तर दुसरीकडे आमदार राजू कागे यांनी ढासळणाऱ्या प्रशासकीय व्यवस्थेचा मुद्दा उपस्थित केला.

याच सुमारास काँग्रेसचे आमदार इक्बाल हुसेन यांनी सत्ता परिवर्तनाचा मुद्दा उपस्थित केला. एका निवेदनात त्यांनी म्हटले होते की पक्षश्रेष्ठींच्या मनात काही तरी मोठे चालले आहे. सत्ता परिवर्तन होण्याची शक्यता आहे. इक्बाल हे डी. के. शिवकुमार यांचे समर्थक असल्याने त्यांना मुख्यमंत्री बनवण्याची कसरत त्यांनी सुरू केली आहे. काँग्रेस पक्षश्रेष्ठींसमोर अडीच वर्षांच्या फॉर्म्युल्यावर चर्चा झाली होती. त्यामुळे आता डी. के. शिवकुमार यांना मुख्यमंत्री करावे, अशी आठवण त्यांनी पक्षश्रेष्ठींना करून दिली होती; पण मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांचे समर्थक अशा कोणत्याही फॉर्म्युल्याला नकार देत आहेत. दरम्यान, सिद्धरामय्या यांच्या चिरंजीवांना विश्वास आहे की ते पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करतील. नेतृत्वबदलाबाबत कर्नाटक काँग्रेसमध्ये सुरू असलेली सुंदोपसुंदी आणि परस्परविरोधी विधानांनी पक्षश्रेष्ठी नाराज झाले आहेत. त्यामुळेच तर त्यांनी सुरजेवाला यांना बंगळुरूला पाठवले. आता अशा सर्व नेत्यांना सुरजेवाला यांच्या माध्यमातून इशारा देण्यात आल्याचे समजते. सार्वजनिक ठिकाणी अशी विधाने करणे टाळण्याचा सल्ला त्यांना देण्यात आला असल्याचे सांगितले जात आहे. सुरजेवाला यांनी काही नेत्यांशी खासगीतही चर्चा केली. तथापि, काँग्रेस श्रेष्ठींनी नेतृत्वबदलाची शक्यता फेटाळून लावली. शिवकुमार गटातील आमदार गेल्या काही काळापासून दोघांमध्ये अडीच वर्षांचा कार्यकाळ वाटपाचा फॉर्म्युला अंमलात येण्याची शक्यता वर्तवत आहेत. सिद्धरामय्या गटाने अशा कोणत्याही कराराचे अस्तित्व नाकारले आहे.

राज्यातील काही काँग्रेस नेत्यांनी ऑक्टोबरमध्ये नेतृत्व बदलाच्या दाव्यांबाबत विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना ते बोलत होते. सुरजेवाला यांच्या भेटीबद्दल विचारले असता खर्गे म्हणाले की सुरजेवाला यांच्या अहवालाच्या आधारे आणि त्यांच्याकडून मिळालेल्या अभिप्रायाच्या आधारे आम्ही कोणती पावले उचलायची हे ठरवू. आता खर्गे यांच्या विधानाचा वेगवेगळा अर्थ लावला जात आहे. कर्नाटकमधील सत्ताधारी काँग्रेस दोन गटांमध्ये विभागली गेली आहे. एका गटाला सिद्धरामय्या यांना मुख्यमंत्री म्हणून कायम ठेवण्याची इच्छा आहे तर दुसऱ्या गटाला शिवकुमार यांच्यासाठी मार्ग मोकळा होणे अपेक्षित आहे. शिवकुमार गटाच्या मते सरकारच्या कार्यकाळाच्या मध्यभागी नेतृत्वबदल करण्याबाबत करार झाला होता. अर्थात हा दावा मुख्यमंत्र्यांच्या गटाने फेटाळून लावला आहे. सप्टेंबरनंतर 'क्रांतिकारी' राजकीय घडामोडींचे संकेत देणाऱ्या सहकार मंत्री के. एन. राजन्ना यांच्या वक्तव्यानंतर बदलांबाबतच्या अटकळींना पुन्हा उधाण आले होते. अशा वेळी सुरजेवाला यांची भेट झाली आहे.

सिद्धरामय्या यांचे जवळचे सहकारी राजन्ना यांनी असेही संकेत दिले होते, की सार्वजनिक बांधकाम विभागाचे मंत्री सतीश जारकीहोली हे शिवकुमार यांच्या जागी पुढील प्रदेशाध्यक्ष असतील. पक्षाच्या वर्तुळात मंत्रिमंडळात फेरबदलाचीही चर्चा आहे. कर्नाटकचे काँग्रेस आमदार एच. ए. इकबाल हुसेन यांनी दावा केला होता की शिवकुमार यांना पुढील दोन ते तीन महिन्यांमध्ये राज्याचे मुख्यमंत्री होण्याची संधी मिळू शकते. हे सरकार सत्तेत येण्यापूर्वी आमच्या (काँग्रेस) ताकदीची तुम्हाला सर्वांना माहिती आहे. हा विजय मिळवण्यासाठी कोणी संघर्ष केला, घाम गाळला आणि जोमदार प्रयत्न केले हे सर्वांना माहिती आहे. आम्हाला विश्वास आहे की पक्षश्रेष्ठींना परिस्थितीची जाणीव आहे आणि ते डी. शिवकुमार यांना संधी देण्यासाठी योग्य वेळी योग्य निर्णय घेतील. हुसेन यांनी सांगितले की 2023 च्या विधानसभा निवडणुकीनंतर काँग्रेसश्रेष्ठींनी सरकार स्थापन करण्याचा निर्णय घेतला. त्या वेळी आम्ही सर्वजण दिल्लीत एकत्र होतो. सोनिया गांधी, राहुल गांधी आणि मल्लिकार्जुन खर्गे यांनी निर्णय घेतला. सर्वांना हे माहित आहे की पुढचा निर्णयही तेच घेतील. आपल्याला वाट पाहावी लागेल; मात्र नव्या घडामोडींनुसार त्यांच्या म्हणण्याला काहीही अर्थ नाही. पाच वर्षे आपणच मुख्यमंत्री राहू, असे सिद्धरामय्या यांनी ठामपणे सांगितले. सिद्धरामय्या आणि शिवकुमार यांचे हातात हात घालून उंचावतानाचे छायाचित्र प्रसिद्ध झाल्यानंतर त्यांनी सिद्धरामय्या हेच मुख्यमंत्री राहतील, आमच्यात कोणताही संघर्ष नाही, असे सांगितले; परंतु त्यांचे त्यापुढचे वाक्य जास्त महत्त्वाचे आहे. पक्षश्रेष्ठींचा तसा निर्णय असेल तर मी काय करणार, माझ्यापुढे काय पर्याय आहेत, अशी उलट विचारणा त्यांनी केली. मागे त्यांनी पक्षाच्या निर्णयाविरोधात घेतलेली भूमिका आणि शिवकुमार आणि शशी थरूर यांच्या भाजपच्या प्रवेशाच्या चर्चा पाहता ही वादळापूर्वीची शांतता आहे का, असा प्रश्न उपस्थित होतो.

# महाराष्ट्राच्या अस्मितेचा सन्मान

**शिवरायांचे १२ किल्ले युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समाविष्ट होण्यासाठी फ्रान्सची राजधानी पॅरिस येथे मतदान पार पाडले यात अनेक देशांनी भारताच्या बाजूने मतदान केले आणि शिवरायांच्या गड किल्ल्यांना हा बहुमान प्राप्त झाला आणि छत्रपती शिवाजी महाराजांनी रचलेल्या दुर्गराजांचा ऐतिहासिक ठसा आंतरराष्ट्रीय स्तरावर अधोरेखित झाला. अर्थात हा प्रवास सोपा नव्हता शिवरायांच्या या गड किल्ल्यांचा युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समावेश होण्यासाठी भारताचे एक शिष्टमंडळ गेल्या अनेक महिन्यांपासून कठोर परिश्रम घेत होते.**



वारसा

श्याम ठाणेदार

पुणे




दीड वर्षापूर्वी छत्रपती शिवाजी महाराजांचे १२ गड आणि किल्ले जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समाविष्ट करावेत अशी शिफारस केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालयाने युनिस्कोकडे केली होती. केंद्रीय सांस्कृतीक मंत्रालयाने युनेस्कोकडे शिफारस केलेल्या या यादीत रायगड, प्रतापगड , साल्हेर, शिवनेरी, लोहगड, खांदेरी, राजगड, सुवर्णगड, पन्हाळगड, विजयदुर्ग, सिंधुदुर्ग व तमिळनाडू मधील जिंजी या बारा किल्ल्यांचा समावेश आहे. केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालयाने युनेस्कोकडे केलेली ही शिफारस मान्य झाली असून शिवरायांचे हे १२ किल्ले युनेस्कोच्या वारसा यादीत समाविष्ट झाल्याची घोषणा युनेस्कोने नुकतीच केली. शिवरायांचे हे बारा किल्ले युनेस्कोच्या वारसा यादीत समाविष्ट होणे ही अभिमानाची बाब आहे. शिवरायांचे हे बारा गड किल्ले जागतिक वारसा यादीत समाविष्ट होणे हा महाराष्ट्राच्या अस्मितेचा सन्मान आहे. या घोषणेने जगभरातील मराठी माणसांची छाती फुगली आहे. जगभरातील मराठी जणांसाठी हा सुवर्णक्षण आहे. या क्षणाची प्रतिक्षा मराठी माणूस गेली कित्येक शतके करत होता. शिवरायांचे १२ किल्ले युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समाविष्ट होण्यासाठी फ्रान्सची राजधानी पॅरिस येथे मतदान पार पाडले यात अनेक देशांनी भारताच्या बाजूने मतदान केले आणि शिवरायांच्या गड किल्ल्यांना हा बहुमान प्राप्त झाला आणि छत्रपती शिवाजी महाराजांनी रचलेल्या दुर्गराजांचा ऐतिहासिक ठसा आंतरराष्ट्रीय स्तरावर अधोरेखित झाला. अर्थात हा प्रवास सोपा नव्हता शिवरायांच्या या गड किल्ल्यांचा युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समावेश होण्यासाठी भारताचे एक शिष्टमंडळ गेल्या अनेक महिन्यांपासून कठोर परिश्रम घेत होते. त्यासाठी या शिष्टमंडळाने वीस देशांशी समन्वय साधला. आंतरराष्ट्रीय स्तरावर या शिष्टमंडळाने या गड किल्ल्यांच्या जागतिक वारसा यादीत समावेश का असावा हे पटवून दिले. महाराष्ट्र सरकार, देशाचे सांस्कृतिक मंत्रालय, भारतीय पुरातत्व खाते आणि भारताचे परराष्ट्र मंत्रालय यांचे यासाठी आभारच मानावे लागेल. त्यांच्या एकत्रित प्रयत्नानेच हे साध्य झाले. हिंदवी स्वराज्य स्थापन करताना शिवरायांनी हे गड किल्ले बांधले, जिंकले. हे गड किल्ले म्हणजे महाराष्ट्राच्या अस्मितेचे प्रतीक आहेत. शत्रूला न दिसणारे दरवाजे आणि किल्ल्यांची माची स्थापत्य हे मराठा स्थापत्यशास्त्रातील महत्त्वपूर्ण वैशिष्ट्यपूर्ण भाग आहे. ही माची स्थापत्य म्हणजे गडाच्या सुरक्षिततेच्या आणि युद्ध कौशल्याचा मुत्सद्दीनितीने रचलेला भाग आहे हेच अद्वितीय वैश्विक मूल्य आहे. हे गड किल्ले म्हणजे स्वराज्याच्या शौर्याचे आणि समृद्धीचे प्रतीक आहे. मराठा स्वराज्याचे प्रतीक असलेले हे गड किल्ले सह्याद्रीच्या कुशीत उभारले आहेत. ३०० वर्षांपूर्वी बांधलेल्या या गड किल्ल्यांच्या तटबंदीतून मराठा राजवटीच्या सामारिक शक्तीचं दर्शन घडलं. स्वराज्याच्या कुशीतील या गड किल्ल्यांमुळेच शिवरायांना शून्यातून स्वराज्य उभारता आले. स्वराज्याचे वैभव असलेले हे गड - किल्ले जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समाविष्ट झाले पाहिजे ही मराठी माणसांची प्रामाणिक इच्छा होती. आता मराठी माणसांची ही इच्छा पूर्ण झाली आहे. युनिस्कोने ही शिफारस मान्य केल्याने छत्रपती शिवाजी महाराजांचा गौरवशाली इतिहास जगभर पोहचेल. छत्रपती शिवाजी महाराज केवळ योध्ये नव्हते तर ते लोक कल्याणकारी, परोपकारी राजे होते हे जगासमोर येईल. यानिमित्ताने या किल्ल्यांचा वारसा आणि इतिहास देखील जगासमोर येईल. एखाद्या स्थळाचा जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समावेश करताना सर्वसाधाणपणे ते स्थान नैसर्गिक दृष्ट्या किती समृद्ध आहे आणि इतिहासाचा विचार करून त्या वास्तू किती महत्वाच्या आहेत या निकषावर निर्णय घेतले जातात. याच निकषावर २०१२ साली युनिस्कोने पश्चिम घाटाचा जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समावेश केला. अर्थात जागतिक वारसा स्थळांच्या यादीत हे गड किल्ले समाविष्ट झाले म्हणजे आपली जबाबदारी संपली असे सरकार आणि नागरिकांना वाटत असेल तर ते चुकीचे आहे. उलट मी तर म्हणेल महाराजांचे या गड - किल्ल्यांचा या यादीत समावेश झाल्याने आपली जबाबदारी आणखी वाढली आहे. महाराष्ट्राच्या अस्मितेचे प्रतीक असलेल्या या गड किल्ल्यांचा या यादीत झालेला समावेश कायम स्वरुपी टिकवून ठेवण्यासाठी सर्वांना खूप प्रयत्न करावा लागेल कारण जागतिक वारसा यादीत समावेश झालेल्या स्थळांचे संरक्षण आणि संवर्धन होत आहे का, याचे युनेस्कोच्या तज्ञ समितीतर्फे दर काही वर्षांनंतर मूल्यांकन केले जाते. संबंधित स्थळांकडे दुर्लक्ष झाल्यास किंवा संरक्षणास बाधा आल्यास त्या स्थळांचा दर्जा काढून घेण्याचा अधिकारी युनेस्कोकडे आहे. युनेस्कोच्या नियमानुसार जर जागतिक वारसा स्थळांच्या नियमांचे पालन झाले नाही तर तो दर्जा रद्दही होऊ शकतो.

# युवापिढी ऑनलाइन जुगारच्या विळख्यात

श्याम ठाणेदार

पुणे

सध्याचे युग हे तंत्रज्ञानाचे युग आहे आणि या तंत्रज्ञानाच्या युगात मोबाईल ही जीवनावश्यक गरज बनली आहे. आजची तरुण पिढी मोबाईलच्या इतकी आहारी गेली आहे की या तरुणांना मोबाईलचे व्यसनच जडले आहे. आज प्रत्येक तरुणाकडे स्मार्टफोन आहे. या स्मार्टफोनमध्ये इंटरनेटवर चालणारे अनेक प्रकारचे गेम असतात. या गेमने तरुणांना अक्षरशः वेड लावले आहे. कॅण्डी क्रश, ब्ल्यू व्हेल, अँग्री बर्ड, पोकोमेन, पब्जी असे ऑनलाइन गेम इंटरनेटवर धुमाकूळ घालत आहेत. ऑनलाइन रमी गेम हा देखील त्यापैकीच एक गेम. या ऑनलाइन रमी गेमच्या विळख्यात तरुणाई अडकली आहे. ऑनलाइन रमी गेम खेळण्याचे वेड तरुण पिढीला आर्थिक नुकसान करणारे ठरत आहे. मोबाईलवर खेळला जाणारा हा गेम म्हणजे एकप्रकारचा जुगाराच आहे. हातात असलेल्या मोबाईलवर ऑनलाइन रमी खेळण्याचे अनेक एप्लिकेशन उपलब्ध आहेत. घरी, शेतात, नोकरी, व्यवसायाच्या ठिकाणी अनेकजण एकत्र येऊन ऑनलाइन रमी खेळताना दिसत आहे. ऑनलाइन रमी हा एकप्रकारचा जुगार असून या जुगारात तरुण पिढी पुरती अडकली असून त्यांना त्यातून बाहेर काढण्याऐवजी चित्रपट तारे आणि क्रिकेट खेळणारे खेळाडू या ऑनलाइन रमी गेमची टीव्हीवर जाहिरात करून तरुण पिढीला जुगारच्या गर्तेत ढकलत आहे. चित्रपट तारे असोत की क्रिकेटपटू हे तरुणांचे आयडॉल असतात. त्यांच्या सर्व गोष्टींचे तरुण मुले अनुकरण करत असतात म्हणूनच ऑनलाइन रमी चालवणाऱ्या कंपन्या या सिलिब्रेटींना करोडो रुपये देऊन आपली जाहिरात करायला लावतात मात्र या सिलिब्रेटींनी आपण पैशासाठी तरुण पिढीला कोणत्या मार्गावर नेत आहोत याचा विचार करावा. केवळ पैसे कमावणे हा सिलिब्रेटींचा उद्देश नसावा सामाजिक दायित्व देखील तितकेच महत्वाचे आहे. चित्रपट तारे आणि क्रिकेटर यांनी सामाजिक जबाबदारीचे भान ठेवून ऑनलाइन रमीच्या जाहिराती बंद कराव्यात. ऑनलाइन जुगारच्या विळख्यात अडकल्याने तरुणांना मोठ्या आर्थिक नुकसानिस सामोरे जावे लागत आहे. ऑनलाइन रमी गेमच्या नादाला लागून अनेकजण कंगाल झाले आहेत. ऑनलाइन रमी गेममुळे अनेक कुटुंबे उध्वस्त होत आहेत. ऑनलाइन रमी गेमच्या विळख्यात अडकल्याने अनेक कुटुंबे बेघर झाले आहेत. ऑनलाइन रमी खेळून अनेक तरुण कर्जबाजारी झाली आहेत. ही कर्जे फेडण्यासाठी पालकांनी आपली घरे व शेती विकली आहे. सहज पैसे कमवण्याचे आमिष दाखवून लोकांच्या घामाची कमाई लुटली जात आहे. ऑनलाइन रमी खेळताना पैसे हरल्याने तरुणांमध्ये नैराश्य येत आहे. यातून काही तरुणांनी आत्महत्या देखील केल्या आहेत. या गेममुळे हिंसाचार देखील वाढला आहे. दक्षिणेकडच्या राज्यांनी ऑनलाइन गेमवर बंदी घातली आहे. कर्नाटक सरकारने तसा कायदाच केला आहे. केरळ, आंध्रप्रदेश आणि तेलंगणा राज्यातही ऑनलाइन रमीवर बंदी आहे. पुरोगामी महाराष्ट्रात मात्र अजूनही ऑनलाइन रमीवर बंदी नाही. गेल्या वर्षी झालेल्या पावसाळी अधिवेशनात देखील हा प्रश्न चर्चेत आला होता मात्र न्यायालयाने ऑनलाइन रमीवर बंदी घालण्यास नकार दिल्याचे सरकारतर्फे सांगण्यात आले. न्यायालयाने जरी ऑनलाइन रमीवर बंदी घालण्यास नकार दिला असला तरी महाराष्ट्र सरकारने अध्यादेश काढून तसा कायदा करावा. सरकारकडे प्रचंड बहुमत आहे शिवाय विरोधी पक्ष देखील या अध्यादेशाला पाठिंबाच देतील त्यामुळे अध्यादेश काढून ऑनलाइन रमीवर बंदी घालण्याचा कायदा महाराष्ट्र सरकारला करता येऊ शकतो. राज्यातील तरुणांना ऑनलाइन रमी या जुगारातून वाचवायचे असेल आणि तरुणांना ऑनलाइन जुगाराच्या विळख्यातून सोडवायचे असेल तर महाराष्ट्र सरकारने ऑनलाइन रमीवर बंदी घालणारा कायदा करायलाच हवा.




## राशीभविष्य

- **मेष** : नवे करार मार्गी लागतील. कार्यातील सातत्य कामी येईल. खर्च वाढला तरी प्राप्तीही तशीच राहील.
- **वृषभ** : गुंतवणुकीला चालना मिळेल. ज्येष्ठांच्या प्रकृतीस त्रास संभवतो. नोकरीत वरिष्ठांची मर्जी राखावी.
- **मिथुन** : कामाचा उत्साह वाढेल. महत्त्वाच्या भेटी लाभदायक ठरतील. बेरोजगारांना दिलासा मिळेल.
- **कर्क** : आर्थिक बाबतीत तडजोडीचं धोरण ठेवावं. व्यवसाय साधारण राहील. नातलगांचं सहकार्य राहील.
- **सिंह** : प्रगतीच्या नव्या संधी लाभतील. छोटा–मोठा प्रवास घडेल. वास्तुदोषांवर वेळीच उपाय करावेत.
- **कन्या** : रखडलेली कामं मार्गी लागतील. भावनेपेक्षा कर्तव्याला महत्त्व द्या. वाहन, यंत्रांचा वापर नीट करा.
- **तूळ** : कामाचं योग्य मोल होईल. आर्थिक अडचणींवर मात कराल. यांत्रिक–तांत्रिक क्षेत्रात संधी लाभतील.
- **वृश्चिक** : मनाजोग्या घटना घडतील. घरगुती प्रश्नांचा ताण राहील. शिक्षण क्षेत्रातील प्रयत्न कामी येतील.
- **धनु** : सरकारी कामं रखडतील. प्रेम प्रकरणात वाद–विवाद संभवतात. कसल्याही आमिषाला बळी पडू नये.
- **मकर** : महत्त्वाचे निर्णय विचारानं घ्यावेत. नव्या ओळखी कामी येतील. विवाहाचे बेत लांबणीवर पडतील.
- **कुंभ** : कार्यात अडचणी येतील. व्यवसायात नव्या समस्या उद्‌भवतील. कुलदेवतेची उपासना करायला हवी.
- **मीन** : इतरांवर विसंबून राहू नका. कार्यविस्तार तुर्तास नको. विद्यार्थ्यांना प्रगतीच्या नव्या संधी लाभतील.

संगोपन

## हवं मोकळं संभाषण

अलीकडेच शाळेत जायला लागलेली पाच वर्षांची रिया खोटं बोलायला शिकली आहे. हे पाहून तिची आई काळजीत पडली. खरं तर या वयात मुलं नव्या जगात प्रवेश करत असतात. अशा वेळी अनेकदा इतर मुलांकडून धडे घेत खोटं बोलू लागतात. अशा परिस्थितीत पालकांनी मुलांशी अत्यंत हळूवारपणे संवाद साधणं गरजेचं आहे.

* मुलं खोटं का बोलतात?

काही पालक मुलांना नेहमी हे करू नको, ते करू नको असं सांगत असतात. अशा वेळी मुलांमध्ये पालकांनी करू नको म्हणून सांगितलेलं काम करून पाहण्याची उत्सुकता निर्माण होते. उत्कंठा शमवण्याचा प्रयत्न केल्यास पालक रागवतील या भीतीने मुलं खोटं बोलतात. त्यामुळे एखादी कृती चुकीची आहे हे मुलांना समजवताना ती का चुकीची आहे, आणि ते केल्यास त्याचा काय परिणाम होऊ शकतो, हे देखील समजावून सांगावं. रागावण्याऐवजी समजून सांगण्यावर भर द्यावा. **क्रमशः**

## १४ जुलै — दिनविशेष

- २००० : फिजीतील उठावाचा सूत्रधार जॉर्ज स्पेटला अटक. देशद्रोहाचा आरोप.
- २०१५ : सट्टेबाजांशी असणाऱ्या संबंधांवरुन गुरूनाथ मयप्पन आणि राज कुंद्रा यांच्यावर तहहयात बंदी.
- २०१७ : उत्तर प्रदेश विधानसभेत स्फोटकं आढळल्याने खळबळ.
- २०१८ : लोकसभेच्या आगामी निवडणुकीचा विचार करत बिहारमधील दारूबंदीचा कडक कायदा काहीसा शिथिल करण्यात आला.

कोण होणार?

## व्हा इन्फर्मेशन मॅनेजर

सध्याच्या डिजिटल युगात लायब्ररियन्स इन्फॉर्मेशन मॅनेजर झाले आहेत. तुम्हीही इन्फॉर्मेशन मॅनेजर बनू शकता.

* पुस्तकं सर्व्हरवर योग्य पद्धतीने मांडणं, इंटरनेट सुरक्षेविषयीचं ज्ञान इन्फॉर्मेशन मॅनेजरला असायला हवं. लायब्ररी मॅनेजरकडे माहितीच्या सर्व स्रोतांची योग्य मांडणी असायला हवी. लायब्ररीशी संबंधित साधनसामुग्रीचं व्यवस्थापन जमायला हवं. * या क्षेत्रात येण्यासाठी वाचनाची आणि लोकांना भेटण्याची आवड हवी. कमी पैशांमध्ये जास्तीत जास्त पुस्तकांचा संग्रह करायला जमायला हवं. नव्या सॉफ्टवेअरची माहितीही हवी. * लायब्ररी सायन्समध्ये डिप्लोमा तसंच पीएचडीपर्यंत विविध अभ्यासक्रम करता येतात. इतर विषयात पदवी मिळवल्यानंतरही लायब्ररी सायन्सचा अभ्यासक्रम पूर्ण करता येईल. डिस्टन्स लर्निंगचा पर्यायही आहे. हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर सरकारी लायब्ररी, विद्यापीठं, राजकीय दूतावास, फिल्म लायब्ररी, माहिती केंद्र अशा ठिकाणी नोकरी मिळू शकते.

## पंचांग

**सोमवार, १४ जुलै २०२५**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७,
आषाढ कृ. ४, नक्षत्र : धनिष्ठा
चंद्रराशी : कुंभ , योग : आयुष्मान
सूर्योदय : ६.११, सूर्यास्त : ७.१८

## फॉरवर्डस

**नाराज़गी भीं एक़ ख़ूबसूरत रिश्ता हैं...**

**ज़िससें होतीं हैं... वों दिल औऱ दिमाग़ दोनों में रहतां हैं...!**

आरोग्यमंत्र

## फळं खा सालीसह

विविध फळांच्या सालींमध्ये बरीच पोषणमूल्यं असतात. ठराविक फळं सालीसकट खाल्ल्याने जास्त लाभ मिळू शकतात. याविषयी...

* सफरचंदाची साल काढू नयेत. सफरचंद अँटीऑक्सिडंट्स आणि सायटोन्यूट्रियंट्सनी युक्त असतं. सफरचंदाच्या सालीतले अँटीऑक्सिडंट्स अल्झायमरसारख्या विकारात गुणकारी मानले जातात. या फळाच्या सालीत फायबर आणि जीवनसत्त्वं असतात. सफरचंदाच्या सालीत ट्रिटेपॅनॉइड्स नावाचा घटक असतो. यामुळे कॅन्सरचा धोका बराच कमी होतो. * पिअरच्या सालीत फायबर आणि महत्त्वाचे पोषक घटक असतात. पिअरमधलं अर्ध्यापेक्षा जास्त फायबर सालीत असतं. यासोबतच सालींमध्ये अँटीऑक्सिड्ंट्स आणि सायटोन्यूट्रियंट्ससारख्या घटकांचं प्रमाणही जास्त असतं. * चिकू सालासह खाल्ला पाहिजे. चिकूच्या सालीत पोटॅशियम, लोह, फॉलेट आणि पँथोथेनिक ॲसिड हे घटक असतात. यामुळे पचनसंस्थेचं कार्य सुरळीत सुरू राहतं. * प्लम म्हणजे आलूबुखारच्या सालीत क्लोरोजेनिक ॲसिड असतं. हा 'क' जीवनसत्त्वाचा प्रमुख स्रोत मानला जातो. प्लम सालीसकट खाल्ल्याने बद्धकोष्टता आणि पचनसंस्थेशी संबंधित विकार दूर होण्यास मदत होते. * किवी या फळाची साल काढली जात असली तरी प्रत्यक्षात ती खाता येते. सालीसकट खाल्ल्याने हे फळ अधिक लाभदायी बनतं. यामुळे तिपटीने फायबर मिळतं.



## ग्रुमिंग

* चौकोनी चेहऱ्याच्या लोकांनी गोल फ्रेमवाले गॉगल्स घातले पाहिजे. चौकोनी गॉगल्समुळे तुमचा चेहरा अजूनच ठोकळ्यासारखा दिसेल.
* आयताकृती किंवा बदामी आकाराच्या चेहऱ्याच्या लोकांनी एव्हिएटर्स हा प्रकार कॅरी करायला हवा.
* अंडाकृती चेहऱ्याच्या लोकांनी काळजी करण्याचं काहीच कारण नाही. कोणत्याही फ्रेम्स या चेहऱ्यावर खुलून दिसतात.
* गॉगलच्या निवडीबाबत तुमचा गोंधळ उडत असेल तर एव्हिएटर्सचा पर्याय निवडा. तो कोणत्याही चेहऱ्याच्या लोकांवर खुलून दिसतो.

'राष्ट्र संचार' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave
Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

## At a Glance

### संजय गायकवाड पुन्हा आक्रमक

**मुंबई :** आमदार संजय गायकवाड यांनी आमदार निवासातील कॅन्टीनमध्ये जेवण चांगले मिळाले नाही म्हणून कॅन्टीन चालकाला मारहाण केली होती. ज्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाल्यानंतर त्यांच्यावर मोठ्या प्रमाणात टीका करण्यात आली. त्यांच्या मारहाणीचा प्रकरणानंतर त्यांच्यावर गुन्हा दाखल झाला. मात्र, गुन्हा दाखल होऊनही आमदार गायकवाड यांनी आक्रमक भूमिका घेतली असल्याचे दिसत आहे. बुलढाणाच्या येळगाव येथील पैनगंगा आदिवासी आश्रम शाळेतील १३ विद्यार्थिनींना अन्नातून विषबाधा झाली होती. ज्यातील आठ विद्यार्थांवर उपचार करून सोडण्यात आले, तर ५ जणांवर उपचार सुरु आहेत. औषध प्रशासनाने कारवाई न केल्याने आमदार संजय गायकवाड यांनी संताप व्यक्त केला आहे.

### ड्रिंक देत तरुणीवर अत्याचार

**कोलकाता :** कोलकातामध्ये एका विद्यार्थ्याने तरुणीवर अत्याचार केल्याचा आरोप केल्याने एकच खळबळ उडाली आहे. पीडितेने आरोपीविरोधात पोलिसांत तक्रार दाखल केल्यानंतर पोलिसांनी आरोपी विद्यार्थ्याला अटक केली आहे. आता या संपूर्ण प्रकरणात पीडितेच्या वडिलांनी धक्कादायक खुलासा केल्याने प्रकरणाला नवं वळण मिळालं आहे. पीडितेच्या वडिलांनी पोलिसांवरच आरोप केले आहेत. वडिलांच्या म्हणण्यानुसार, पोलिसांनी त्यांच्या मुलीला तक्रार दाखल करण्यास भाग पाडलं असल्याचा आरोप केला आहे.


# 'टेस्ला' भारतीय बाजारपेठेत?

## मंगळवारी मुंबईत टेस्लाचे भारतातील पहिल शोरुम होणार सुरू

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** टेस्लाचे सीईओ एलॉन मस्क यांची अमेरिकन कंपनी 'टेस्ला'चा भारतात येण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. अमेरिकेची बदललेले व्यापर धोरण, समीकरण आणि आयात शुल्काचा फटका भारतासह जगातील सर्वच देशांना बसलाय. त्यात भारतात टेस्लाचा होत असलेला प्रवेश ही फार मोठी सकारात्मक घडामोड मानली जात आहे.

येत्या मंगळवारी मुंबईत टेस्लाचे भारतातील पहिल शोरुम सुरू होत आहे. या शोरुममध्ये ग्राहकांना टेस्लाच्या दमदार इलेक्ट्रिक कार जवळून पाहता येतील. तसेच या आलिशान कारची टेस्ट ड्राईव्हही




याच आठवड्यापासून ग्राहकांकरता उपलब्ध होईल. या शोरूममध्ये ग्राहकांचा अनुभव अधिक समृद्ध करण्यासाठी अनेक एआय फीचर्ससुद्धा उपलब्ध करण्यात आलेत आहेत. इंटरॲक्टिव्ह स्क्रीन आणि डिस्प्लेच्या माध्यमातून ग्राहकांना कारची माहिती मिळेल. हे सेंटर केवळ ईव्ही कारच शोरूम नाही तर इथ ग्राहकांना टेस्लाची मॉडेल ३, मॉडेल वाय, मॉडेल एस, मॉडेल एक्स आणि सायबरट्रकचीही माहिती मिळेल. याशिवाय ग्राहकांना टेस्लाची सौरऊर्जा उत्पादनही दिसतील. सोलर पॅनल, पावरवॉल, सोलर रुफ हेदेखील इथं येणाऱ्यांना पाहायला मिळतील.

### इतर भारतीय कंपन्यांना टेस्ला देणार आव्हान

● भारतात केवळ शोरुम उघडण्यापर्यंत टेस्लाची दौड मर्यादित राहिलेली नाही . भारतीय बाजारपेठेत टेस्लाच्या येण्यानं वाहन उद्योगात मोठी बदल होण्याची शक्यता आहे. भारतात सध्या इलेक्ट्रिक वाहननिर्मिती आणि विक्री नुकतीच सुरू झालीय. टेस्ला हा आंतराष्ट्रीय बाजारपेठेत ईव्ही तयार करणारा एक मोठा ब्रँड आहे. टेस्लानं जर भारतीय बाजारपेठेत परवडणाऱ्या दरात वाहनविक्री केली तर तर इतर भारतीय कंपन्यांसाठी ते एक मोठे आव्हान ठरण्याची शक्यता तज्ञांकडून व्यक्त केली जात आहे.

याच पार्श्वभूमीवर परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याहस्ते टेस्लाला ई-वाहन विक्री परवाना पत्र देण्यात येईल. मंत्रालयातील प्रताप सरनाईकांच्या दालनात हा सोहळा पार पडेल. १५ जुलै रोजी मुंबईतील जिओ वर्ल्ड ड्राईव्हमध्ये या शोरूमच उद्घाटन होईल. बीकेसी हे मुंबईच्या मध्यवर्ती भागातील एक प्राईम लोकेशन आहे. ॲप्पलचं भारताचील फ्लॅगशिप स्टोअरही याच परिसरात आहे. मार्च महिन्यात टेस्लानं इथ जवळपास ४००० चौरस फूटाची जागा भाड्यावर घेतली आहे.

# इस्रोचे अंतराळाच्या दिशेने मोठे पाऊल

## गगनयानच्या 'इंजिन'ची यशस्वी चाचणी



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भारतीय अंतराळ संशोधन संस्थेने (इस्रो) अंतराळाच्या दिशेने आणखी एक पाऊल टाकले आहे. भारतीय अंतराळ संशोधन संस्थेने (इस्रो) पात्रता चाचणी कार्यक्रम पूर्ण करून गगनयान मोहिमेसाठी सर्व्हिस मॉड्यूल प्रोपल्शन सिस्टीम (एसएमपीएस) यशस्वीरित्या विकसित केली आहे. या प्रणालीला गगनयानाचे इंजिन म्हणता येईल. एसएमपीएसच्या एकात्मिक कामगिरीची पडताळणी करण्यासाठी ३५० सेकंदांसाठी एसएमपीएसची पूर्ण-कालावधीची 'हॉट टेस्ट' घेण्यात आली. नाममात्र मिशन प्रोफाइलच्या सर्व्हिस मॉड्यूल-आधारित उड्डाणासाठी शुक्रवारी रिअल-कंडीशन चाचणी घेण्यात आली.

'फ्लाइट ऑफ नॉमिनल मिशन प्रोफाईल' म्हणजे विमानाचा उड्डाणमार्ग आणि इतर क्रियाकलाप. गगनयान मोहीम ही भारताची पहिली मानवी अंतराळ मोहीम आहे. यामुळे अंतराळात मानव पाठवण्यात भारताला मोठं यश मिळालं आहे. शुभांशु शुक्ला सध्या आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात आहे. ही प्रोपल्शन सिस्टीम गगनयानच्या इंजिनप्रमाणे काम करेल. अंतराळात गेल्यानंतर गगनयानावर नियंत्रण आणि प्रगती करण्याचे काम हे करेल. याचा उपयोग कक्षा बदलण्यासाठी, दिशा बदलण्यासाठी आणि गगनयानाचा वेग कमी करण्यासाठी केला जाणार आहे. याशिवाय पृथ्वीवर परतण्यातही त्याचा मोलाचा वाटा असणार आहे. यामध्ये दोन प्रकारचे इंधन वापरले जाणार आहे. लिक्विड अपोजी मोटर्सचा वापर मोठ्या ऑपरेशनसाठी केला जाणार आहे. त्याचबरोबर थ्रस्टरसाठी रिॲक्शन कंट्रोल सिस्टीमचा वापर करण्यात येणार आहे.

इस्रोने या मॉडेलची वेगवेगळ्या वातावरणात किमान २५ वेळा चाचणी केली आहे. त्याचबरोबर अंतराळवीरांसाठी ते तयार आहे की नाही हे पाहण्यासाठी हे इंजिन १४ हजार सेकंद चालवण्यात आले. या यशाचा अर्थ इस्रो आता मानवासाठी सुरक्षित अंतराळयान तयार करण्यास सक्षम आहे. आता इस्रोची टीम या कामात अधिक मेहनत घेईल आणि अंतराळ मोहिमेची तयारी सुरू करेल. गगनयानचे उड्डाण झाल्यानंतर अंतराळ तंत्रज्ञान असणारा भारत हा जगातील चौथा देश बनेल. अमेरिका, रशिया आणि चीन अंतराळात अंतराळवीर पाठवत आहेत.

# वैमानिकांची चूक सिद्ध करण्यासाठी..

## पायलट्स असोसिएशनचा खळबळजनक दावा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** एअर इंडिया-१७१ विमान अपघाताच्या तपासणी अहवालावर वैमानिकांच्या संघटनेने प्रश्नचिन्ह उभे केले आहे. पायलट असोसिएशन ऑफ इंडिया या संघटनेने म्हटले आहे की, तपासणीत वैमानिकांना लगेच दोषी ठरवणे योग्य नाही. पीएआयला वाटते की, तपासणी निष्पक्षपणे व्हावी आणि सर्व बाबी विचारात घेतल्या जाव्यात. विमान दुर्घटना तपासणी ब्युरोने एक अहवाल जारी केला आहे. हा अहवाल प्राथमिक आहे. पीएआय संघटनेला वाटते की तपासणी योग्य दिशेने जात नाही. तपासणीतील गोपनियतेवरून संघटनेने आश्चर्य व्यक्त केले आहे. तसेच, तपासणीसाठी पात्र लोकांचा समावेश नसल्याचेही त्यांचे म्हणणे आहे.

पीएआयने एक निवेदन जारी केले आहे. यात 'वॉल स्ट्रीट जर्नल'मधील एका बातमीचा हवाला देण्यात आला आहे. त्या बातमीत म्हटले आहे की, इंजिनच्या फ्यूल कंट्रोल स्विचच्या हालचालीवर तपासणी अधिक केंद्रित आहे.



तपासणी अहवालातही याच गोष्टीला अपघाताचे कारण मानले आहे. अहवालात दोन वैमानिकांच्या संभाषणाचा उल्लेख आहे. त्यात एक वैमानिक दुसऱ्याला विचारतो, " 'तुम्ही कट ऑफ का केले?' " त्यावर दुसरा वैमानिक उत्तर देतो, " 'मी असे काही केले नाही.' "

अहवालात असे म्हटले आहे की, हवेत असताना फ्यूल कटऑफ स्विच हलल्यामुळे इंजिन बंद झाले.पीएआयचे म्हणणे आहे की, तपासणी वैमानिकांना दोषी मानून केली जात आहे. यावर संघटनेने जोरदार आक्षेप घेतला आहे. तपासणी ब्युरोच्या अहवालानुसार, विमानाचा वेग १८० नॉट्सपर्यंत पोहोचला होता. त्यानंतर लगेचच, दोन्ही इंजिनांचे 'इंधन कटऑफ स्विच' एकापाठोपाठ 'रन' (चालू) स्थितीतून 'कटऑफ' (बंद) स्थितीत आले. दोन्ही स्विचमध्ये एक सेकंदाचा फरक होता. यामुळे इंजिनांना इंधन मिळणे बंद झाले आणि ती स्लो झाली. 'रन' म्हणजे इंजिनला इंधन मिळत आहे. 'कट ऑफ' म्हणजे इंधनाचा पुरवठा बंद झाला आहे.

वैमानिकांच्या असोसिएशनने सांगितले की, 'वॉल स्ट्रीट जर्नल'ने १० जुलै रोजी एक बातमी प्रकाशित केली. त्यामध्ये इंधन नियंत्रण स्विचच्या चुकीच्या हालचालीचा उल्लेख होता.

# दिव्यांग जोडप्यांना एसटी बसमधून उतरवलं

## महिलेला दुखापत, प्रहार संघटना आक्रमक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**रायगड :** राज्य परिवहन महामंडळाच्या निष्काळजी आणि अमानवी वागणुकीचा आणखी एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. रायगड जिल्ह्यातील महाडमध्ये शिवशाही एसी बसमधून प्रवास करत असलेल्या दिव्यांग जोडप्याला अर्ध्या प्रवासात जबरदस्तीनं खाली उतरवण्यात आल्याचा आरोप एसी बस चालकावर करण्यात आला आहे. या घटनेनं संपूर्ण परिसरात संतापाची लाट उसळली असून, याप्रकरणी प्रहार दिव्यांग संघटनेचे कार्यकर्ते आक्रमक झाले आहेत.



दिव्यांग जोडपं नसीर निगुडकर आणि नसिमा निगुडकर हे माणगावहून पोलादपूरकडं जात होते. नसीर यांना दोन्ही डोळ्यांनी दिसत नाही आणि त्यांच्या पत्नी नसिमा या ठेंगण्या असल्यामुळं दोघंही दिव्यांग प्रमाणपत्रधारक आहेत. मात्र, तरीदेखील या जोडप्याला बसमधून अपमानास्पद वागणूक देत, महाडपासून १५ ते २० किलोमीटर अंतरावर अर्धवट प्रवासात खाली उतरवण्यात आलं. ही संपूर्ण घटना एसी बंद केल्याच्या वादातून उफाळून आली. प्रवासादरम्यान एसी बंद केल्यामुळं या जोडप्यानं आक्षेप घेतला. त्यावरुन चालकाचा पारा चढला आणि त्यानं दोघांनाही रस्त्यावर उतरवलं. या गोंधळात नसिमा निगुडकर यांना दुखापत झाली असल्याचाही आरोप करण्यात आला आहे.

या घटनेनंतर प्रहार संघटनेचे कार्यकर्ते महाड एसटी आगारात धडकले आणि संबंधित चालकाविरोधात तक्रार दाखल करण्यात आली. संघटनेकडून आरोपी चालकावर कठोर कारवाईची मागणी करण्यात येत आहे. या घटनेमुळं एसी महामंडळाच्या कर्मचाऱ्यांच्या संवेदनशीलतेवर प्रश्न निर्माण झाला आहे.

### लक्ष्मण हाके यांची प्रणिती शिंदेंवर टीका

**जालना :** "प्रणिती शिंदे राजकारण करत आहेत. खासदारकी भोगत आहेत. पण ते सोलापूर जिल्ह्यातील बहुसंख्या भटक्या विमुक्त जातीच्या जीवावर, त्यांच्या बापाने काढलेल्या एका जआर मुळे ओबीसी समाजाच्या आरक्षणाची घटनात्मक चौकट उद्ध्वस्त झाली होती", अशी टीका लक्ष्मण हाके यांनी केली आहे.

मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील पुन्हा एकदा आपल्या मागण्यांसाठी मुंबईच्या दिशेला मोर्चा काढणार आहेत. मनोज जरांगे पाटील सध्या जालनातील अंतरवली सराटी गावात मोर्चाचं नियोजन करत आहेत. यावेळी आपल्या मागण्या मान्य झाल्याशिवाय मुंबई सोडणार नाही, अशी भूमिका मनोज जरांगे पाटील यांनी घेतली आहे. या आवाहनाला काँग्रेस खासदार प्रणिती शिंदे यांनी प्रतिसाद दिला.

# 'लाडकी बहिण'मुळे निधी मिळण्यात दिरंगाई

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** राज्य सरकारची गेमचेंजर स्कीम म्हणून ओळखली जाणारी लाडकी बहीण योजना नेहमीच चर्चेत असते. लाडकी बहीण योजनेसाठी अनेक खात्यांमधील निधी वळवले जातात, विविध खात्यांच्या पैशांवर डल्ला मारला जातो अशा तक्रारी वारंवार समोर येत असतात. काही दिवसांपूर्वीच सामाजिक विधी तसेच न्याय खात्याचा निधी लाडक्या बहीणसाठी दिल्याचा आरोप केला होता. अशातच आता अजित पवारांचेच विश्वासू शिलेदार मंत्री दत्तात्रय भरणे यांनी मोठे विधान केले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते, क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे यांनी लाडकी बहीण योजनेबाबत केलेल्या एका विधानाने राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा रंगल्या आहेत. लाडकी बहीण योजनेमुळे निधी यायला उशीर होतोय, असा दावा मंत्री दत्तात्रय भरणे यांनी केला आहे. इंदापूरमध्ये अपूर्ण घरकूल लाभार्थी मेळावा व पहिला हप्ता वितरण कार्यक्रमामध्ये त्यांनी याबाबत विधान केले.

"मी माझ्या तालुक्यातील नागरिकाचा फायदा कसा होईल ते बघतो. मी मुंबई पुण्यामध्ये कुठेही असूद्या इंदापूर तालुक्यामध्ये सर्वात जास्त निधी आणण्याचा प्रयत्न करत असतो. मात्र लाडक्या बहिणीमुळे निधी यायला थोडा उशीर होतोय, थोडा उशीर झाला पण गाडी हळूहळू रुळावरती यायला लागली आहे," असं मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले. एकीकडे विरोधक लाडकी बहीण योजनेवरुन सरकारवर निशाणा साधत असतानाच महायुतीच्या मंत्र्यांनीच याबाबत कबुली दिल्याने राजकीय वर्तुळात चर्चा रंगल्या आहेत.

दरम्यान, दत्तात्रय भरणे यांच्या या विधानावर राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही प्रतिक्रिया दिली आहे. मी त्याला विचारतो. तो माझा सहकारी आहे, मंत्रिमंडळात आहे. नेमका कुठला निधी मिळाला नाही? आणि कुठल्या अर्थानं ते बोलले हे त्यांना विचारून सांगतो.

पान १ वरून

### राष्ट्रीय जागृती आणि सामाजिक सुधारणांचा मेळ: अमृता फडणवीस

सन्मानचिन्ह, रुपये २५ हजार रुपये सन्मानराशी, महावस्त्र असे पुरस्काराचे स्वरुप होते. निराधार मुली आणि परित्यक्त महिलांसाठी तसेच अनाथ नवजात शिशूंना कायदेशीरपणे दत्तक देण्याचे काम करणा-या 'महिला सेवा मंडळ' या संस्थेला तसेच लॅप्रोस्कोपिक शस्त्रक्रियेसाठी जगद्विख्यात ओबेसिटी तज्ञ डॉ. जयश्री तोडकर आणि विरूपित पाषाण शिल्पांना नवसंजीवनी देणा-या वज्रलेपनकार स्वाती ओतारी यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. 'महिला सेवा मंडळ' च्या ज्येष्ठ विश्वस्त पुष्पा हेगडे यांनी पुरस्कार स्वीकारला. काका हलवाई चे राजेंद्र आणि युवराज गाडवे यांनी दत्तमंदिर ट्रस्टला ५१ हजार रुपयांची देणगी दिली. तसेच यावेळी संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज संस्थानच्या पहिल्या महिला विश्वस्त ॲड. रोहिणी पवार यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

अमृता फडणवीस म्हणाल्या, दत्तमंदिरात तब्बल १२८ वर्षांपासून प्रत्येकजण श्रद्धा व सेवेसाठी येतो. हे मंदिर समाजाच्या सेवेसाठी अग्रेसर आहे, याचा आनंद आहे. खरी मानवता काय आहे, हे विश्वस्तांनी त्यांच्या कार्यातून दाखवून दिले आहे. गणेशोत्सव सार्वजनिक स्वरूपात साजरा व्हावा, यामध्ये लोकमान्य टिळकांच्या पाठीमागे लक्ष्मीबाई आणि दगडूशेठ हलवाई यांचा हातभार होता. लक्ष्मीबाई या शांतपणे परिवर्तन घडवून आणत. त्यांच्यामध्ये लोकांप्रती संवेदना होती. त्यांच्यासारखे कार्य या तिन्ही पुरस्कारार्थी यांचे असून आपल्या ज्ञानाचा इतरांना फायदा झाला, तरच जीवन समृद्ध होते, असेही त्यांनी सांगितले.

डॉ. निवेदिता एकबोटे म्हणाल्या, लक्ष्मीबाई दत्तमंदिरातील दत्तमहाराजांची जागृत अशी मूर्ती आहे. त्यामुळे मंदिरात आल्यानंतर वेगळ्या प्रकारची ऊर्जा जाणवते. आज ज्या तीन महिलांना पुरस्कार देण्यात आला, त्यांचे कार्य आणि अमृता फडणवीस यांचे कार्य मोठे आहे. त्याप्रमाणे मी देखील वाटचाल करीत आहे.

डॉ.जयश्री तोडकर म्हणाल्या, लक्ष्मीबाई या १२५ वर्षांपूर्वीच्या आंत्रप्रेन्युअर होत्या. त्या धैर्यवान व्यक्ती होत्या. त्यांनी शतकानुशतके आपल्या कार्याचा ठसा उमटवला आहे. आज देशाला शारीरिक तंदुरुस्तीची आवश्यकता असून लठ्ठपणा आणि मधुमेह भारतात ज्याप्रमाणात आहे, तेवढा बाहेर कुठेही नाही. त्यामुळे आपण याबद्दल जागरूक राहून जागृती करायला हवी.

ॲड. प्रताप परदेशी यांनी स्वागत केले. युवराज गाडवे यांनी आभार मानले. डॉ. प्रिया निघोजकर यांनी सूत्रसंचालन केले.

### अंतराळवीर शुभांशु शुक्ला उद्या पृथ्वीवर परतणार

सांगितले की, ड्रॅगन अंतराळयान आयएसएसवरून चार अंतराळवीरांव्यतिरिक्त ५८० पाउंड (सुमारे २६३ किलो) पेक्षा जास्त सामान, नासाचे हार्डवेअर आणि ६० हून अधिक वैज्ञानिक प्रयोगांचा डेटा घेऊन १५ जुलै रोजी पृथ्वीवर परतणार आहे.

एक्सिओम-४ मिशनच्या कमांडर पेगी व्हिटसन यांनी आपल्या सोशल मीडिया हँडलवरील एका पोस्टमध्ये सांगितले की, त्या आणि त्यांची टीम आयएसएसवरील शेवटच्या दिवसाचा आनंद घेत आहेत. त्यांनी म्हटले की, शुक्ला यांनी आणलेल्या गाजराच्या हलव्याने आणि आमरसाने सर्वांची मने जिंकली आहेत.

इस्रोने सांगितले की, अंतराळातून परतणारे शुभांशु शुक्ला यांची प्रकृती उत्तम असून ते उत्साहाने भारलेले आहेत. सात दिवसांच्या पुनर्वसन काळात फ्लाइट सर्जन त्यांच्या शारीरिक आणि मानसिक स्थितीवर लक्ष ठेवतील. विशेष म्हणजे, इस्रोने या मोहिमेसाठी सुमारे ५५० कोटी रुपये खर्च केले आहेत. हा अनुभव २०२७ मध्ये सुरू होणाऱ्या महत्त्वाकांक्षी गगनयान मोहिमेच्या तयारीसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार आहे. आयएसएस ताशी २८,००० किलोमीटर वेगाने पृथ्वीची परिक्रमा करते. क्रू ड्रॅगन यान स्वयंचलितपणे स्टेशनपासून वेगळे होईल आणि हळूहळू वेग कमी करून पृथ्वीच्या वातावरणात प्रवेश करेल.

### तिजोरीत खडखडाट

गेल्या सरकारमध्ये राज्य उत्पादन शुल्क हे खाते शिवसेनेकडं होते. तेव्हा शंभूराज देसाई हे उत्पादनशुल्क मंत्री होते. मद्य व्यवसायात अजित पवारांचे निकटवर्तीय आहेत. त्यामुळं समितीचे अध्यक्षपद अजित पवारांना देण्यावरुन काहींचा आक्षेप आहे. दुसरीकडे राज्यात मोफत मद्यविक्री परवाना देण्यावरून मंत्रिमंडळात वाद झाल्याचं बोललं जात आहे.

### म्हाडाकडून ५२८४ घरांची...

योजनेअंतर्गत सुमारे तीन हजार घरं उपलब्ध आहेत. तसेच, २० टक्के सर्वसमावेशक योजनेअंतर्गत एकूण ५६५ घरं दिली जाणार आहेत. याशिवाय, इतर योजनांमधील १,६७७ घरं देखील यामध्ये समाविष्ट आहेत. ही योजना आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक, अल्प उत्पन्न गट, मध्यम उत्पन्न गट आणि उच्च उत्पन्न गट या सर्व गटांसाठी असून, पारदर्शक लॉटरी प्रणालीद्वारे घरांची वाटप प्रक्रिया होणार आहे. १४ जुलै रोजी १ वाजता म्हाडाचे उपाध्यक्ष संजीव जयस्वाल यांच्याहस्ते सोडतीसाठी अर्ज नोंदणी आणि अर्ज भरणा प्रक्रियेचा शुभारंभ होणार आहे.

### भाजप नेते सुरेंद्र केवट...

मोर्चाच्या पुनपुन ब्लॉकचे माजी अध्यक्ष होते. गोळीबारानंतर स्थानिकांनी त्यांना गंभीर अवस्थेत पाटणा एम्समध्ये नेले. तिथे त्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. फुलवारी शरीफ विधानसभा मतदारसंघाचे आमदार गोपाल रविदास आणि माजी मंत्री श्याम रजक एम्समध्ये पोहोचले. त्यांनी मृतांच्या कुटुंबियांची भेट घेतली आणि शोक व्यक्त केला. त्यांनी प्रशासनाकडून त्वरित कारवाईची मागणी केली. घटनेची माहिती मिळताच पिपरा पोलिस घटनास्थळी पोहोचले. एफएसएल टीमकडून फॉरेन्सिक तपासणी सुरु होती. घटनेनंतर गावात आणि परिसरात तणाव आणि भीतीचे वातावरण आहे.

### मद्यधुंद ऑडी चालकाने...

तत्काळ कारवाई करत आरोपी चालकाला अटक केली आहे. ही घटना ९ जुलैच्या रात्री १.४५ वाजता वसंत विहार येथील शिवा कॅम्पच्या समोरील फुटपाथवर घडली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या वेळी पाचही जण रस्त्याच्या कडेला झोपलेले होते. चालक उत्सव शेखर (वय ४०, रहिवासी द्वारका, दिल्ली) याने आपल्या ऑडी गाडीने अचानक रस्ता सोडून फुटपाथवर घुसून सर्वांवर गाडी घातली. अपघाताच्या वेळी उत्सव शेखर हा मद्यधुंद अवस्थेत गाडी चालवत होता.

# ब्रिगेडचे प्रवीण गायकवाड यांच्यावर शाईफेक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**अक्कलकोट :** अक्कलकोट येथे फत्तेसिंह शिक्षण संस्था व सकल मराठा समाजाच्या एका कार्यक्रमात संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांना काळे डोक्यात शाई ओताण्यात आल्याची घटना घडली आहे. छत्रपती संभाजी महाराज यांचा एकेरी उल्लेख आणि श्री स्वामी समर्थ यांचा अनादर केल्याच्या निषेधार्थ शिवधर्म फाउंडेशनच्या संतप्त कार्यकर्त्यांनी शाई फासली. रविवारी अक्कलकोट येथे एका नागरी सत्कार आणि मानपत्र कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून प्रवीण गायकवाड आले होते त्यावेळी हा प्रकार घडला.

याबाबत अधिक माहिती अशी की प्रवीण गायकवाड यांनी आपल्या संघटनेच्या नावामध्ये छत्रपती संभाजी महाराजांचा एकेरी उल्लेख केल्याने शिवधर्म फाउंडेशन कार्यकर्ते




आक्रमक झाले होते. त्याचबरोबर स्वामी समर्थांचा एकेरी उल्लेख करून त्यांचा अवमान केल्याचा देखील राग पदाधिकाऱ्यांच्या मनात होता.

प्रवीण गायकवाड यांच्या निषेधार्थ शिवधर्म फाउंडेशनच्या कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी केली. प्रवीण गायकवाड यांनी श्री स्वामी समर्थ आणि धर्मवीर संभाजी महाराज यांच्याबाबत चुकीचे वक्तव्य केले होते. संपूर्ण महाराष्ट्रात प्रवीण गायकवाड यांच्या वक्तव्याच्या निषेधार्थ आंदोलने सुरू आहेत. प्रवीण गायकवाड हे रविवारी अक्कलकोट येथे आले होते. प्रवीण गायकवाड यांना हलगीच्या कडकडाटात स्वागत करून संयोजक कार्यक्रमाच्या ठिकाणी घेऊन जात असताना शिवधर्म फाउंडेशनच्या कार्यकर्त्यांनी त्यांना वाटेतच अडवून त्यांच्या अंगावर काळी शाई ओतली. तसेच त्यांच्या तोंडाला सुद्धा काळे फासले. हा सर्व प्रकार होत असताना तेथे पोलीस किंवा अन्य कोणीही बंदोबस्तासाठी नव्हते

प्रवीण गायकवाड यांच्या निषेधार्थ कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी केली. तर धर्मविर संभाजी महाराज आणि श्री स्वामी समर्थांचा जयजयकार करून पदाधिकारी आणि कार्यकर्ते निघून गेले. प्रवीण गायकवाड यांच्या तोंडाला काळे फासण्यात आल्यानंतर एकच खळबळ उडाली आहे.संभाजी ब्रिगेडच्या नावामध्ये धर्मवीर शब्द वापरासाठी काही दिवसापूर्वीच शिवधर्म फाउंडेशनच्यावतीने सोलापुरात मोठा मोर्चा काढण्यात आला होता. त्यानंतर रविवारी अक्कलकोटमध्ये प्रवीण गायकवाड यांच्या तोंडाला काळी फासण्यात आले आहे.


दरम्यान, यापूर्वी देखील गायकवाड व संभाजीब्रिगेडच्या विरोधात शिवधर्म संघटनेने उपोषण केले होते. आज त्यांच्या डोक्यावर शाई ओतली.

## जयंत पाटील प्रकरणी अजित दादांची प्रतिक्रिया

# हा त्यांच्या पक्षाचा अंतर्गत प्रश्न

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्याची चर्चा राजकीय वर्तुळात कालपासून सुरू आहे. जितेंद्र आव्हाड यांनी ही चर्चा खोडून काढली असली, तरी अनेक नेत्यांनी यावर प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत. शशिकांत शिंदे यांचे नाव या पदासाठी निश्चित झाल्याचे सांगितले जात असून, शिंदे यांनी स्वत: या शर्यतीत असल्याचे मान्य केले आहे. दरम्यान, उपमुख्यमंत्री आणि जयंत पाटलांचे माजी सहकारी अजित

पवार यांनीही यावर भाष्य केले आहे.

पुणे जिल्ह्यातील विकासकामे आणि समस्यांचा आढावा घेण्यासाठी आलेल्या अजित पवार यांनी माध्यमांशी संवाद साधला. जयंत पाटलांच्या राजीनाम्याबाबत विचारले असता ते म्हणाले, "त्यांच्या पक्षाच्या अंतर्गत बाबी त्यांनी ठरवाव्यात, हा त्यांचा प्रश्न आहे." असे ते म्हणाले.

जयंत पाटील तुमच्याबरोबर येणार का, असा प्रश्न विचारला असता अजित पवार म्हणाले, "जयंत पाटील हे वरिष्ठ नेते आहेत. जयंत पाटील, दिलीप वळसे पाटील, आर. आर. पाटील आणि मी, १९९० च्या बॅचचे आमदार आहोत. अनेक वर्षे एकत्र काम केल्याने आमचे चांगले संबंध आहेत. पण माझी आणि त्यांची राजकीय भूमिका वेगळी आहे, हे सर्वांना माहीत आहे." असे अजित पवार म्हणाले.

अजित पवार म्हणाले, "जयंत पाटलांनी राजीनामा का दिला, हे मला माहीत नाही आणि विचारण्याचा अधिकारही नाही. पुढच्या आठवड्यात अधिवेशनात भेट झाल्यास त्यांच्याशी याबाबत बोलणार. ते गेली सहा-सात वर्षे प्रदेशाध्यक्ष आहेत. कदाचित ते इतरांना संधी देऊन राष्ट्रीय पातळीवर जाण्याचा विचार करत असावेत." जयंत पाटलांच्या राजीनाम्याच्या चर्चेने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली असून, याबाबत पुढील घडामोडींकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

#रा

## तामिळनाडूत डिझेल घेऊन जाणाऱ्या मालगाडीला आग



**चेन्नई :** तामिळनाडूतील तिरुवल्लूरजवळ रविवारी सकाळी डिझेल घेऊन जाणाऱ्या मालगाडीला भीषण आग लागली. रेल्वेच्या एका अधिकाऱ्याने ही माहिती दिली. ही आग आधी मालगाडीच्या एका डब्यात लागली आणि नंतर लगेचच इतर डब्यांमध्ये पसरली. आगीचे जोरदार लोट अगदी वरच्या बाजूला उठताना दिसत होते, ज्याची व्हिडिओ क्लिप सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. माहिती मिळताच अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झाले, अशी माहिती रेल्वे अधिकाऱ्यांनी दिली. रेल्वे सेवेचा ओव्हरहेड वीजपुरवठा बंद करण्यात आला. खबरदारीचा उपाय म्हणून लोकल सेवा तात्पुरती बंद करण्यात आली आहे, अशी माहिती दक्षिण रेल्वेने दिली आहे. याशिवाय ८ एक्स्प्रेस रद्द करण्यात आल्या असून ५ गाड्यांचे मार्ग बदलण्यात आले आहेत. आठ गाड्यां ना त्यांच्या गंतव्यस्थानापेक्षा कमी थांबवण्यात आले आहे, असे सांगण्यात आले.

## पाकिस्तान यूएनएससीमध्ये खुली चर्चा करणार

**नवी दिल्ली :** संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेचे (यूएनएससी) अध्यक्षपद भूषविणाऱ्या पाकिस्तानने आपल्या कार्यकाळाच्या शेवटच्या टप्प्यात मोठे राजनैतिक पाऊल उचलण्याची योजना आखली आहे. २२ जुलै रोजी जागतिक बँक खुली चर्चा आयोजित करणार आहे, ज्याचा विषय "जगातील प्रलंबित वादांचे शांततापूर्ण निराकरण" असेल. चर्चेअंती पाकिस्तान सदस्य देशांना संयुक्त राष्ट्रांच्या सनदेच्या सहाव्या अध्यायांतर्गत उपलब्ध शांततापूर्ण तंटा निवारण यंत्रणेचा पुरेपूर वापर करण्याचे आवाहन करणारा ठराव मांडणार आहे. जम्मू-काश्मीरचा मुद्दा आंतरराष्ट्रीय पटलावर उपस्थित करणे हा या उपक्रमामागचा खरा हेतू असला तरी पाकिस्तान या प्रस्तावात काश्मीरचे नाव घेणे टाळू शकतो. असे केल्याने हा प्रस्ताव व्हेटो होण्याची शक्यता आहे, कारण यूएनएससीच्या ठरावांना ९ सदस्यांचा पाठिंबा तसेच सर्व ५ स्थायी सदस्यांची संमती आवश्यक आहे.

## आर्थर रोड जेलमध्ये राडा!

**मुंबई :** मुंबईतील उच्च सुरक्षा असलेल्या आर्थर रोड मध्यवर्ती कारागृहात कुख्यात गुंड प्रसाद पुजारी याच्यावर हल्ला झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या संपूर्ण प्रकरणात कारवाई करत मुंबई पोलिसांनी प्रसाद पुजारीसह एकूण 7 कैद्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, तुरुंगातील दोन वेगवेगळ्या गटांमधील परस्पर भांडण इतके वाढले की प्रकरण मारहाणीपर्यंत पोहोचले. तुरुंग प्रशासनाने या घटनेला गांभीर्याने घेतले आणि तात्काळ एनएम जोशी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली, जिथे पोलिसांनी भारतीय दंड संहितेच्या कलम १९४ (२) अंतर्गत दंगल आणि मारहाणीचा गुन्हा दाखल केला आहे.

## रशियाने दिली अमेरिका, जपान, दक्षिण कोरियाला धमकी

**नवी दिल्ली :** रशियाचे परराष्ट्रमंत्री सर्गेई लावरोव यांनी अमेरिका, दक्षिण कोरिया आणि जपान या देशांना कडक इशारा दिला आहे की त्यांनी उत्तर कोरियाच्या विरोधात कोणतेही सुरक्षा गठबंधन किंवा लष्करी आघाडी निर्माण करू नये. सध्या लावरोव उत्तर कोरियाच्या वॉनसान शहराच्या दौऱ्यावर असून त्यांनी उत्तर कोरियाचे सर्वोच्च नेते किम जोंग उन यांची भेट घेतली. लावरोव यांनी उत्तर कोरियाच्या परराष्ट्रमंत्री चोई सोन हुई यांच्याशी देखील सविस्तर चर्चा केली. त्यानंतर पत्रकारांशी बोलताना लावरोव म्हणाले की, अमेरिका, दक्षिण कोरिया आणि जपान उत्तर कोरियाच्या भोवती लष्करी तैनाती वाढवत आहेत. हे धोरण धोकादायक असून कोणत्याही देशाच्या विरोधात गठबंधन करण्यासाठी या संबंधांचा वापर होऊ नये, असा इशाराही त्यांनी दिला.

## अन् शिकारीसाठी बिबट्या दोन पायांवर उभा राहिला



**नवी दिल्ली :** चपळ आणि हिंस्र प्राणी अशी ओळख असलेला बिबट्या हा चतुरही असतो हे दाखवणारा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. शिकार करण्यापूर्वी काही सेकंद बिबट्या हा अगदी माणसाप्रमाणेच दोन पायांवर उभा राहून अंदाज घेत होता, असे या व्हिडिओत दिसत आहे. दक्षिण आफ्रिकेतील क्रूगर या राष्ट्रीय अभयारण्यात शिकारीसाठी फिरणारा बिबट्या कॅमेऱ्यात कैद झाला आहे. दोन दिवसांपूर्वी हा व्हिडिओ अपलोड करण्यात आला आहे. या व्हिडिओला २० लाखांपेक्षा अधिका व्ह्यूज आणि दीड हजार पेक्षा जास्त कमेंट्स आहेत. बिबट्या शिकारीसाठी सावज शोधत आहे. रस्ता ओलांडल्यानंतर समोरच्या झाडाझुडपामध्ये सावज आहे का हे पाहण्यासाठी बिबट्या दोन पायांवर उभा राहतो. यामुळे त्याला झाडाझुडपातील हालचाली अधिक स्पष्टपणे दिसतात.

# बिहारच्या मतदार यादीत घुसखोरांचाही समावेश

## निवडणूक आयोगाच्या पुनरावलोकन मोहिमेत माहिती उघड

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** बिहारमधील मतदार यादीच्या पुनरावलोकन मोहिमेदरम्यान निवडणूक आयोगाने धक्कादायक माहिती उघड केली आहे. निवडणूक आयोगातील वरिष्ठ सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या मोहिमेअंतर्गत घरोघरी जाऊन केलेल्या सर्वेक्षणात बूथ लेव्हल अधिकाऱ्यांना (बीएलओ) नेपाळ, बांगलादेश आणि म्यानमारमधून अवैधपणे आलेल्या व्यक्ती मोठ्या संख्येने आढळून आल्या आहेत.

नेपाळ, म्यानमार आणि बांगलादेशच्या नागरिकांसह बिहारच्या मतदार यादीत मोठ्या प्रमाणात घुसखोरांची नावे असल्याचे निवडणूक आयोगाने म्हटले आहे. घरोघरी जाऊन पडताळणी केली असता या घुसखोरांकडे मतदार कार्ड, आधार कार्ड आणि शिधापत्रिका असल्याचेही समोर आले आहे. त्यांची नावे अंतिम मतदार यादीत नसतील, असे निवडणूक आयोगाकडून सांगण्यात आले आहे.



अवैध मतदारांना मतदार यादीतून वगळणे हा या मोहिमेचा उद्देश आहे. मतदार पडताळणीच्या नावाखाली सुरू असलेल्या राजकारणादरम्यान काँग्रेससह महाआघाडीतील सर्वच पक्षांनी या मोहिमेला विरोध केल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

निवडणूक आयोगाच्या सूत्रांनुसार, १ ऑगस्ट २०२५ नंतर योग्य तपासणीअंती अशा व्यक्तींची नावे ३० सप्टेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध होणाऱ्या अंतिम मतदार यादीतून वगळण्यात येतील. ३० सप्टेंबरनंतर आयोग या घुसखोरांची नेमकी आकडेवारीही जाहीर करेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. बिहारमध्ये मतदार यादीच्या पुनरावलोकन अंतर्गत मतदारांकडून गणना अर्ज जमा करण्याचे काम आता अंतिम टप्प्यात आले आहे.




भारतीय निवडणूक आयोगाने दिलेल्या माहितीनुसार, शनिवार सायंकाळपर्यंत बिहारमधील ८०.११ टक्के मतदारांनी आपले गणना अर्ज जमा केले आहेत. २५ जुलै २०२५ या निर्धारित वेळेपूर्वी गणना अर्ज संकलित करण्याचे काम पूर्ण करण्यासाठी आयोग वेगाने कार्यरत आहे. या कामासाठी ७७,८९५ बीएलओ आणि नव्याने नियुक्त केलेल्या २०,६०३ बीएलओंच्या मदतीने २५ जुलै २०२५ या अंतिम मुदतीपूर्वी अर्ज संकलनाचे काम पूर्ण करण्याच्या दिशेने आयोग वाटचाल करत आहे. या प्रक्रियेवर मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांमार्फत (सीईओ) राज्यातील सर्व २४३ विधानसभा मतदारसंघांतील ३८ जिल्हा निवडणूक अधिकारी (डीईओ), मतदार नोंदणी अधिकारी (ईआरओ) आणि ९६३ सहायक मतदार नोंदणी अधिकारी (एईआरओ) यांच्यासह क्षेत्रीय पथकांच्या कामकाजावर बारकाईने लक्ष ठेवले जात आहे.

काँग्रेस नेते चरणसिंग सप्रा याबाबत बोलताना सांगितले की, मागील ४-५ निवडणुकांमध्ये निवडणूक आयोगाने ज्या पद्धतीने काम केले आहे, त्यावरून सरकार आणि निवडणूक आयोग एकमेकांशी हातमिळवणी करत आहेत अशी शंका निर्माण झाली आहे. आम्ही गेल्या काही निवडणुका पाहिल्या आणि आता बिहारमध्येही अशीच कारवाई पाहिली. आम्ही प्रश्न विचारले, त्यांनी उत्तर दिले नाही. आम्ही मागील निवडणुकांच्या मतदार याद्या मागितल्या, ते देत नाहीत. निवडणूक आयोग आहे की हुकूमशहा? आम्ही आता जनतेच्या न्यायालयात जात आहोत, असे ते म्हणाले.

# खासदार होणे सोपे नाही

## कंगना रानावतने सांगितला अनुभव

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** अभिनेत्री कंगना रानावतने हिमाचल प्रदेशातील मंडी मतदारसंघातून नवनिर्वाचित खासदार म्हणून भारतीय राजकारणात पाऊल ठेवले. खासदार म्हणून एक वर्ष झाल्यानंतर कंगनाने तिच्या प्रवासाबद्दल धक्कादायक अनुभव सांगितला आहे. एका मुलाखतीत तिने कबूल केले की तिच्या भूमिकेची वास्तविकता गंभीर आहे आणि अपेक्षेपेक्षा जास्त आव्हानात्मक आहे.

अभिनेत्री कंगना रानावतला खासदार होऊन एक वर्ष पूर्ण झाले आहे. अभिनेत्री ते राजकारणी बनलेल्या कंगनाने माध्यमांना दिलेल्या मुलाखतीत “खासदार होणं सोपं वाटलं होतं” अशी स्पष्ट कबुली दिली. हे वर्ष कठोर वास्तवाची जाणीव करून देणारे ठरल्याचे कंगनाने म्हटले. "खासदार म्हणून कामाबद्दल पहिली धारणा होती की हे काम खूप सोपे असेल. पण हे काम इतके जबाबदारीचे असेल असं मला वाटलं नव्हतं," असे तिने म्हटले आहे.

कंगनाने सांगितलं की, "जेव्हा मला ही संधी देण्यात आली, तेव्हा मला सांगण्यात आले की कदाचित तुम्हाला वर्षातून ६०-७० दिवस संसदेत उपस्थित राहावे लागेल आणि बाकीच्या वेळेत तुम्ही तुमचे काम करू शकता, मला ते अगदी सोपं वाटलं होतं. परंतु वास्तव अगदी उलट आहे," असे ती म्हणाली.





पदभार स्वीकारल्यापासून कंगनाचा फक्त एकच चित्रपट, इमर्जन्सी प्रदर्शित झाला आहे. त्याचेही चित्रीकरण जुलै २०२४ पूर्वीच पूर्ण झाले होते आणि तो प्रदर्शनासाठी तयार होता. तिने इतर कोणत्याही नवीन प्रकल्पावर काम सुरू केलेले नाही, परंतु लवकरच ती पहिल्या हॉलिवूड चित्रपटात दिसण्याची शक्यता आहे. हिमाचल प्रदेशातील 'मंडी' या मतदारसंघातून निवडून आलेल्या कंगनाने मतदारसंघातील अडचणींबद्दलही सांगितले. ती म्हणाली की, अनेकदा लोक त्यांच्याकडे अशा समस्या घेऊन येतात ज्यावर त्यांचे नियंत्रण नसते, पण तरीही त्या त्यांचे प्रश्न सोडवतील असे सांगण्यापासून स्वतःला रोखू शकत नाही.


कंगनाने असेही म्हटले, "आम्ही राज्य आणि केंद्र सरकारमधील दुवा आहोत, केंद्राकडून राज्यासाठी प्रकल्प मिळवून देण्यासाठी आणि आमच्या मतदारसंघातील समस्या व तक्रारी केंद्रासमोर मांडण्यासाठी आमची भूमिका महत्त्वाची आहे. माझ्याकडे कोणतेही कॅबिनेट किंवा प्रशासकीय यंत्रणा नाही. मी फक्त उपायुक्तांसोबत परिस्थितीचा आढावा घेऊन अभिप्राय देऊ शकते."

# फोटो काढण्यासाठी पोज देताना पतीला नदीत ढकलले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बंगळुरू :** कर्नाटकात एक धक्कादायक घटना घडली आहे. कृष्णा नदीच्या किनारी फोटो काढण्यासाठी पोज देत असताना पत्नीने पतीला नदीत ढकलल्याचा आरोप एका व्यक्तीने केला आहे. कर्नाटकातील रायचूर जिल्ह्यातील गुर्जापूर पूल आणि बॅरेजजवळ ही घटना घडली. तो कृष्णा नदीच्या मधोमध अडकून मोठ्याने ओरडत होता, मला वाचवा भाऊ! तिला पकडा! प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, फोटो काढताना त्याच्या पत्नीने त्याला नदीत ढकलले होते.

ही घटना गुर्जापूर बंधाऱ्याजवळ घडली जिथे हे जोडपे फोटो काढण्यासाठी थांबले होते. नदीकाठच्या खडकांवर उभे राहून ते फोटो काढत असताना तो व्यक्ती नदीत पडला. तिचा आरडाओरडा ऐकून स्थानिकांनी मदतीला धाव घेतली. या घटनेचा व्हिडिओ सोशल मिडियावर व्हायरल झाला असून, या व्हिडिओमध्ये ती महिला म्हणते, मी त्याला धक्का दिला नाही. आम्ही फोटो काढत होतो आणि तो स्वत:च घसरला. तो नदीच्या मधोमध असलेल्या एका खडकावर उभा राहून बचावासाठी आरडाओरडा करत होता. काही स्थानिक, बोलेरो चालक आणि बॅरेज कर्मचाऱ्यांनी दोरीच्या



साहाय्याने त्या व्यक्तीला बाहेर काढण्यात यश मिळवले.

यानंतर हे जोडपे दुचाकीवरून एकत्र तेथून निघताना दिसले. त्यामुळे लोकांमध्ये आणखी नवे प्रश्न निर्माण झाले आहेत. हा पुरुष रायचूरमधील शक्तीनगर येथील रहिवासी आहे, तर महिला वडगेरे तालुक्यातील यादगीर तालुक्यातील रहिवासी आहे. अद्याप कोणतीही अधिकृत तक्रार दाखल करण्यात आलेली नाही. पीडित`ने किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीने तक्रार केल्यास तपास सुरू करण्यात येईल, असे पोलिसांचे म्हणणे आहे. या घटनेमुळे सोशल मीडियावर चर्चेला उधाण आले आहे. काही लोक याला अपघात मानत आहेत, तर काही जण हे नियोजित षडयंत्र असल्याचे सांगत आहेत. ही महिला निर्दोष होती तर पती 'तिला पकडा!' असे का म्हणत होता, असा प्रश्न अनेकांनी उपस्थित केला आहे.

# बिहारमध्ये पुन्हा पोलिसांवर हल्ला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** बिहारमध्ये पुन्हा एकदा पोलिसांवर हल्ला झाला आहे. आता नवादामध्ये हा हल्ला झाला आहे. शनिवारी रात्री दहाच्या सुमारास पाकरीबरवान तालुक्यातील छोटी तलाव मोहल्ला येथे डायल ११२ पथकावर असामाजिक तत्वांनी हल्ला केला. भांडणाची माहिती मिळताच पोलिसांचे पथक घटनास्थळी पोहोचले, मात्र तेथे उपस्थित दरोडेखोरांनी पोलिसांच्या वाहनावर विटा, दगड आणि काठ्यांनी हल्ला करून काचा फोडल्या. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन तातडीने पाकरीबारवण पोलिस स्टेशनला माहिती देण्यात आली.

त्यानंतर पाकरीबरवान, धमौल आणि वज्र वाहनांचा अतिरिक्त पोलिस फौजफाटा घटनास्थळी दाखल झाला. पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न करताच गावकऱ्यांनी मिरची पूड आणि रसायनांनी त्यांच्यावर हल्ला केला. या हल्ल्यात अनेक पोलीस जखमी झाले आहेत. पोलिसांनी तत्काळ कारवाई करत परिसरात छापा टाकून डझनाहून अधिक संशयितांना ताब्यात घेतले.




ब्राझील

**साओ पाउलो:** साओ पाउलो येथे, ब्राझिलियन उत्पादनांवर ५०% कर लादण्याच्या अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या निर्णयाचा जोरदार विरोध नोंदवला गेला.

# भाजपाच्या नव्या अध्यक्षाबद्दल संघाच्या सूचना

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला वैयक्तिक वर्चस्व नको तर संघटनेवर आधारित नेतृत्व हवे आहे. भाजपचे नवे राष्ट्रीय अध्यक्ष कार्यकर्त्यांशी संवाद साधणारा, अभिप्राय स्वीकारणारा आणि अंतर्गत लोकशाही पुनर्संचयित करणारा नेता असावा.

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भारतीय जनता पक्षाने आपल्या नव्या राष्ट्रीय अध्यक्षाच्या नियुक्तीची तयारी सुरू केली आहे. अनेक राज्यांच्या प्रदेशाध्यक्षांची घोषणा करण्यात आली आहे. उत्तर प्रदेशसह काही राज्यांमध्ये अद्याप याची घोषणा झालेली नाही. या सर्व पार्श्वभूमीवर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने पक्षाचा पुढचा राष्ट्रीय अध्यक्ष कोण असेल, हे स्पष्ट केले आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत पूर्ण बहुमत गमावल्यानंतर भाजपने एका नव्या युगात प्रवेश केला आहे. ती सत्तेत आहे, पण ती पूर्वीसारखी अजेय राहिलेली नाही. आता हा पक्ष युतीचे सरकार चालवत असल्याने संघाचा



हस्तक्षेप अधिक स्पष्ट आणि मुखर झाला आहे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी नुकत्याच केलेल्या वक्तव्याकडे भाजपसाठी संदेश म्हणून पाहिले जात असल्याचे माध्यमांनी म्हटले आहे. संघप्रमुखांनी सत्तेतील वाढता अहंकार आणि संवादाचा अभाव यावर टीका केली, तेव्हा ते थेट भाजप नेतृत्वाच्या व्यक्तिमत्त्वकेंद्री मॉडेलवरील व्यंग्य मानले जाते. आरएसएसला तुलनेने तरुण असा अध्यक्ष हवा आहे. जो संस्थेशी संबंधित आहे. तो केवळ रणनीतीकार च नव्हे, तर वैचारिक मार्गदर्शकही असावा. वैयक्तिक वर्चस्व नको तर संघटनेवर आधारित नेतृत्व हवे आहे. भाजपचे नवे राष्ट्रीय अध्यक्ष कार्यकर्त्यांशी संवाद साधणारा, अभिप्राय स्वीकारणारा आणि अंतर्गत लोकशाही पुनर्संचयित करणारा नेता असावा. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने पक्षातील टेक्नोक्रॅट आणि राजकीय स्थलांतरितांच्या भूमिकेवर चिंता व्यक्त केली आहे. संघाचे म्हणणे आहे की, भाजपाचा पुढचा राष्ट्रीय अध्यक्ष तंत्रज्ञानाने नव्हे तर तपश्चर्येने बनलेला नेता असावा.

भाजपचा नवा अध्यक्ष शाखा, प्रांत प्रचारक आणि बुथ स्तरावर काम करणाऱ्यांशी जोडला गेला पाहिजे. त्याची वैचारिक स्पष्टताही विचारात घ्यायला हवी. समान नागरी कायदा (यूसीसी), लोकसंख्या धोरण, सांस्कृतिक राष्ट्रवाद आणि शिक्षण सुधारणा या मुद्द्यांवर हे स्पष्ट झाले पाहिजे, अशी संघाची अपेक्षा आहे.

दरम्यान, भारतीय जनता पक्षाच्या (भाजप) पुढील अध्यक्षाची निवड लवकरच होणार आहे. अनेक नावांची चर्चा सुरू आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी देखील पाच देशांच्या दौऱ्यावरून परतले आहेत. भाजपच्या नव्या अध्यक्षावर लवकरच शिक्कामोर्तब होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. भाजपचे विद्यमान अध्यक्ष जेपी नड्डा यांचा कार्यकाळ सुमारे दोन वर्षांपूर्वी संपल्यानंतर त्यांना वारंवार मुदतवाढ मिळत होती.

## ठाकूरची वर्ल्ड वेटलिफ्टिंग चॅम्पियनशिपसाठी निवड



**खेड :** हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाचा विद्यार्थी वैष्णव ठाकूर याची नॉर्वे येथे होणाऱ्या वर्ल्ड वेटलिफ्टिंग चॅम्पियनशिपसाठी निवड झाली असून तो भारताचे प्रतिनिधित्व करणार आहे. नुकतीच पतियाळा, पंजाब येथे झालेल्या निवड चाचणीमध्ये वैष्णवने ११० किलो वजनी गटात १६० किलो स्नॅच आणि १९२ किलो क्लीन अँड जर्क केला आहे. स्नॅच व क्लीन अँड जर्क दोन्हीचे मिळून असणारे ३३३ किलोचे पात्रता मानक पूर्ण केल्यामुळे वैष्णवची ऑक्टोबर २०२५ मध्ये नॉर्वे येथे होणाऱ्या वर्ल्ड वेटलिफ्टिंग चॅम्पियनशिपकरिता निवड झाली आहे. वैष्णवच्या या दैदीप्यमान यशाबद्दल खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अ‍ॅड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक हिरामण सातकर, प्राचार्य डॉ.शिरीष पिंगळे यांच्या हस्ते वैष्णवचा सत्कार करून त्याला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी क्रीडा विभागातील सर्व प्राध्यापक व वेटलिफ्टिंग खेळाडू उपस्थित होते.

## मोरडेवाडीतील ९ विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती परिक्षेत यश

**मंचर :** मोरडेवाडी येथील प्राथमिक शाळेतील ९ विद्यार्थी पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता ५ वी शहरी विभागातून जिल्हा गुणवत्ता यादीत आले आहेत अशी माहिती शाळेचे मुख्याध्यापक शैलेंद्र चिखले यांनी दिली. पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत शहरी विभागातून मनस्वी कांताराम मोरडे, विघ्नेश विजय शेवाळे, ईश्वरी दिनकर वाकचौरे, अनुष्का शंकर मोरडे, श्रावणी तुळशीराम मुकणे, स्वराज कृष्णा मोरडे, केदारी मनश्वी निघोट, काव्यांजली सचिन मोरडे, श्रावण संदीप बाणखेले हे विद्यार्थी जिल्हा गुणवत्ता यादीत आले आहेत. त्यांचा सत्कार ग्रामस्थांच्या वतीने कमलजादेवी सेवा मंडळाचे अध्यक्ष दत्तात्रय मोरडे, बबन मोरडे, माजी ग्रामपंचायत सदस्य बाजीराव मोरडे, बाबुराव मोरडे, सुरेश निघोट यांच्या हस्ते करण्यात आला. विद्यार्थ्यांना कविता वळसे, रुपाली होनराव या शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. गटविकास अधिकारी प्रमिला वाळुंज, गटशिक्षणाधिकारी रुपाली धोका, शिक्षणविस्तार अधिकारी शैला निमसे , केंद्रप्रमुख बाळासाहेब आडके, राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त मुख्याध्यापक शैलेंद्र चिखले, कांताराम मोरडे, राजू मोरडे, विजय घिसे, महेश बढे, कान्होबा डोंगरे,मिलिंद जगताप, पंकजा हगवणे, पुष्पा कार्ले, मंगलादेवी पवार, प्रमिला जोरी,लता पाटील, संगीता वळसे, रेश्मा ढोबळे, महानंदा मगरे, ममता त्रिवेदी, शंकर अण्णा मोरडे, विशाल मोरडे, धनेश मोरडे,तुषार मोरडे, ज्योती निघोट, प्रशांत मोरडे सर्व ग्रामस्थ यांनी यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षिकांचे अभिनंदन केले आहे.

## एमईएस इंग्लिश मिडीयम स्कूलमधे गुरुपौर्णिमा



**सासवड :** सासवड येथील एमईएस संस्थेच्या इंग्लिश मिडीयम स्कूल मधे विद्यार्थ्यांना गुरुपौर्णिमेचे महत्व अवगत करून देण्याच्या उद्देशाने विविध उपक्रम राबविण्यात आले. सरस्वती व व्यासमुनी यांचे पुजन, मुख्य अतिथी भाऊसाहेब येळे व डॉ दिनेश जगताप यांचा गुरुशिष्या बाबत विद्यार्थ्यांशी संवाद, आजी व आजोबांचे पुजन, मुख्याध्यापक कल्पना नागनुर यांचे गुरु महिमा विषयावर मौलिक मार्गदर्शन, मुलींचे नृत्य अशा अनेक उपक्रमांचा समावेश करत गुरुपौर्णिमा साजरी करण्यात आली. विद्यार्थ्यांनी देखील याचा आनंद घेतला. गीता पुरंदरे, नीता जगताप, स्वाती पांढरे, निकिता होले यांसह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी या सुंदर कार्यक्रमाचे आयोजन केले.

# संबळ शंख नादाने गर्जला खंडोबा गड



**जेजुरी** संबळ या लोकप्रिय आणि पारंपरिक वाद्याची सलामी देण्याकरिता जेजुरीच्या खंडोबा गडावर शनिवारी पारंपारिक वाद्याचा सन्मान करण्यात आला. (छायाचित्र - विजयकुमार हरिश्चंद्रे.)

## ढोल ताशा पथकातही होणार गजर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुरंदर :** पुरंदर तालुक्यातील खंडोबा गडावर शनिवारी पारंपरिक, भक्तिपूर्वक वातावरणात संबळ या लोकप्रिय वाद्याचा सन्मान केला. या पारंपरिक वाद्याचा समावेश प्रथमच ढोल-ताशा पथकात करण्यात आला.

गडकोट परिसरात रुद्रतेज प्रतिष्ठानच्या ५१ कार्यकर्त्यांनी खंडेरायाच्या चरणी सेवा अर्पण केली. ढोल, ताशा, झांज यांच्यासोबत संबळाच्या नादाने परिसरात गणेशोत्सवाची चाहूल लागली. डॉ. खेडेकर यांनी संबळ हे वाद्य पवित्र, पारंपरिक आणि धार्मिक दृष्टिकोनातून महत्त्वाचे असल्याचे सांगत, ढोल-ताशा पथकांमध्ये त्याचा समावेश होणे म्हणजे संस्कृतीवर्धनासोबतच धर्माचेही कार्य आहे असे मत व्यक्त केले.

या वेळी देवस्थानचे अधिकारी उपस्थित मान्यवरांमध्ये संस्थापक अध्यक्ष अमित विलास गायकवाड, अध्यक्ष पंकज रंभोर, उपाध्यक्ष सुनील माळी, ज्ञानेश्वर माऊली कुदळे, यश राऊत, पार्थ वाघमारे, कपिल गायकवाड, मंगेश मेमाणे, आशिष मगर, पोपट फडतरे, ओंकार मांगडे, कल्पेश बारवकर, मयूर चांदगुडे यांचा समावेश होता.

# शिरूर येथे अवैधरित्या वास्तव्य करणाऱ्या चार बांगलादेशी ताब्यात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**रांजणगाव गणपती :** कारेगाव, तालुका शिरूर येथे अवैधरित्या वास्तव्य करणाऱ्या चार बांगलादेशींना रांजणगाव एमआयडीसी पोलिसांनी व दहशत विरोधी पथकाच्या पुणे ग्रामीण शाखेच्या पोलिसांनी कारवाई करून ताब्यात घेतले असल्याची माहिती रांजणगाव एमआयडीसी पोलिसांनी केली. याबाबत पुणे ग्रामीण दहशतवाद विरोधी शाखेचे पोलीस कर्मचारी मोसिन बशीर शेख यांनी फिर्याद दिली आहे.

रांजणगाव एमआयडीसी पोलिसांनी कमरोल रमजान शेख (वय ३२, दामोदर ठाणा, फुलताला जिल्हा खोलना, बांगलादेश), अकलस मजेद शेख (वय ३९, गाव उसला ठाणा पोटालीपाडा, जिल्हा गोपालगंज, बांगलादेश), मोहम्मद अब्दुल्ला मलिक (वय ३५, गाव मादपपाशा तालुका कालिया जिल्हा नोडाइल, बांगलादेश), जाहिद अबूबकर शेख (वय ३०, गाव पिडोली तालुका कालिया जिल्हा नोडाइल, बांगलादेश) सर्व सध्या राहणार कारेगाव तालुका यांना १२ जुलै रोजी पहाटे पाच वाजण्याच्या सुमारास अटक केली.



हे सर्व बांगलादेशी कोणत्याही वैध प्रवासी कागदपत्राशिवाय किंवा भारत सरकारने अथवा भारतीय सीमेवरील नोंदणी अधिकारी यांनी नेमून दिलेल्या मार्गव्यतिरिक्त घुसखोरीच्या मार्गाने भारतीय सरहद्दीत प्रवेश करून बनावट भारतीय देशाचे आधार कार्ड धारण करून अनाधिकृतपणे ग कारेगाव तालुका शिरूर जिल्हा पुणे महाराष्ट्र येथे मागील दोन वर्षापासून वास्तव्य करत असल्याचे आढळून आले आहे.

सदर गुन्ह्यामध्ये गोपनीय माहितीच्या आधारे दहशतवाद विरोधी शाखा, पुणे ग्रामीण यांच्याकडील पोलीस अंमलदार मोसीन शेख यांना गोपनीय बातमीदारात मार्फत बातमी मिळाली की कारेगाव, तालुका शिरूर येथे काही बांगलादेशी नागरिक बेकायदा वास्तव्य करत आहेत बांगलादेशी बेकायदा वास्तव्य करत आहेत. सदर बातमीच्या अनुषंगाने दहशतवाद विरोधी शाखा, पुणे ग्रामीण व रांजणगाव पोलिसांनी केलेल्या संयुक्तपणे छापा टाकून केलेल्या कारवाईमध्ये वरील चार बांगलादेशी नागरिक बेकायदा वास्तव्य करताना मिळून आले त्यांच्याविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे. अटक आरोपींना न्यायालयात हजर केले असता, त्यांना १५ तारखेपर्यंत पोलीस कस्टडी देण्यात आली आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल, अपर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत ढोले यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक महादेव वाघमोडे व दहशतवाद विरोधी शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रकाश पवार, पोलीस अधिकारी अविनाश थोरात, विशाल गव्हाणे, दत्तात्रय शिंदे,विशाल भोरडे, रवींद्र जाधव, मोसीन शेख, ओमकार शिंदे, योगेश गुंड, संतोष साळुंखे, आकाश सवाने यांचे पथकाने केली आहे. पुढील तपास पोलीस अधिकारी नीलकंठ तिडके हे करीत आहे.

# संजय जगताप यांचा काँग्रेसला 'हात'

### भाजपात प्रवेश करणार असल्याच्या चर्चांना उधाण!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** पुणे जिल्ह्यात काँग्रेसला मोठा धक्का बसला आहे. पुणे जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष आणि पुरंदर-हवेली विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार संजय चंदुकाका जगताप यांनी शनिवारी (दि. १२ जुलै) अचानकपणे काँग्रेस पक्षाच्या जिल्हाअध्यक्ष आणि प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिला. त्यामुळे पुणे जिल्ह्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे.

काँग्रेसचे माजी आमदार यांनी आपला राजीनामा ई-मेलद्वारे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांना पाठवला आहे. त्यांनी जिल्हा कार्याध्यक्ष संग्राम मोहोळ यांच्याकडं राजीनामा सुपूर्द केला आहे. तसेच या राजीनाम्याची प्रत उपाध्यक्ष अ‍ॅड. गणेश पाटील यांनाही माहितीस्तव पाठवण्यात आली आहे. राजीनाम्यात त्यांनी 'वैयक्तिक कारणांमुळे' हा निर्णय घेतल्याचं नमूद केलं आहे. यामागं राजकीय घडामोडींचा मोठा संदर्भ असल्याचं अनेक राजकीय निरीक्षकांचं मत आहे.

पुरंदर तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून संजय जगताप हे भाजपामध्ये प्रवेश करणार असल्याच्या चर्चा सुरू होत्या. सुरुवातीला त्यांनी यावर कोणतीही प्रतिक्रिया दिली नव्हती. मात्र, आता त्यांनी काँग्रेसमधून दिलेल्या



राजीनाम्यानंतर या चर्चांना बळ मिळू शकते. स्थानिक काँग्रेस कार्यकर्ते तसेच राजकीय समीक्षक यांच्या माहितीनुसार भाजपामध्ये जाण्याचा निर्णय निश्चित झाला आहे. त्याबाबत लवकरच मोठी घोषणा होऊ शकते.

२०२४ च्या विधानसभेच्या निवडणुकीत संजय जगताप यांचा पराभव झाल्यानंतर त्यांच्या समर्थकांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) नाराजी होती. प्रचारात अपेक्षित मदत मिळाली नाही, अशी कार्यकर्त्यांची भावना होती. "शरद पवारांनी केवळ एक सभा घेतली. इतर ठिकाणी कोणतीही आघाडी घेतली नाही," असा आरोप जेजुरी नगरपरिषदेचे माजी नगरसेवक हेमंत सोनवणे यांनी थेट केला होता. यामुळे अनेक कार्यकर्त्यांनी संजय जगताप यांच्याकडं सत्ताधारी भाजपामध्ये जाण्याचा आग्रह धरला आहे. आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि नगरपरिषद निवडणुका डोळ्यासमोर ठेवून हा निर्णय घेण्यात आला, असे बोललं जात आहे.

# आंबेगाव पूर्वेला बटाटा लागवडीची तयारी सुरू

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पारगाव :** आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात बटाटा लागवडीची तयारी शेतकऱ्यांनी सुरू केली आहे. १ ऑगस्ट पासून बटाटा लागवडीला शेतकरी प्रारंभ करणार आहेत. बटाटा लागवडीसाठी शेत जमिनीची मशागत करून त्यामध्ये कोंबड, शेणखते पांगविण्यास शेतकऱ्यांनी सुरुवात केली आहे.

तालुक्याच्या पूर्व भागातील नागापूर, रांजणी, थोरांदळे, खडकी आदी गावांमध्ये बटाटा लागवडी मोठ्या प्रमाणावर शेतकरी करतात. यंदा पावसाने समाधानकारक हजेरी लावली. त्यामुळे या परिसरातील विहिरी तुडुंब पाण्याने भरल्या आहेत. ओढे देखील खळाळून वाहिले असल्याने पाण्याविषयीची चिंता पूर्णपणे दूर झाली आहे. या परिसरातील शेतकऱ्यांनी बटाटा लागवडीची तयारी सुरू केली आहे. या भागातील बहुतांशी शेतकरी हे थेट पंजाब राज्यातील जालंदर परिसरातून बटाटा बियाणे खरेदी करत असतात. अनेक शेतकऱ्यांनी बटाटा बियाणे बुकिंग केले आहे. बुकिंग केलेल्या बटाटा बियाण्याचे ट्रक १ ऑगस्ट रोजी या परिसरात दाखल होणार आहेत.

बटाटा लागवडीसाठी अनेक शेतकऱ्यांनी कोंबड, शेणखते विकत घेऊन शेतजमिनींमध्ये पांगविण्यास सुरुवात केली आहे. कोंबड, शेणखतांना बटाटा उत्पादक शेतकऱ्यांकडून आता मागणी वाढली आहे. या परिसरात कोंबड खतांचे टेम्पो, ट्रक विक्रीसाठी दाखल झाले आहेत. एक टेम्पो कोंबड खतासाठी शेतकऱ्यांना १३ हजार रुपये मोजावे लागत आहेत. असे नागापूर येथील बटाटा उत्पादक शेतकरी नवनाथ मिंडे यांनी सांगितले.



नागापूर (ता.आंबेगाव )येथे बटाटा लागवडीची तयारी सुरू झाली आहे. कोंबड खत शेतात पांगविताना शेतमजूर. (छायाचित्र - किशोर खुडे.)

# मुलांनी झाडांचे योग्य प्रकारे संगोपन करावे



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मंचर :** "झाडांपासून उन्हाळ्यात थंडगार सावली, शुद्ध ऑक्सिजन, डिंक, फळे, फुले, औषधी मध मिळते. ध्वनी आणि वायू प्रदूषण थांबविण्यासाठी झाडांची मदत होते. निसर्ग सौदर्यातही झाडांमुळेच वाढ होते. पाऊस येण्यासाठी झाडे पाहिजेत. त्यामुळे पर्यावरण संतुलनासाठी वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धन करणे काळाची गरज आहे. मुलांनी मिळालेल्या झाडांचे योग्य प्रकारे संगोपन करावे," असे आवाहन वनपाल सुधाकर गीते यांनी केले.

कळंब (ता.आंबेगाव) येथील कमलजादेवी विद्यालयातील ४२१ विद्यार्थ्यांना सामाजिक वनीकरण कार्यक्रमांतर्गत घोडेगाव कार्यालयाच्या वतीने आवळा, बांबू, चिंच, कवठ, साग आदी सात ते आठ प्रकारच्या रोपांचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी पर्यावरण आणि वृक्षसंवर्धन गीते या विषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला सरपंच उषा सचिन कानडे, उपसरपंच गोकुळ भालेराव, विद्यालयाचे प्राचार्य बाळासाहेब आरेकर, ग्रामपंचायत सदस्य दत्ता कानडे, कमलेश वर्पे, ग्रामविकास अधिकारी शरद बाळसराफ, वनपाल रविंद्र गवांदे, वनरक्षक सोमनाथ केंद्रे, शिक्षक संजय शेलार, उमेश वाडेकर, संभाजी मोहिते आदी उपस्थित होते. मुलांनी योग्य ठिकाणी झाडांची लागवड करून संगोपन करावे, असे आवाहन प्राचार्य आरेकर यांनी केले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी झाडांचे संगोपन करणार असल्याची ग्वाही दिली.

दरम्यान लौकी येथील पुणे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत कार्यक्रम झाला. यावेळी मुलांनी वृक्षदिंडीचे आयोजन केले होते. संपूर्ण गावातून वृक्षदिंडी नेण्यात आली. ठिकठिकाणी स्वागत करण्यात आले. शाळेच्या परिसरात वनपाल सुधाकर गीते, वनरक्षक सोमनाथ केंद्रे, वनसेवक जालिंदर थोरात, निलेश थोरात, मंगेश काळे व शिक्षकांच्या उपस्थितीत वड, कडुलिंब, पिंपळ आदी दहा ते बारा झाडांचे वृक्षारोपन करण्यात आले. वृक्षसंवर्धनाची जबाबदारी शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी घेतली असल्याचे वन अधिकाऱ्यांनी सांगितले.

## चोरलेली ६ लाखांची मोटार हस्तगत



**चाकण :** चाकण पोलीस स्टेशन हद्दीतील वाहन चोरीचा गुन्हा उघड करण्यात युनिट ३ च्या पथकाला यश आले आहे. सहा लाख रुपये किमतीची स्विफ्ट कार पोलिसांनी हस्तगत केली आहे. दिनांक ११ जुलै रोजी गुन्हे शाखा युनिट ३ च्या पथकाने वाहन चोरास अटक केली आहे. सदर पथकास मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने या गुन्ह्यातील चोरीस गेलेली स्विफ्ट कार ही आरोपी ऋषिकेश गणपत जाधव (३२, रा. समृद्धी कॉलनी, गोडबोले वस्ती, केशव नगर, मुंडवा, हडपसर) याच्याकडून हस्तगत करून सदर गुन्हा उघडकीस आणला आहे. ही कामगिरी वरिष्ठ पोलिस निरीक्षक जितेंद्र कदम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सुनिल जावळे, पोलीस हवालदार आढारी, मोरे, लोणकर, कोळेकर यांनी केली आहे.

## तरुणीवर मित्राकडून अनेकदा अत्याचार



**चाकण :** २३ वर्षीय तरुणीला २६ वर्षीय तरुणाने लग्नाचे आमिष दाखवून चाकणमधील श्रीमार्टच्या मागील एका बिल्डिंगमध्ये वेळोवेळी अत्याचार केल्याची धक्कादायक बाब पिडीत तरुणीने तक्रार दिल्या नंतर समोर आली आहे. याप्रकरणी मूळची कोपरगाव अहिल्यानगर येथील असलेल्या २३ वर्षे तरुणीने चाकण पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यावरून सोमनाथ श्याम हिवराळे (वय २६, रा. श्रीमार्टच्या मागे चाकण, ता. खेड) याच्यावर बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संबंधित तरुणाने पिडितेला विश्वासात घेऊन सदरचा प्रकार केला असून, हा तरुण व पिडिता दोघेही मूळचे अहिल्यानगर जिल्ह्यातील आहेत.

## लोखंडी गजाने खुनाचा प्रयत्न; गुन्हा दाखल

**चाकण :** अचानक जोरात यु टर्न मारल्याचा जाब विचारल्याने लोखंडी गजाने डोक्यात मारून रिक्षा चालकाला जिवे मारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी एका तरुणाला अटक करण्यात आली आहे. ही घटना शुक्रवारी खेड तालुक्यातील महाळुंगे गावच्या हद्दीत घडली. याप्रकरणी गणपत दामोदर कदम (वय ५७, म्हाळुंगे) यांनी म्हळुंगे एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार शशांक नरेंद्रकुमार शुक्ला (वय २२, म्हाळुंगे) याला अटक करण्यात आली आहे. आरोपीने हुंडाई चौक येथे अचानक जोरात यु टर्न मारला. त्याचा कदम यांनी आरोपीला जाब विचारला. त्यामुळे कदम यांनी शुक्लाच्या कानाखाली मारली. त्यानंतर शुक्लाने मोटारीतील लोखंडी गज काढून कदम यांना जिवे मारण्याच्या उद्देशाने डोक्यात मारून गंभीर जखमी केले.

## भरधाव बसच्या धडकेत दाम्पत्य गंभीर जखमी

**चाकण :** पुणे नाशिक महामार्गावर भरधाव बसच्या धडकेत दुचाकी स्वार दांपत्य गंभीर जखमी झाल्याची घटना शुक्रवारी घडली आहे. या घटनेत पांढऱ्या रंगाची बसवरील अज्ञात चालकावर चाकण पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संबंधित दाम्पत्य त्यांच्या मोटरसायकल वरून जात असताना. पुणे नाशिक रस्त्यावर चाकण चौकाच्या पुढील उड्डाणपुलाच्या अलीकडे सदरचा अपघात घडला. यामध्ये सारिका संदीप कोळगे व त्यांचे पती संदीप कोळगे हे दोघेही जखमी झाले असून, चाकण पोलीस अधिक तपास करत आहेत.

# ग्रामपंचायतींच्या सरपंच पदासाठी आरक्षण सोडत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** पुरंदर तालुक्यातील ९३ ग्रामपंचायतींच्या सरपंच पदासाठीची आरक्षण सोडत सासवड येथील आचार्य अत्रे सभागृहात पार पडली. ग्रामपंचायत निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पारदर्शक पद्धतीने ही आरक्षण प्रक्रिया पार पडली असून, विविध प्रवर्गांसाठी सरपंच पदाचे आरक्षण निश्चित करण्यात आले.

सदर सोडतीत खालीलप्रमाणे आरक्षण जाहीर करण्यात आले: सर्वसाधारण – २९, सर्वसाधारण (स्त्री) – २९, नागरिकांचा मागास प्रवर्ग (ओबीसी) – १२, नागरिकांचा मागास प्रवर्ग (ओबीसी महिला) – १३, अनुसूचित जाती (एससी) – ३, अनुसूचित जाती (एससी महिला) – ४, अनुसूचित जमाती (एसटी) – १, अनुसूचित जमाती (एसटी महिला) – २

या सोडतीच्या कार्यक्रमास तहसीलदार विक्रम राजपूत, निवासी नायब तहसीलदार सचिन पाटील आणि गटविकास अधिकारी प्रणोती श्रीमाळ आदी मान्यवर उपस्थित होते. विशेष म्हणजे, आरक्षण चिठ्ठ्या शालेय विद्यार्थ्यांच्या हस्ते काढण्यात आल्या, ज्यामुळे प्रक्रिया अधिक पारदर्शक होती

आरक्षणीत असलेल्या ग्रामपंचायती : अनुसूचित जाती (स्त्री): केतकावळे, हरगुडे, तोंडल, मावडी सुपे, अनुसूचित जमाती: काळदरी, अनुसूचित जमाती (स्त्री):घेरापुरंदर, चिव्हेवाडी, अनुसूचित जाती :-कुंभारवळण, कोडीत बु., वनपुरी, नागरिकांचा मागास प्रवर्ग (स्त्री) ग्रामपंचायती कोडीत खुर्द, सोनोरी, खेंगरेवाडी, पुर-पोखर, नाझरे सुपे, बेलसर, वाल्हा, आंबोडी, खळद, भिवरी, पांडेश्वर, देवडी, वागदरवाड आदी

नागरिकांचा मागास प्रवर्ग: पोंढे, पिंपरे खुर्द, खानवडी, शिवरी, भिवडी, राख, जेऊर, विर, पिंपळे, गुऱ्हाळी, साकुर्डे, बोपगाव आदी, सर्वसाधारण (स्त्री): दिवे, निरा, रिसे, पिंगोरी, पांगारे, धालेवाडी, सुपे खुर्द, पिसर्वे, पानवडी, नावळी, गराडे, कोळविहिरे, नायगाव, जवळार्जुन, वाळुंज, पिंपरी, झेंडेवाडी, हरणी, चांबळी, माहुर, सुकलवाडी, बोऱ्हाळवाडी, निळुंज, राजेवाडी, लपतळवाडी, तक्रारवाडी, सटलवाडी, पिसे, दवणेवाडी आदी.

सर्वसाधारण: एखतपुर, गुळंचे, कोथळे, वाघापूर, आंबळे, धनकवडी, मावडी क.प, हिवरे, दौंडज, परिंचे, माळशिरस, टेकवडी, राजुरी, सोमर्डी, बहिरवाडी, पिसुर्टी, पारगाव, रानमळा, सिंगापूर, मांडकी, नाझरे क.प., कर्नलवाडी, उदाचीवाडी, मांढर, थापेवारवाडी, आस्करवाड, आडाचीवाडी, भोसलेवाडी, नवलेवाडी आदी.

या आरक्षण सोडतीमुळे स्थानिक स्वराज्य संस्थांमधील विविध घटकांना प्रतिनिधित्वाची संधी मिळणार असून, महिलांनाही आरक्षणाचा लाभ मिळणार आहे.






# खेड न्यायालय प्रथम श्रेणीत यावे - न्या. ए एस सय्यद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**खेड :** सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाने नव्वद दिवसाच्या राष्ट्रीय मध्यस्थी मोहिमेत भाग घेऊन जास्तीत जास्त प्रकरणे केंद्राकडे पाठवावीत व खेड न्यायालय प्रथम क्रमांकात येण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन खेड न्यायालयाचे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश ए. एस.सय्यद यांनी केले.

गुरुपौर्णिमेच्या औचित्य साधून गुरुवारी राजगुरूनगर वकील बार असोसिएशनच्या वतीने न्याय क्षेत्रात दीर्घकाळ सेवा देणाऱ्या जेष्ठ वकिलांचा सन्मान समारंभ आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात वकिलांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. या कार्यक्रमात न्यायाधीश ए एस सय्यद बोलत होते. या कार्यक्रमात बार असोसिएशनच्या वतीने जेष्ठ वकिलांना राजगुरूनगर येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयातील न्यायाधीशांच्या हस्ते शाल, पुष्प व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. राजगुरुनगर जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाचे न्यायाधीश ए.एस.सय्यद, न्यायाधीश एस.पी. पोळ, न्यायाधीश बी एस वावरे, न्यायाधीश ए.बी. होडावडेकर, न्यायाधीश स्वाती नाईकनवरे(गरड), न्यायाधीश श्रीमती जे. सी. गुप्ता, राजगुरूनगर बार असोसिएशनचे अध्यक्ष अॅड वैभव कर्वे, उपाध्यक्ष अॅड शंकर कोबल, उपाध्यक्ष अॅड स्वरूपा कोतवाल, सचिव अॅड. नवनाथ कड, सचिव अॅड.शुभम गाडगे, खजिनदार अॅड साक्षी राक्षे , लोकल ऑडिटर अॅड केदार गुरव, सदस्य अॅड दिपक थिगळे, अॅड.संकेत वाघमारे, अॅड. सूरज राळे, अॅड.सिद्धिका लांडगे यांच्यासह कोर्टातील वकील उपस्थित होते.

यावेळी अॅड .चंद्रकांत पिंगळे, अॅड. सिताराम थिगळे, अॅड. बाळकृष्ण सांडभोर, अॅड.आशा करमरकर, अॅड. ज्ञानेश्वर शिंदे, अॅड. अमृतलाल ओसवाल, अॅड. मुकूंद आवटे, अॅड.सुलभा कोटबागी, अॅड. अशोक शिंदेकर, अॅड. चंद्रकांत सांडभोर, अॅड.जयंतीलाल ओसवाल, अॅड.रामचंद्र घोलप, अॅड.पोपटराव तांबे पाटील, अॅड. सर्जेराव पानसरे, अॅड.रविंद्र कर्नावट, अॅड.माणिक पाटोळे, अॅड.बाळासाहेब गायकवाड, अॅड.गिरिश कटारे, अॅड. सुनिल सांडभोर, अॅड.बाबासाहेब कड, अॅड. समिर कुलकर्णी, अॅड. विलास काळे, अॅड विजयकुमार पानमंद, अॅड.रजनी नाईक, अॅड.अनिल बोंबले, अॅड. रश्मिकांत वाफगावकर यांच्यासह जेष्ठ विधिज्ञ अॅड पोपटराव तांबे यांना दीपस्तंभ सीनियर लॉयर्स अवार्ड २०२५ मिळाल्याबद्दल आणि खेड तालुका नोटरी अध्यक्षपदी अॅड अनिल राक्षे, अॅड मनिषा टाकळकर यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. सत्काराला जेष्ठ विधीतज्ञ अॅड.पोपटराव तांबे, अॅड चंद्रकांत पिंगळे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अॅड वैभव कर्वे यांनी केले. सूत्रसंचालन अॅड. शुभम गाडगे यांनी केले आभार अॅड शंकर कोबल यांनी मानले.



राजगुरूनगर वकील बार असोसिएशनच्या वतीने न्याय क्षेत्रात दीर्घकाळ सेवा देणाऱ्या जेष्ठ वकिलांचा न्यायाधीशांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. (छायाचित्र - निखिल पाचारणे.)

## सुपे खुर्द शाळेतील चार विद्यार्थ्यांचे अभिनंदनीय यश



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांनी घेतलेल्या पूर्व उच्च माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा ईयत्ता पाचवीचा निकाल नुकताच जाहीर झाला असून पुरंदर तालुक्यातील सुपे खुर्द येथील जिल्हा परिषद शाळेतील चार विद्यार्थ्यांनी अभिनंदनीय यश प्राप्त करत शिष्यवृत्ती मिळवली आहे. वेदांत अमित चव्हाण, प्रणव सुरेश जगताप, मानसी दिगंबर जगताप व गायत्री दादासाहेब जगताप अशी गुणवंत विद्यार्थ्यांची नावे आहेत. शाळेच्या मुख्याध्यापिका मंगल कामठे, वर्गशिक्षक विलास सणस यांसह अभिराज चव्हाण, मनिषा साळुंखे, काळुराम जगताप, अंजली तांदळे, निजाम मुलाणी व चंद्रकांत घारमळकर या शिक्षक वृंदाचे या विद्यार्थ्यांस मार्गदर्शन मिळाले.

पुरंदरचे गट शिक्षण अधिकारी वैभव डुबल, केंद्र प्रमुख धनाजी नाझीरकर, शाळा व्यवस्थापन समितीचे दिपक म्हेत्रे, ग्रामस्थ व परिसरातील नागरिकांनी या यशाबद्दल विद्यार्थी व शिक्षक यांचे अभिनंदन केले आहे.

## टेम्पोच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

**चाकण :** भरधाव टेम्पोने धडक दिल्याने दुचाकीवरील तरुणाचा मृत्यू झाला. ही घटना कुरुळी गावातील स्पायसर चौक ते अराई चौकदरम्यान घडली. रचित उमेश शिंदे (वय २३, रा. उत्कर्षनगर, भांडूप वेस्ट, मुंबई) असे या अपघातात मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव आहे. तर जागेश खुमान लाल (वय ३६, सध्या रा. बिरदवडी, चाकण, मूळ रा. ललितपूर, उत्तरप्रदेश) असे गुन्हा दाखल झालेल्या टेम्पो चालकाचे नाव आहे.

रचित शिंदे हे दुचाकीवरून जात असताना कुरुळी (ता. खेड) गावातील स्पायसर चौक दरम्यान आले असता, आरोपी चालवत असलेल्या टेम्पोने रचित यांच्या दुचाकीला धडक दिली. या अपघातात रचित हे जखमी झाल्याने त्यांचा मृत्यू झाला. महाळुंगे एमआयडीसी पोलीस अधिक तपास करत आहेत.

## चाकण पोलिसांकडून अवैध धंद्यावर कारवाई

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चाकण :** चाकण पोलीस स्टेशन हद्दीत पोलिसांनी सर्व प्रकारच्या अवैध धंद्यांवर वरील कारवाईचा तडाखा सुरूच ठेवला आहे. शुक्रवारी आणि शनिवारी ठिकठिकाणी कारवाई करून काही महिलांसह अवैध धंदे चालकांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. काळुस गावच्या हद्दीत हॉटेल गावकरी येथे पोलिसांनी केलेल्या कारवाईत मोठ्या प्रमाणावर देशी दारू हस्तगत करण्यात आली आहे . त्याचप्रमाणे भोसे गावच्या हद्दीत हॉटेल देवांश मध्ये कारवाई करून देशी दारूच्या बाटल्या हस्तगत करण्यात आले आहेत. मेदनकरवाडी गावच्या मार्तंड नगर येथे कारवाई करून गावठी हातभट्टी दारू जप्त करण्यात आली आहे. येथील एका ३५ वर्षीय महिलेवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बहुळ तालुका खेड येथे कारवाई करून एका ४५ वर्षीय महिलेस ताब्यात घेतले असून गावठी हातभट्टी दारू जप्त केली आहे. शेल पिंपळगाव येथे देखील कारवाई करून ५५ वर्षीय महिलेवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांच्या धडक कारवायांनी अवैध धंदे चालकांचे धाबे दणाणले आहे. चाकण पोलीस ठाण्याच्या हद्दील बहुतांश अवैध धंदे सध्या पूर्णपणे बंद झाल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. मात्र पोलिसांच्या कारवाया थांबताच, असे धंदे पुन्हा सुरु होण्याची नागरिकांना भीती आहे.



## चाहूल गणेश उत्सवाची

**जगाचे लक्ष वेधून घेणाऱ्या श्रीगणेश उत्सवाची चाहुल लागताच मूर्तिकारांनी वेगवेगळ्या मुद्रा असलेल्या श्री मूर्ती तयार करण्यास सुरवात केली आहे. अनेक ठिकाणी नवीन मंदिरात पाषाणात मूर्ती साकारण्याचे काम सुरू असून, शाडू मातीच्या मूर्ती कुंभारवाड्यात तयार होत आहेत. जेजुरी मोरगाव रस्त्यालगत असलेल्या राजू बाम्हणे या शिल्पकाराने पाषणात घडवलेली मूर्ती. (छायाचित्र - विजयकुमार हरिश्चंद्रे.)**

# कांद्याच्या आवकेत वाढ दरात घसरण; उलाढाल ५ कोटी १० लाख रुपये




चाकण बाजारात कांद्याची व तरकारी मालाची झालेली आवक. ( छाया : अविनाश दुधवडे, चाकण )

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चाकण :** खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केटयार्ड मध्ये कांद्याच्या आवकेत वाढ होऊन दरात घसरण झाली. तरकारी मालाची मोठी आवक झाली. पालेभाज्यांमध्ये कोथिंबीरीची मोठी आवक होऊन भाव अक्षरशः गडगडले. कोथिंबीर भाजीला अवघा २ ते३ रुपये जुडी एवढा भाव मिळाला. लसणाची आवक व भावही स्थिर राहिले. एकूण उलाढाल ५ कोटी १० लाख रुपये झाली.

चाकण येथील बाजारात कांद्याची एकूण आवक १,१०० क्विंटल झाली. गेल्या आठवड्याच्या तुलनेत ही आवक ६०० क्विंटलने वाढल्याने भावात २०० रुपयांची घसरण झाली आहे. कांद्याचा कमाल भाव १,८०० रुपयांवरून १,६०० रुपयांवर स्थिरावला. बटाट्याची एकूण आवक १,५०० क्विंटल झाली. गेल्या आठवड्याच्या तुलनेत ही आवक २५० क्विंटलने वाढल्याने भावात १०० घसरण झाली. बटाट्याचा कमाल भाव २,२०० रुपयांवरून २,१०० रुपयांवर स्थिरावला.

लसणाची एकूण आवक ३० क्विंटल झाली. गेल्या आठवड्याच्या तुलनेत ही आवक स्थिर राहिली. लसणाचा कमाल भावही १० हजार रुपयांवर स्थिरावला. हिरव्या मिरचीची एकूण आवक २३० क्विंटल झाली. हिरव्या मिरचीला ५ हजार रुपयांपासून ते ७ हजार रुपयांपर्यंत भाव मिळाला.

शेतीमालाची आवक व बाजारभाव पुढीलप्रमाणे

**कांदा :** एकूण आवक - १,१०० क्विंटल.भाव क्रमांक - १.१,६०० रुपये, भाव क्रमांक २.१,३०० रुपये, भाव क्रमांक ३.१,००० रुपये.

**बटाटा :** एकूण आवक - १,५०० क्विंटल.भाव क्रमांक १.२,१०० रुपये, भाव क्रमांक २.१,५०० रुपये,भाव क्रमांक ३.१,२०० रुपये.

**फळभाज्या :** फळभाज्यांच्या बाजारात एकूण आवक क्विंटलमध्ये व प्रतीदहा किलोंसाठी मालाला मिळालेले भाव कंसात पुढील प्रमाणे -

**टोमॅटो :** ३३० क्विंटल (१,५०० ते २,५०० रू.),कोबी - १९२ क्विंटल १,००० ते १,८०० रू.),फ्लॉवर - २१६ क्विंटल (१,००० ते २,००० रु.), वांगी - ९४ क्विंटल (५,००० ते ६,००० रु.),भेंडी - ६२ क्विंटल (३,००० ते ६,००० रु.), दोडका - ६४ क्विंटल (५,००० ते ६,००० रु.),कारली - ८२ क्विंटल ( ५,००० ते ६,००० रु.),दुधीभोपळा - ७४ क्विंटल (१,५०० ते ३,००० रु.),काकडी - १०७ ( क्विंटल (१,५०० ते २,५०० रु.),फरशी - १५ क्विंटल (७,००० ते ९,००० रु.),वालवड - २१ क्विंटल (६,००० ते ९,००० रुपये), ढोबळी मिरची - १६६ क्विंटल (५,००० ते ६,००० रु.),चवळी - ३८ क्विंटल (३,००० ते ४,००० रु.),शेवगा - ५२ क्विंटल (४,००० ते ६,००० रु.), गाजर - १३० क्विंटल (२,५०० ते ३,५०० रु.), गवार - ६८ क्विंटल (६,००० ते १०,००० रु. ), आले - २०० क्विंटल ( २,००० ते ३,००० रु. ),


**पालेभाज्या :** चाकण येथील बाजारात पालेभाज्यांची एकूण आवक जुड्यांमध्ये व भाज्यांना मिळालेले भाव पुढीलप्रमाणे - मेथी - एकूण १३ हजार जुड्या (९०० ते १,२०० रुपये ), कोथिंबीर - एकूण ३८ हजार जुड्या (२०० ते ५०० रुपये,), शेपू - एकूण ४ हजार ६०० जुड्या (५०० ते ८०० रुपये ), पालक - एकूण ३ हजार ९०० जुड्या (६०० ते १,००० रुपये),.

**जनावरे :** चाकण येथील जनावरांच्या बाजारात विक्रीसाठी आलेल्या ४० जर्सी गाईंपैकी ३० गाईंची विक्री झाली. ( १५,००० ते ७०,००० रु. ), ६० बैलांपैकी ४५ बैलांची विक्री झाली. ( १०,००० ते ४०,००० रु. ), ७५ म्हशीं पैकी ६५ म्हशींची विक्री झाली. ( ३०,००० ते ८०,००० रु. ), १३,९०० शेळ्या - मेंढ्यापैकी १३,३०० शेळ्यांची विक्री झाली असून त्यांना २,००० रुपयांपासून ते १५,००० रुपयांपर्यंत भाव मिळाला.

# काळ चातुर्मासाचा, आरोग्य जपण्याचा

आषाढी एकादशीनंतर चार्तुमासाला प्रारंभ होत-ो. आषाढातली ही एकादशी देवशयनी मानली जाते. म्हणजे यानंतरचे पुढचे चार महिने देव निद्रिस्त अवस्थेत असतात. कार्तिक महिन्यातल्या प्रबोधिनी एकादशीपर्यंतचा काळ चातुर्मास म्हणला जातो. चार्तुमासाच्या काळात श्रीविष्णू क्षीरसागरी योगनिद्रा घेत असतो. त्यामुळे या काळात विष्णूची उपासना करण्याबाबत सांगण्यात आलं आहे. हिंदू धर्मात या चातुर्मासाचं खूप महत्त्व आहे. या काळात कोणतीही शुभकार्यं केली जात नसली तरी व्रतवैकल्यं, सणवार यांची रेलचेल असते. या काळातली व्रतवैकल्यं, उपवास यांचं धार्मिक महत्त्व तर आहेच शिवाय वैज्ञानिक दृष्टीकोनातूनही याचा विचार करण्यात आला आहे. हा दृष्टीकोन समजून घेण्याचा प्रयत्न करायला हवा.

आयुर्वेदात ऋतूमानानुसार आहाराचं महत्त्व सांगण्यात आलं आहे. चातुर्मासाचा काळ हा पावसाळ्याचा असतो. या काळात शरीरा-तला अग्नी मंदावतो. पचनशक्ती क्षीण झालेली असते. एकंदरित काय, तर या काळात वाता-वरणात फारसं चैतन्य नसतं. याची प्रचिती आपल्याला ठायी ठायी येत असते. पावसाळ्यात बाहेरचं वातावरणही काहीसं मंद आणि कुंद असतं. चातुर्मासात काही गोष्टी निषिद्ध मानण्यात आल्या आहेत. तामसी, सामिष आहार या काळात वर्ज्य करण्याबाबत सांगण्यात आलं आहे. या काळात एक वेळ भोजन घेण्यास सांगण्यात आलं आहे. पावसाळ्यात अग्नी मंदावत असल्याने पचनसंस्थेचं कार्य मंदगतीने चालतं. एक वेळ उपवास केल्याने पचनसंस्थेवर ताण येत नाही आणि आरोग्य उत्तम राहतं.




म्हणूनच या काळात साधा, सात्त्विक आहार घेतला जातो. एक वेळ लंघन केल्याने शरीरातले दोष कमी होतात. शरीर हलकं होतं. शरीराचा समतोल राखला जातो.

**धार्मिक परंपरा**

चातुर्मासात मौनव्रताचं महत्त्व आहे. तसंच या काळात निंदानालस्ती करण्यासही मनाई करण्यात आली आहे. एखाद्याबद्दल वाईट बोलणं, वाईट विचार करणं याला फाटा द्यायला हवा. फक्त चातुर्मासातच नाही तर आयुष्यभर या व्रताचं पालन करायला हवं. चातुर्मासाच्या निमित्ताने निदान याची सुरुवात तरी करायला हवी. आजच्या आधुनिक जमान्यात पूर्ण मौनव्रत पाळणं शक्य नसलं तरी मोजकं बोलणं, वायफळ बडबड न करणं, आयुष्याबाबत तक्रारी न करणं, कोणावर टिका, निंदा, टिंगल न करणं एवढं तरी पाळता येऊ शकतं. चार महिन्यांची ही सवय हळूहळू आयुष्यभरासाठी अंगी बाणवता येऊ शकते. चातुर्मासात मंदावलेल्या शक्तीमुळे बोलण्यावरही मर्यादा ठेवण्यास सांगण्यात आलं आहे. आषाढ मासानंतर श्रावणाची सुरुवात होते. श्रावण म्हणजे सण आणि व्रतवैकल्यांचा महिना. या काळातल्या व्रतांमुळे आरोग्य उत्तम राहतं तसंच मंगळागौर, नागपंचमी यासारख्या परंपरा आणि सणांनिमित्त महिला एकत्र जमतात. निरस वातावरणात थोडे रंग भरण्याचा प्रयत्न करतात. चातुर्मासाकडे फक्त धार्मिक दृष्टीकोनातून न पाहता त्यांचं वैज्ञानिक आणि सामाजिक महत्त्व जाणून घेतलं पाहिजे. असं झालं तरच आपण आपल्या धार्मिक परंपरांची आजच्या काळाशी सांगड घालू शकू.

# आता वंदू गुरूजन

**कुठलंही ज्ञान ग्रहण करण्यासाठी गुरुची आवश्यकता असते. साहित्य, कला, विज्ञान, तंत्रज्ञान कुठल्याही क्षेत्रातील सखोल ज्ञान मिळवण्यासाठी गुरुला पर्याय नाही. संपर्काची अनेक साधनं आणि विद्याग्रहणाचे अनेक पर्याय समोर असले तरी आजही गुरुचं स्थान अबाधित आहे. गुरु कुठलंही ज्ञान सोप्या शब्दात आपल्यापर्यंत पोहोचवत असतो. नुकत्याच साजऱ्या झालेल्या गुरु पौर्णिमेनिमित्त...**



प्रत्येकाच्या आयुष्यात गुरुचं एक वेगळं स्थान असतं. गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने गुरुचं स्मरण करण्याची, त्यांच्याप्रती आदरभाव व्यक्त करण्याची, त्यांचा सन्मान करण्याची संधी मिळते. कुठलंही ज्ञान ग्रहण करण्यासाठी गुरुची आवश्यकता असते. साहित्य, कला, विज्ञान, तंत्रज्ञान कुठल्याही क्षेत्रातील सखोल ज्ञान मिळवण्यासाठी गुरुला पर्याय नाही. संपर्काची अनेक साधनं आणि विद्याग्रहणाचे अनेक पर्याय समोर असले तरी आजही गुरुचं स्थान अबाधित आहे. गुरु कुठलंही ज्ञान सोप्या शब्दात आपल्यापर्यंत पोहोचवत असतो. ज्ञानावर त्याचे संस्कार झालेले असतात. एखाद्या विषयावर अभ्यास, मनन आणि चिंतन करुन त्याने तो विषय समजून घेतलेला असतो. असा स्वतःला समजलेला विषय दुसऱ्यापर्यंत पोहोचवताना तो आनंदी असतो. दुसऱ्याला ते ज्ञान देण्यामागे त्याची तळमळ असते. आपल्याला आकलन झालेल्या विषयावर विद्यार्थ्यांनं आणखी काम करावं, त्यावर अधिक संशोधन व्हावं आणि ज्योतीनं ज्योत प्रज्वलित होत रहावी ही सच्च्या गुरुची मनोधारणा असते. म्हणून गुरु शिष्य आपल्यापेक्षा मोठा व्हावा, त्यानं त्रिखंडात कीर्ती मिळवावी या उद्देशानं तो काम करतो. शिष्याच्या प्रतीविर त्याच्या या सकारात्मक भावनांचा परिणाम स्पष्ट दिसून येतो. म्हणूनच काळ बदलला तरी गुरुला पर्याय नाही.

आता गुरुगृही राहून तपसाधना करण्याचे दिवस नाहीत. घरचे लाडकोड अनुभवत शैशव घालवल्यानंतर किशोरवयात व्यवहाराचे कटू धडे घेण्यासाठी गुरुगृही जाण्याची आज आवश्यकता नाही. तिथल्या कडक शिस्तीत, समवयस्कांसमवेत विद्याभ्यास करण्याचं आज काहीच प्रयोजन नाही. निसर्गाच्या सानिध्यात राहून आयुष्याचा अर्थ जाणून घेत उत्तम गृहस्थ होण्यासाठी पार पाडावा लागणारा हा महत्त्वाचा टप्पा आज आपल्या जीवनशैलीपासून दूर गेला आहे. आता विद्यार्थ्यांना घडवणाऱ्या, ज्ञानसंपन्न करणाऱ्या शिक्षण संस्था आहेत. पण त्यामुळे गुरु ही संकल्पना बदललेली नाही. एक नक्की की, आता परिस्थिती आमुलाग्र बदलली आहे. आजचं शिक्षण विद्यार्थी नव्हे तर परीक्षार्थी घडवत आहे. आता सगळ्याच घटांना एकसारख्या साच्यातून बाहेर काढलं जातंय. सर्वांना एकाच तागडीत तोलू पाहतंय. अर्थातच याचे तोटेही समोर दिसत आहेत. पूर्वी अशी परिस्थिती नव्हती. गुरुची रत्नपारखी नजर प्रत्येकातील विशेष गुण चाणाक्षपणे हेरत असे. प्रत्येक मातीचा कस लक्षात घेऊनच त्याला पूरक साच्यात घडवलं जात असे. म्हणूनच तयार होणाऱ्या प्रत्येकाचा आकार, रंग, रूप आणि अस्तित्व वेगळं असे. प्रत्येकाच्या अस्तित्वाला अर्थ देण्याचं काम असं विनासायास पार पडत असे. पण आता या संकल्पनेचं विकेंद्रीकरण झालं आहे. सकाळी शाळेत शिकायचं, दुपारी क्लासला जायचं, एखाद्या तिसऱ्याचं साहित्य अभ्यासाला पूरक म्हणून वापरायचं, गरज वाटल्यास घरातल्यांचं सहाय्य घ्यायचं. म्हणजेच एक गुरु-एक शिष्य ही स्थितीच आता राहिलेली नाही.

**भक्ती विशेष**

मातापित्यांचे संस्कार असतात तसेच गुरुंचे असतात. त्यांचं चारित्र्य, व्यासंग, वागणूक, व्यवहारज्ञान या सर्वांचा प्रभाव शिष्यावर पडतो. ही जाणूनबुजून नव्हे तर अप्रत्यक्षरित्या घडणारी क्रिया आहे. हे संस्कार त्या कोवळ्या वयात आदर्श निर्माण करत असतात. आयुष्यभर दीपस्तंभासारखी साथ देत असतात. पण काळाच्या प्रवाहात हा प्रघात मागे पडला आणि शिक्षणाचा बाजार मांडणारी एक व्यवहारी व्यवस्था अस्तित्वात आली. पण याचा अर्थ असा नव्हे, की आज गुरुपदी बसवावे असे लोकच नाहीत. सगळीकडे पसरलेली भेसळीची कीड इथेही पसरली असली तरी अनेक ऋषीतुल्य व्यक्तिमत्त्वं आपल्या आयुष्यात येतात. त्यातील काही लोक तर निरिच्छ भावनेनं विद्यार्थ्यांच्या भल्यासाठी झटत असतात. आज गुरुप्रती आदर कमी होतोय ही वस्तुस्थिती आहे. गुरुला एकेरी संबोधण्यापर्यंत ऱ्हास झालाय हे देखील वास्तव आहे. पैसा मिळवणं हे इप्सित समोर ठेवून विद्यादान करणाऱ्यांची संख्या वाढतीये हे नाकारण्यात अर्थ नाही. पण म्हणून सगळं संपलं असं नाही. कल्पना आणि वास्तव या दोन विरुद्ध बाबी असतात. त्या सांधणं हे कर्मकठीण काम. पण काहींना ही किमया साधते आणि बदलत्या प्रवाहातही स्वत्त्व टिकवून प्रवास सुरु ठेवला जा-तो. आजही असे अनेक आदर्श आहेत.

म्हणूनच आजही शाळेत असतानाचे चिडके वाटायचे ते शिक्षक रस्त्यात भेटले की नकळत पायाला हात लावून नमस्कार केला जातो, जा-तीनं विचारपूस केली जाते. एखादी जुनी कविता वाचताना प्राध्यापकांनी वर्गात केलेलं रसग्रहण स्मरतं. तोंडी हिशेब करताना, पाढा चुकल्यावर शिक्षकांनी हातावर दिलेली छडी आठवते. वय आणि प्रगल्भता वाढताना शिक्षकांचा आठव अधिक गहिरा होत जातो. आजच्या पिढीलाही या अनुभूतीचा आनंद घेता यावा अशी इच्छा आहे. गुरुपौर्णिमा इव्हेंट होता कामा नये. किमती भेटवस्तू, हार-फुलांचे गुच्छ, महागडी प्रिंटिंग देऊन गुरुपौर्णिमेचा इव्हेंट साजरा होईल, पौर्णिमा नाही. ही व्यासपौर्णिमा साजरी करायची तर दोघांची मने विशुद्ध हवीत. मनात प्रेमभाव दाटून यायला हवा आणि हा वसा पुढे चालवण्याचा संकल्प सोडायला हवा. दिल्यानं वाढणारी ही एकमेव संपत्ती आहे. वाटल्यानं वृद्धिंगत होणारा हा एकमेव खजिना आहे. तो जपूया.



# अशी करावी आरती

भगवंताच्या पूजेनंतर आपण आरती करतो. आरती ही भगवंताची स्तुती असते. यामुळे देव प्रसन्न होतो, असं म्हटलं जातं. आरती करताना देवाला ओवा-ळलं जातं. आरतीचे विविध प्रकार आहेत. कर्पूर आरती, पंचारती यांद्वारे परमेश्वराचं ध्यान केलं जातं. आरती करताना निरंजन लावलं जातं. तमिळमध्ये आर-तीला ह्रदीप आराधनई असं म्हटलं जातं. आरती म्हणल्यानेच नाही तर यात सहभागी झाल्यानेही खूप पुण्य मिळतं. आरती करताना काही नियमांचं पालन करायला हवं. आरतीदरम्यान देवतेला तीन वेळा पुष्प अर्पण करायला हवं. आरती करताना झांजा, तबला, ढोल, वाजवले जातात.

आरती म्हणताना भक्ताच्या मनात विशेष भावना असली पाहिजे. आरती करताना देवाच्या ठायी पंचप्राण एकवटायला हवेत. मन परमेश्वराच्या चरणी लीन व्हायला हवं. मनात भक्तीभाव उमटायला हवा. आरती करताना लावलेल्या निरंजनाची ज्योत म्हणजे आपल्या आत्म्याच्या ज्योतीचं प्रतिक असतं. म्हणूनच आत्म्याची ज्योत परमेश्वराशी एकरूप व्हायला हवी. भक्ताने अंतर्मनाने साद घातली तर परमेश्वर प्रसन्न होतो, असं म्हण-तात. आरती करताना आपण दिवा लावतो. हा दिवा विषम संख्येत असायला हवा. म्हणजे ३, ५ किंवा ७ दिव्यांनी देवाला ओवाळायला हवं. सर्वसाधारणपणे पाच दिव्यांनी देवाला ओवाळलं जातं. आरती करताना विविध माध्यमांचा वापर करता येतो. देवाला दिव्याने ओवाळता येतं. पाण्याने भरलेल्या शंखानेही आरती केली जाते. आरती करण्यासाठी पवित्र अशा रेशमी वस्त्रांचा वापर केला जातो. आंबा आणि पिंपळाच्या पानांनीही आरती करता येते.

**आराधना**

तर साष्टांग म्हणजे मेंदू, हृदय, खांदे, हात आणि गुडघे अशा अवयवांनीही देवाची आरती करता येते. आरती म्हणजे मानवी देहातल्या पंचप्राणांचं प्रतिक मानली जाते. त्यामुळे येत्या सणासुदीच्या काळात किंवा दैनंदिन पुजेदरम्यान आरती करताना हे नियम लक्षात ठेवले तर अधिक लाभ होऊ शकतील.

# संयमात सामर्थ्य दडलंय



संयम हा महत्त्वपूर्ण गुण आहे. या गुणामुळे आयुष्यातील खडतर प्रसंगांना तोंड देण्याची क्षमता येते. मौन हा संयमाचाच एक पैलू आहे. शब्द वाणीच्या रुपात प्रकट होतात तेव्हा मोठा प्रभाव सोडून जातात. हे शब्द चांगले असतात तेव्हा साहजिकच प्रभाव चांगला असतो. उलटपक्षी, शब्द कटू, अमंगल आणि उग्र असले की प्रभावही वाईटच असतो. म्हणूनच आयुष्याचं अंतिम सत्य मृत्यू आहे अगदी त्याच प्रकारे वाणीचा शेवट मौन आहे. आपल्याकडे अक्षरांना ब्रह्म समजण्यात येतं. या शब्दब्रह्माचा उचित मान ठेवणं प्रत्येकाचं कर्तव्य आहे. वाणीचं माध्यम म्हणजे जीभ... वाणी मधूर असेल तर समोरच्या व्यक्तीपर्यंत माधुर्य पसरतं. मात्र जीभेद्वारे चुकीच्या शब्दांचा उच्चार झाला तर समोरची व्यक्ती कायमची दुरावते. हे सगळे शब्दांचे खेळ आहेत. मन आणि मस्तिष्कावर शब्दांचा थेट परिणाम होतो हे सत्य आधुनिक मानसशास्त्रानेही मान्य केलं आहे. एखादी व्यक्ती अपशब्द उच्चारत असेल तर समोरची व्यक्ती उत्तेजित होऊन त्याच अविर्भावात प्रत्युत्तर देते. समोरच्याची वाणी समजूतदार असेल तर प्रत्युत्तरही तसंच येतं. म्हणूनच जगातल्या प्रत्येक धर्माने ऊर्जावान शब्दाचा संचय करण्याचं सूचित केलं आहे. कुठल्याही धर्माची प्रार्थना पाहिली तर त्यात मधूर, मंगल, ऊर्जावान शब्द दिसतात. आपल्या मंत्रांमध्येही असेच शक्ती प्रदान करणारे, समन्वय साधणारे आणि संघटित होण्याची शिकवण देणारे शब्द आढळतात. हेच सामर्थ्य जगण्याला नवं बळ देतं. संगीतामध्ये शब्द आणि सुरांचा मेळ असल्यामुळे मनुष्यांवरच नव्हे तर वनस्पतींवरही त्याचा प्रभाव दिसतो. म्हणूनच शब्दांचा नेटका वापर शिकायला हवा. महावीरांनीदेखील सम्यक वाणीचं महत्त्व सांगितलं आहे. गुरुनानक सांगतात, सतत चांगलं बोला आणि ते शक्य नसेल तेव्हा मौन राखा. आपल्या भावना नियंत्रणापलिकडे जातात, शब्दांनी मन दुखवण्याची शक्यता समोर दिसते, वाणीने शत्रू निर्माण होतील हे स्पष्ट होतं तेव्हा काही काळासाठी मौन राखणं केव्हाही चांगलं. कारण हा ही तपसाधनेचा एक भाग आहे.

**स्वबोध**

# श्रीविष्णूची पावन तीर्थक्षेत्रे


उत्तराखंडमधलं बद्रीनाथ मंदिर

चातुर्मास काळात श्रीविष्णूच्या आराधनेला महत्त्व आहे. यानिमित्ताने श्रीविष्णूच्या प्रसिद्ध मंदिरांची ही ओळख...

* चार धामांपैकी एक म्हणजे उत्तराखंडमधलं बद्रीनाथ मंदिर. अलकनंदा नदीच्या किनारी हे मंदिर वसलं आहे. या मंदिरात श्रीविष्णूची काळ्या पाषाणापासून घडवलेली मूर्ती आहे.
* पुरीचं जगन्नाथ मंदिरही चार धामांपैकी एक. या ठिकाणी श्रीकृष्ण, सुभद्रा आणि बलराम यांच्या मूर्ती आहेत. जगन्नाथाची रथयात्रा जगभरात प्रसिद्ध आहे.
* तिरुपतीचं बालाजी मंदिर हे श्रीविष्णूचं अत्यंत महत्त्वाचं स्थान आहे. बालाजी मंदिर श्रीमंत देवस्थानांपैकी एक. इथे केस अर्पण करण्याची परंपरा आहे.
* तमिळनाडूतल्या कांचीपुरममध्ये उलागलंडा पेरुमल मंदिर आहे. हे स्थान विष्णूच्या १०८ दिव्यधामांपैकी एक आहे.
* केरळच्या थिरुअनंतपुरममध्ये पद्मनाभ स्वामींचं मंदिर वसलं आहे. हे जगातलं सर्वात श्रीमंत हिंदू मंदिर आहे.
* तमिळनाडूतल्या मदुराईमध्ये कोडालअझहगार मंदिर आहे. हे स्थानही विष्णूच्या १०८ दिव्यधामांपैकी एक आहे. कोडाल हे मदुराईचंच एक नाव आहे तर अझहगार म्हणजे सुंदर. म्हणूनच या मंदिराला कोडालअझहगार असं म्हटलं जातं.
* तमिळनाडूमधल्या कांचीपुरममध्ये श्री वरदराजा पेरुमल मंदिर आहे. विष्णूचे भक्त या स्था-नाला अत्यंत पवित्र मानतात.
* गुवाहाटीमध्ये अस्वक्रांता मंदिर आहे. हे मंदिरही बरंच प्रसिद्ध आहे.
* तमिळनाडूतल्या श्रीरंगममध्ये श्रीरंगनाथस्वामी मंदिर आहे. या मंदिराची रचना अनोख्या पद्धतीने करण्यात आली आहे. इथे भाविकांची वर्दळ असते.

**तीर्थक्षेत्र**

# जन्माचं सोनं करा

चौऱ्याऐंशी लक्ष योनींमधून फिरल्यानंतर मनुष्यजन्म मिळतो, असं हिंदू धर्म सांगतो. भूतलावरच्या सर्व प्राणीमात्रांमध्ये माणूस श्रेष्ठ मानला जातो. माणसाकडे बुद्धी आहे, जाणीवा आहेत. तो हसू शकतो, रडू शकतो, बोलू शकतो. सर्व प्राणीमात्रांमध्ये हे वरदान केवळ मनुष्यालाच मिळालं आहे. म्हणूनच मनुष्य जन्म मिळणं भाग्याचं मानलं जातं. या जन्माचं सोनं करायचं की मातेरं हे ज्याच्या त्याच्या हाती असतं. समर्थ रामदास स्वामी दासबोधातल्या पहिल्या दशकातल्या दहाव्या समासात नरदेह स्तवन करतात. यात ते नरदेहाचं महत्त्व विषद करतात. ते म्हणतात, धन्य धन्य हा नरदेहो। येथील अपूर्वता पाहो। जो जो किजे परमार्थलाहो। तो तो पावे सिद्धीतें।।१।। या नरदेहाचेनि लागवेगें। येक लागले भक्तीसंगें। येकीं परम वीतरागें। गिरिकंद्रें सेविलीं।।२।।

याचा अर्थ असा की, हा नरदेह खरंच धन्य आहे. नरदेह प्राप्त झाल्यावर परमार्थ करता येतो. हीच याची अपूर्वता म्हणावी लागेल. जे परमार्थाला लागतात ते सिद्धीस जातात. नरदेह प्राप्त झाल्यानंतर काहीजण भक्तीमार्गाला लागतात. परमेश्वराची निस्सिम भक्ती करू लागतात. काहीजण वैराग्य पत्करतात. विरक्त होऊन ते डोंगरकपारीत राहू लागतात. नरदेह मिळाल्यानंतर विविध मार्गांनी देवाची भक्ती केली जाते. याबद्दल ते म्हणतात की, येक फिरती तीर्थाटणें। येक करिती पुरश्चरणें। येक अखंड नामस्मरणें। निष्ठावंत राहिले।।३।।

याचा अर्थ असा की नरदेह मिळाल्यानंतर कोणी तीर्थयात्रा करतात तर कोणी पुनश्चरण करतात. काहीजण स्वतःला अखंड नामस्मरणात गुंगवून टाकतात. नामस्मरणाची शक्ती ते जाणतात. आपल्या भगवंताप्रती ते निष्ठा आणि श्रद्धा राखतात. भगवंताचे नामस्मरण केल्यानंतर परलोकप्राप्ती होते, मोक्ष मिळतो पण हे सगळं नरदेहातच साध्य करता येतं. याबाबत समर्थ दासबोधात म्हणतात की, पशुदे-हीं नाही गती। ऐसे सर्वत्र बोलती। म्हणून नरदेहींच प्राप्ती परलोकाची।।२१।। पशुदेही आत्म्याला गती मिळत नाही. यासाठी नरदेह मिळावा लागतो. ही बाब सर्वश्रुत आहे. सर्वजण हे जाणतात. यासाठी नरदेह




त्यामुळे नरदेह मिळाल्यानंतर परलोकप्राप्ती होऊ शकते. त्या दृष्टीने आपण प्रयत्न करायला हवेत. समासाच्या अखेरीस समर्थ म्हणतात, देह परमार्थी लाविले। तरिच याचे सार्थक जालें। नाहीं तरी हें वेर्थचि गेलें। नाना आघातें मृत्युपंथें।।६१।। याचा सरळ साधा अर्थ म्हणजे नरदेह परमार्थासाठी दिला आहे. तरच त्याचे सार्थक होते. नाही तर जन्म व्यर्थ जातो. त्याला काहीही अर्थ उरत नाही. परमार्थाकडे दुर्लक्ष केलं तर मनुष्य अनेक प्रकारच्या आघातांनी मृत्यूपंथाला लागतो. त्यामुळे मनुष्यदेहाचं सार्थक करून मोक्ष मिळवायचा असेल तर परमार्थ करायला हवा.

**दासबोधातून**

# राशी आणि रत्ने

मानवी आयुष्यावर रत्नांचा मोठा प्रभाव दिसून येतो, असं ज्योतिषशास्त्र मानतं. राशी-नुसार रत्नं परिधान केल्यास व्यक्तीचं वर्तन आणि स्वभावामध्ये सकारात्मक परिणाम दिसून येतात. म्हणूनच राशीनुसार रत्न धारण करावं आणि यशवंत व्हावं. आज याविषयी माहिती घेऊ. राशीचक्रातील पहिली रास म्हणजे मेष.

**मेष:** ही अग्नितत्त्वाची रास आहे. या राशीच्या लोकांनी हिरा घालावा. यामुळे उत्कर्ष होतो.

**जाणून घ्या**

**वृषभ :** या राशीचा स्वामी शुक्र असून भाग्यरत्न पाचू हे आहे. या राशीच्या लोकांनी पाचू धारण केल्यास त्यांच्या विचारांमध्ये संतुलन बघायला मिळतं.

**मिथुन :** बुध राशीस्वामी असणाऱ्या मिथुन राशीच्या लोकांनी मोती धारण करावा. यामुळे आर्थिक स्थिती सुधारते त्याचबरोबर नातेसंबंधांमधील तणाव निवळतो.


**कर्क :** राशीचक्रातील या चौथ्या राशीच्या लोकांनी माणिक हे रत्न धारण करावं. हे रत्न या लोकांचा स्वभाव, जनसंपर्क आणि आर्थिक स्थितीवर प्रभाव दाखवतं.

**सिंह :** सिंह या राशीचा स्वामी सूर्य आहे. ही अग्नितत्त्वाची रास आहे. या राशीच्या लोकांना पेरीडॉट नामक रत्नाचा सकारात्मक परिणाम दिसून येतो.

**कन्या :** कन्या रास असणाऱ्या लोकांचं भाग्यरत्न नीलम आहे. चमकदार निळ्या रंगाचं हे रत्न या लोकांच्या आयुष्यात अत्यंत सकारात्मक बदल घडवून आणू शकतं.

**तुळ :** तुळ राशीचा स्वामी शुक्र असून या राशीच्या लोकांना ओपल या रत्नाचा विशेष लाभ मिळतो.

**वृश्चिक :** जलतत्त्वाच्या या राशीचे लोक अतिशय संवेदनशील असतात. ते अधिक चिकित्सक असतात. या गुणांमध्ये संतुलन निर्माण करण्यासाठी वृश्चिक राशीच्या लोकांनी टोपाझ हे रत्न धारण करावं.



**धनु :** अग्नितत्त्वाची ही रास चिकित्सक स्वभावासाठी ओळखली जाते. या लोकांना वारंवार आरोग्याच्या तक्रारी जाणवतात. ही नकारात्मकता दूर करण्यासाठी लाजव्रत नावाचं रत्न उपयुक्त ठरतं.

**मकर :** मकर राशीच्या लोकांनी गार्नेट नामक लाल रंगाचं रत्न धारण करावं. क्रिस्टल स्वरुपात असणारं हे रत्न शुभ फलदायी ठरतं.

**कुंभ :** या राशीचे लोक अग्नितत्त्वाने प्रभावित असतात. जीवनात संतुलन निर्माण करण्यासाठी त्यांनी एमेथिस्ट नामक रत्न धारण केल्यास चांगले परिणाम दिसून येतात.

**मीन :** भावनातिरेक हे स्वभाववैशिष्ट्य असणाऱ्या लोकांनी ॲक्वामरीन स्टोन नामक रत्न धारण करावं. हे रत्न आयुष्यातील नकारात्मकता घालवतं.

# भारताची दमदार गोलंदाजी

## चौथ्या दिवशी विजयाकडे वाटचाल; २-१ च्या आघाडीचे लक्ष्य

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चेन्नई :** लॉर्ड्स क्रिकेट मैदानात भारत आणि इंग्लंड संघात कसोटी मालिकेतील तिसरा कसोटी मालिका खेळवली जात आहे. या सामन्यात दोन्ही संघाच चुरशीचा खेळ पाहायला मिळत आहे. दोन्ही संघांच्या खेळाडूंमध्ये गरमागरमीही झाल्याचे पाहायला मिळाले, विशेषत: तिसऱ्या दिवसाच्या अखेरीस. त्यानंतर चौथ्या दिवसाची सुरूवातीला मोहम्मद सिराजकडून शानदार वेगवान गोलंदाजी पाहायला मिळाली.

या सामन्यात पहिल्या डावात दोन्ही संघांनी सारख्याच धावा केल्या. दोन्ही संघ ३८७ धावांवर सर्वबाद झाले होते. त्यानंतर तिसऱ्या दिवसाच्या अखेरीस इंग्लंडचा संघ दुसऱ्या डावात फलंदाजीला उतरला. पण एकाच षटकाचा खेळ झाला. इंग्लंडने चौथ्या दिवशी दुसऱ्या षटकापासून आणि बिनबाद २ धावांपासून पुढे खेळायला सुरुवात केली.

पण डावाच्या ६ व्याच षटकात सलामीवीर बेन डकेटला १२ धावांवर मोहम्मद सिराजने जसप्रीत बुमराहच्या हातून झेलबाद केले.



त्यानंतर क्रॉलीला साथ देण्यासाठी ऑली पोप आला. ते डाव पुढे नेण्याचा प्रयत्न करत होते.

मात्र, सिराजने गोलंदाजी केलेल्या १२ व्या षटकाच्या शेवटचा चेंडू पोपच्या पॅडला लागला. त्यानंतर लगेचच सिराजने विकेटसाठी विचारणा केली. पण अंपायर्सने नाबाद दिल्यानंतर तो लगेचच कर्णधार शुभमन गिलकडे गेला.

त्यावेळी तो गिलला समजावत होता की डिसीजन रिव्ह्यू सिस्टीमचा (DRS) वापर कर. पण गिल डीआरएस घ्यायचा की नाही या संभ्रमात होता. त्यावेळी सिराज त्याला समजावत होता की 'भाई चेंडू समोर लागला आहे, उंचीपण कमी आहे.' पण अखेर १५ सेंकदाचा वेळ संपण्यासाठी ६ सेकंद बाकी असताना गिलने सिराजचं ऐकून डीआरएस घेतला.

त्यावेळी रिव्ह्यूमध्ये दिसले की पोपच्या बॅटला चेंडूचा स्पर्श झाला नव्हता, तो चेंडू थेट त्याच्या पॅडला लागला. त्यानंतर हॉकआयमध्ये पोप पायचीत झाल्याचे दिसले. त्यामुळे पोपला ४ धावांवरच माघारी जावे लागले.

त्यानंतर नितीश कुमार रेड्डीने झॅक क्रॉलीलाही २२ धावांवर यशस्वी जैस्वालच्या हातून झेलबाद केले. हॅरी ब्रुकलाही २३ धावांवर आकाश दीपने त्रिफळाचीत केले. पण पुन्हा एकदा त्यानंतर कर्णधार बेन स्टोक्स आणि जो रुट यांची जोडी जमली. त्यांनी चांगली भागीदारी करत संघाला १५० धावांचा टप्पा पार करून दिला.

## युरोप दौऱ्यावर भारताचा हॉकीत सलग तिसरा विजय



**पुणे :** युरोप दौऱ्यावर असलेल्या भारत अ पुरुष हॉकी संघाने सलग तिसऱ्या विजयाची नोंद केली. फ्रान्सलाही त्यांनी पराभवाचा धक्का दिला. युरोप दौऱ्यावर असलेल्या भारत अ पुरुष हॉकी संघाने सलग तिसऱ्या विजयाची नोंद करीत फ्रान्सला ३-२ने पराभूत केले, हा सामना शनिवारी हॉकी क्लब ऑरांजे-रूड येथे खेळला गेला. भारतीय संघाकडून आदित्य अर्जुन लालगेने दोन गोल केले, तर बॉबी सिंग धामीने एक गोल करून भारताचा विजय निश्चित केला. लालगेचा पहिला गोल मैदानी होता आणि नंतर पेनल्टी कॉर्नरवरून दुसरा गोल केला. बॉबीनेही फ्रान्सच्या गोल जाळ्याचा वेध घेतला. फ्रान्सकडून क्लेमेंटने दोन्ही गोल केले.

या दौऱ्यासाठी संघाने खूप मेहनत केलेली आहे आणि आता मैदानावर त्या मेहनतीचे फळ दिसत आहे, हे खूपच समाधानकारक आहे. या दौऱ्यात अजून काही सामने बाकी आहेत, असे सांगताना प्रशिक्षक शिवेंद्र सिंग यांनी कामगिरीत सातत्य राखण्याचा विश्वास व्यक्त केला. हा सामना शनिवारी हॉकी क्लब ऑरांजे-रूड येथे खेळला गेला. भारतीय संघाकडून आदित्य अर्जुन लालगेने दोन गोल केले, तर बॉबी सिंग धामीने एक गोल करून भारताचा विजय निश्चित केला. लालगेचा पहिला गोल मैदानी होता आणि नंतर पेनल्टी कॉर्नरवरून दुसरा गोल केला. बॉबीनेही फ्रान्सच्या गोल जाळ्याचा वेध घेतला. भारतीय संघ रविवारी पुन्हा एकदा फ्रान्सविरुद्ध खेळणार आहे .

# भारतीय खुली ॲथलेटिक्स स्पर्धेत हर्ष राऊतची वेगवान धाव

## लांब उडीत श्रीशंकर एम याला प्रथम क्रमांक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महाराष्ट्र राज्य ॲथलेटिक्स संघटनेच्या वतीनेभारतीय खुल्या ॲथलेटिक्स स्पर्धेत पुरुष गटात महाराष्ट्राच्या हर्ष राऊतने 10.38 सेकंदची वेळ नोंदवून वेगवान धावपटू मान संपादन केला. तर, महिला गटात रिलायन्स स्पोर्टस फाउंडेशनच्या साक्षी चव्हाण हिने 11.81 वेळेची नोंद केली. भारताचा अव्वल आंतरराष्ट्रीय लांब उडी पटू जेएस डब्ल्यूच्या श्रीशंकर एम याने आपल्या चौथ्या उडीत 8.05 मीटर अंतर कापून लांब उडीत प्रथम क्रमांक पटकावला.

सावित्राबाई फुले पुणे विद्यापीठातील ॲथलेटिक्स ट्रॅकवर झालेल्या या एकदिवसीय स्पर्धेत पुरुषांच्या 100मीटर धावण्याच्या शर्यतीत मूळचा ठाण्याचा असलेला हर्ष राऊत(10.38 से)ने प्रथम क्रमांक पटकावला. त्यानंतर ओरिसाच्या आमिया कुमार मल्लिक याने 10.63से, तर, महाराष्ट्राच्या विनीत दिनकरने 10.68से) यांनी अनुक्रमे दुसरा व तिसरा क्रमांक पटकावला. महिला गटात चुरशीच्या लढतीत मूळची औरंगाबाद येथे असलेली आणि रिलायन्स स्पोर्टस फाउंडेशन अंतर्गत साक्षी चव्हाण हिने 11.81 सेकंद वेळ नोंदवत पहिला क्रमांक पटकावला. मूळची साताराची असलेली त्रिवेंद्रम येथे एनसीओइ येथे कार्यरत असलेल्या राष्ट्रीय सुवर्णपदक विजेती असलेली सुदेशना शिवणकरने 11.89सेकंद आणि महाराष्ट्राच्या राष्ट्रीय विजेत्या अवंतिका नराळे(11.93से)ने अनुक्रमे दुसरे व तिसरे स्थान पटकावले.

दुपारच्या सत्रात लांब उडी प्रकारात पुरुष गटात ओडिशाच्या सरून पायासिंग(7.68मी) ने दुसरा आणि केरळच्या अमल टीपी(7.45मी) याने तिसरा क्रमांक पटकावला.

निकाल: प्रथम, द्वितीय व तृतीय

100मी. धावणे महिला शर्यत अ: 1.साक्षी छा(11.81से, रिलायन्स), 2.सुदेशना शिवणकर(11.89से, एनसीओइ त्रिवेंद्रम), 3.अवंतिका नराळे(11.93से, महाराष्ट्र);

100मी. धावणे महिला शर्यत ब: 1.चार्वि पुजारी(12.06से, महाराष्ट्र), 2.तमश्री मिश्रा(12.20से,पश्चिम बंगाल), 3.सिया सावंत (12.22से, महाराष्ट्र);

100मी. धावणे पुरुष शर्यत अ: 1.अमिया मल्लिक(10.63से, ओडिशा), 2.विक्रम गुर्जर(10.76से, राजस्थान), 3.प्रज्वल आर(10.92से, कर्नाटक);

100मी. धावणे पुरुष शर्यत ब: 1.मनीष कुमार(10.65से,आर्मी), 2.अबिनाश साहू(10.77से, ओडिशा), 3.आर्यन फ्रान्सिस(10.88से, महाराष्ट्र);

100मी. धावणे पुरुष शर्यत क: 1.नयन शहा(10.73से, महाराष्ट्र), 2.क्षितिज चांगिरे(11.00से, महाराष्ट्र), 3.ऋषी हजारिका(11.01से, आसाम);

100मी. धावणे पुरुष शर्यत ड: 1. विनीत दिनकर(10.68से, महाराष्ट्र), 2.रोहन घोष(10.83से,पश्चिम बंगाल), 3.आर्यन कदम (10.88से, महाराष्ट्र);

100मी. धावणे पुरुष शर्यत इ: 1.हर्ष राऊत(10.48से, महाराष्ट्र), 2.धीरज श्रीधर(10.75से, आर्मी), 3.पाल धन सिंग(10.80से, आर्मी);

400मी. धावणे पुरुष शर्यत अ: 1. निखिल ढाके(48.12से, महाराष्ट्र), 2. सुरेश पुनिया(48.33से, राजस्थान), 3.विश्वजीत शिंदे(49.37से, महाराष्ट्र);

400मी. धावणे पुरुष शर्यत ब: 1. सुभाष दास(47.76से, जेएसडब्लू ), 2.गगन आमिन(48.87से, महाराष्ट्र), 3.सुनील पुरोहित(49.27से, गुजरात);

400मी. धावणे पुरुष शर्यत क:1. आमोज जेकब(46.59से, दिल्ली), 2.संतोष कुमार टी(46.84से, तामिळनाडू), 3.सुरज ए(47.05से, तामिळनाडू);

400मी. धावणे पुरुष शर्यत ड:1. विशाल टी.के.(46.02से, एनसीओइ त्रिवेंद्रम), 2.जय कुमार(46.76से, एनसीओइ त्रिवेंद्रम), 3.अरुल राजलिंगम(46.89से, आर्मी);

400मी. पुरुष अडथळा शर्यत अ: 1.निकुंज झाला (51.86से, गुजरात), 2.आर्यन कश्या(जेएसडब्लू, 53.00से), 3.रक्षित एन(53.07से, एनसीओइ त्रिवेंद्रम);

400मी. पुरुष अडथळा शर्यत ब: 1. कार्तिक यारावरपू(51.95से, आंध्रप्रदेश), 2. शक्ती सिंग(53.31से, राजस्थान), 3.कैफ इलाही(55.76से, मध्यप्रदेश);

400मी. पुरुष अडथळा शर्यत क: 1.अश्विन कृष्णन एल (51.47से, तामिळनाडू), 2.तेजप्रताप सिंग(52.02से,पंजाब), 3.केशव तन्वर(53.29से, पोलिस स्पोर्टस सेंटर);

400मी. पुरुष अडथळा शर्यत ड: 1. सतीश के(52.20से, आर्मी), 2.आफताब आलम(52.34से, उत्तरप्रदेश), 3.हरदीप कुमार(52.58से, पंजाब);

800मी.धावणे पुरुष शर्यत अ: 1.अखिल केए(01.51.61से, केरळ), 2.तुषार सूर्यवंशी(01.51.71से, महाराष्ट्र), 3.अनंत गौतम(01.56.31से, पोलिस स्पोर्टस सेंटर);

800मी.धावणे पुरुष शर्यत ब: 1. क्रिशन कुमार(01.50.79से, जेएसडब्लू), 2.सत्यजीत पूजा (01.51.79से, महाराष्ट्र), 3.नकुल गोडसे(01.53.11से, महाराष्ट्र);

800मी. धावणे महिला: 1.लकमीप्रिया किसन(02.12.71से, ओडिशा), 2.विनिता गुर्जर(02.14.32से, उत्तरप्रदेश), 3.वैष्णवी रावळ(02.14.97से, कर्नाटक);

400मी. अडथळा शर्यत महिला गट: 1.दिक्षिता रामकृष्ण(01.00.25से, कर्नाटक), 2.रमणदीप कौर(01.00.79से, पंजाब), 3.श्रावणी सांगळ(01.02.42से, महाराष्ट्र);



# 'मला भारताकडून पुन्हा कसोटी क्रिकेट खेळायचे आहे'; अजिंक्य रहाणेने व्यक्त केली इच्छा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** भारतीय क्रिकेट संघाचा अनुभवी फलंदाज अजिंक्य रहाणे अजूनही कसोटी क्रिकेटमध्ये पुनरागमन करण्याच्या आशेवर आहे. इंग्लंडमधील लॉर्ड्स येथे IND vs ENG तिसरी कसोटी सुरू आहे आणि अजिंक्यही तिथे उपस्थित आहे. ३७ वर्षीय रहाणेने स्काय स्पोर्ट्स क्रिकेटला दिलेल्या मुलाखतीत कसोटी क्रिकेट खेळण्याची आपली तीव्र इच्छा व्यक्त केली.

तो म्हणाला, "इथे येऊन खूप छान वाटलं. मला अजूनही भारतासाठी कसोटी क्रिकेट खेळायचं आहे. मला कसोटी क्रिकेटबद्दल खूप



आवड आहे आणि सध्या मी माझ्या क्रिकेटचा आनंद घेत आहे. काही दिवसांसाठी इथे आलो होतो आणि मी माझे ट्रेनिंगचे कपडे सोबत आणले आहेत जेणेकरून मी स्वतःला फिट ठेवू शकेन. आमचा देशांतर्गत हंगाम सुरू होत आहे, त्यामुळे तयारी सुरू झाली आहे."

अजिंक्य रहाणेने २०२३ च्या जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या फायनलनंतर भारतासाठी कोणताही कसोटी सामना खेळलेला नाही. त्याने आतापर्यंत ८५ कसोटी सामन्यांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केले आहे आणि त्याच्या नावावर ५०७७ धावा आहेत.

यापूर्वीही रहाणेने कसोटी क्रिकेटमध्ये परत येण्याची इच्छा व्यक्त केली होती. तो म्हणाला होता, "मला पुन्हा भारतीय संघात परत येण्याची इच्छा आहे. ती भूक, ती आग अजूनही माझ्यात आहे. फिटनेसच्या बाबतीत मी खूप चांगल्या स्थितीत आहे. मला फक्त एका वेळी एका सामन्यावर लक्ष केंद्रित करायचे आहे, सध्या या आयपीएलबद्दल विचार करत आहे आणि नंतर भविष्यात काय होते ते पाहू."

२०२०-२१ मध्ये झालेल्या ऐतिहासिक बॉर्डर-गावस्कर मालिकेतील तीन सामन्यांसह रहाणेने भारताचे नेतृत्व केले आहे. नियमित कर्णधार विराट कोहली आपल्या मुलाच्या जन्मासाठी मायदेशी परतल्यानंतर आणि भारताला ॲडलेडमध्ये ३६ धावांवर ऑल आऊट होऊन मोठा पराभव पत्करावा लागल्यानंतर, रहाणेने कसोटी क्रिकेटच्या इतिहासातील सर्वात प्रसिद्ध पुनरागमनांपैकी एकाचे नेतृत्व केले.

# जगभरात भारताचं प्रतिनिधित्व करणार नाशिकच्या कन्या

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नाशिक :** नाशिकच्या इतिहासात दोन महिला खेळाडू प्रथमच जागतिक विद्यापीठ टेबल टेनिस स्पर्धेत भारतीय विद्यापीठ संघाचे प्रतिनिधित्व करत आहेत नाशिक-येथील सायली वाणी व तनिशा कोटेचा या दोघींची जागतिक विद्यापीठ टेबल टेनिस स्पर्धेसाठी भारतीय विद्यापीठ संघात निवड झाली आहे. या जागतिक विद्यापीठ खेळांच्या स्पर्धा जर्मनी येथे बुधवार (ता. १६) पासून सुरू होत आहेत.

नाशिकच्या इतिहासात दोन महिला खेळाडू प्रथमच जागतिक विद्यापीठ टेबल टेनिस स्पर्धेत भारतीय विद्यापीठ संघाचे प्रतिनिधित्व करत आहेत. यापूर्वी १९७० मध्ये कोलंबो येथे झालेल्या



जागतिक विद्यापीठ स्पर्धेसाठी नाशिकच्या दिवंगत प्रकाश (बाबा) सौंदणकर यांची निवड भारतीय विद्यापीठ संघात निवड झाली होती. सायली वाणी आणि तनिशा कोटेचा या दोघींनीही आजवर कनिष्ठ गटातून आशियायी स्पर्धा, दक्षिण आशियायी, जागतिक अजिंक्यपद स्पर्धा, ब्रिक्स गेम्स अशा महत्त्वाच्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत भारतीय संघाचे प्रतिनिधित्व करत भारतासाठी पदके जिंकली आहेत.

सायली वाणीची डिसेंबर २०२४ मध्ये भारतीय महिला संघात जागतिक आईटीटीएफ मिश्र सांघिक स्पर्धेसाठी निवड झाली होती. सायलीने आत्तापर्यंत २४ आंतरराष्ट्रीय स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करत १९ पदके पटकवली आहेत. तनिशाने आतापर्यंत ४६ वेळा भारतीय संघाचे प्रतिनिधित्व करत ३६ पदके मिळविली आहेत. तनिशा ही सहा वर्षापासून भारतीय कनिष्ठ गट संघाचे प्रतिनिधित्व करत आहे. ट्युनिशिया येथे नुकत्याच झालेल्या डब्लूटीटी यूथ कंटेंडर स्पर्धेत भारतीय महिला संघाचे तनिशाने प्रतिनिधित्व केले आहे.

या दोघीही राष्ट्रीय पदक विजेत्या असून त्यांनी खेलो इंडिया स्पर्धेतही राष्ट्रीय विजेतेपद पटकावले आहे. तनिशा कोटेचा सध्या १९ वर्षाखालील मुलींच्या गटात भारतात प्रथम, तर महिला गटात पाचवी मानांकित टेबल टेनिसपटू आहे.

## राज्यस्तरीय व पुणे लिग कबड्डी स्पर्धा बालेवाडीत पार पडणार

# कबड्डी महर्षी बुवा साळवी चषक १६ जुलैपासून

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :**महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने आणि पुणे जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या सहकार्याने सतेज संघ, बाणेर यांच्या वतीने “कबड्डी महर्षी स्व. शंकरराव ऊर्फ बुवा साळवी चषक २०२५” राज्यस्तरीय निमंत्रित पुरुष व महिला कबड्डी स्पर्धा, तसेच बाबुराव चांदेरे सोशल फाउंडेशन यांच्या विद्यमाने “पुणे लिग कबड्डी स्पर्धा २०२५” चे आयोजन करण्यात आले आहे.

ही स्पर्धा बुधवार, १६ जुलै ते रविवार, २० जुलै २०२५ या कालावधीत म्हाळुंगे-बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलात पार पडणार असून सामने मॅटवर चार मैदानांवर खेळवले जाणार आहेत.



### ६ जुलैला उद्घाटन सोहळा

स्पर्धेचा उद्घाटन समारंभ बुधवार, १६ जुलै रोजी सायंकाळी ६ वाजता पार पडणार असून मा. खासदार मुरलीधर मोहोळ, केंद्रीय वाहतूक राज्यमंत्री हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

त्याचप्रमाणे पुणे लिग स्पर्धेसाठी ८ पुरुष व ८ महिला संघ तयार करण्यात आले असून एकूण ३५२ खेळाडूंचा सहभाग आहे. ही स्पर्धा २०१२ पासून सुरू असून नवोदितांना संधी मिळण्यासाठी मोठा व्यासपीठ ठरली आहे. त्यांच्यासोबत शिवाजीराव आढळराव पाटील, शितल तेली उगले, शकुंतला खटावकर, सुनील टिंगरे, धीरज घाटे, प्रमोद भानगिरे, सुभाष जगताप, रुपाली पाटील, बाबुराव चांदेरे, नाविद मुश्रीफ, अतुल बेनके, सुनील चांदेरे, मंगल पांडे यांसह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या स्पर्धेमुळे नवोदित खेळाडूंना व्यासपीठ उपलब्ध होऊन महाराष्ट्रासाठी दर्जेदार खेळाडू घडण्यास मदत होणार आहे. सदर माहिती राज्य संघटनेचे सरकार्यवाह बाबुराव चांदेरे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

### बक्षिसांची आकर्षक रचना

- दोन्ही स्पर्धांमधील विजेत्या संघांना खालीलप्रमाणे रोख पारितोषिके व चषक प्रदान करण्यात येणार आहेत:
- प्रथम क्रमांक – ₹२,५०,०००/-
- द्वितीय क्रमांक – ₹१,५०,०००/-
- तृतीय व चतुर्थ क्रमांक – प्रत्येकी ₹१,००,०००/-
- सर्वोत्कृष्ट खेळाडू, चढाई व पकड – प्रत्येकी ₹२५,०००/-

### पुणे लिग संघ व कर्णधार

- छावा पुरंदर – जयंत काळे / ऋतुजा निगडे
- लय भारी पिंपरी – प्रदास दिघोळे / रेखा राठोड
- शिवनेरी जुन्नर – अमित देवकाते / प्रियांका मांगलेकर
- सिंहगड हवेली – अजय नुनसावंत / गायत्री पठारे
- वेगवान पुणे – ओमकार लाळगे / निकिता खाडे
- बलाढ्य बारामती – आदिनाथ राऊत / सिद्धी बालकवडे
- झुंजार खेड – ओमकार काळभोर / नागीन्द्र कुरा
- माय मुळशी – महेश माने / श्रुतिका व्यवहारे

### राज्य व लिग पातळीवर मोठा प्रतिसाद

या स्पर्धेसाठी राज्यातील १२ पुरुष आणि १२ महिला संघ तयार करण्यात आले असून एकूण ३३६ खेळाडू (पुरुष व महिला) सहभागी होत आहेत. प्रत्येक संघात १४ खेळाडू, एक प्रशिक्षक व एक व्यवस्थापकाचा समावेश आहे.